
अतिकेत
लता देशपांडे

# अनिकेत

लता देशपांडे

ग्रंथाली

**ग्रंथाली**
प्रकाशन क्रमांक २७७

**अनिकेत**
पहिली आवृत्ती ६ एप्रिल २००३

© लता देशपांडे
10210, Pinebaugh St.
Ellicot City, MD, 21042 USA
E-mail:SharadDeshpande@aol.com

प्रकाशन
ग्रंथाली,
इंडियन एज्युकेशन सोसायटीची
महात्मा फुले कन्याशाळा,
बाबरेकर मार्ग, दादर (प.),
मुंबई-४०००२८

मुखपृष्ठ
गिरीश कुळकर्णी

अक्षरजुळणी
स्वाती शिरवडकर
प्रभादेवी, मुंबई

मुद्रण
जयमल्हार प्रिंटिंग प्रेस
२१७, आशीष इंडस्ट्रियल इस्टेट,
गोखले रोड (द),दादर, मुंबई-४०००२५

**मूल्य ८० रु.**

## मनोगत

प्रत्येक कथेमागे एक व्यथा असते; अशाच व्यथेपोटी ह्या पुस्तकातील कथा जन्माला आल्या आहेत. मला मुलांची आवड सुरुवातीपासून होती, परंतु पुढे आयुष्यात व्यवसाय जेव्हा मुलांशी निगडित झाला तेव्हा त्या आवडीचं रूपांतर छंदात झालं. व्यवसायात माझ्या सान्निध्यात आलेली सर्वच मुलं व्यथा व वेदना घेऊन आलेली होती. या मुलांशी निकटचा परिचय झाल्यावर त्यांच्या व्यथा समजावून घेण्याचा, त्यामागची कारणं शोधून काढण्याचा आणि त्यापायी त्यांना होणाऱ्या वेदना शमवण्याचा फॉर्म्युला धुंडाळून काढण्याचा नाद तयार झाला; आणि त्या नादाचं व्यसन केव्हा झालं ते ध्यानातही आलं नाही. परंतु त्यापासून जो अनुभव मिळत राहिला, जो बोध होत गेला, तो गोंधळून टाकणारा, विचारात पाडणारा होता. अशा प्रकारचा अनुभव कोणत्याही पाठ्यपुस्तकात, शाळा-कॉलेजात वा विद्यापीठात... कधीही शिकायला मिळत नाही. या अनुभवाने मला वेगळी दृष्टी दिली, इतरांकडे पाहण्याचा-त्यांना जाणण्याचा वेगळा आणि आगळा दृष्टिकोन दिला, नव्या दिशा दर्शवल्या. या सबंध काळात मन साशंक होऊन स्वत:ला प्रश्न विचारावा लागे, "या कामासाठी लागणारं मनोधैर्य, मनोबळ, संवेदनशीलता, संयम, शहाणपणा व धीर आपल्याकडे आहे का?"

ह्या कथासंग्रहातील कथांमागे मानसशास्त्र, सोशलवर्क अथवा काऊन्सेलिंग या अंगांनी केलेलं स्पष्टीकरण आढळणार नाही. कहाण्या जशा घडताना मी पाहिल्या वा मला कथिल्या गेल्या तशाच त्या लिहिल्या आहेत. शब्द वेगळे आहेत, मुलांच्या अनुभवात शिरकाव करून लिहिण्याचा प्रयत्न आहे. या मुलांच्या वागण्यात जो अस्वाभाविक बदल घडला, त्यांच्यात गुन्हेगारी वृत्ती आली, त्यांच्यावर व्यसनाधीन

होण्याची-पळून जाण्याची वेळ आली, त्यामागे काय घडलं, त्यांना काय भोगावं लागलं व त्यासाठी कोणाला जबाबदार ठरवावं याचा वाचकांना थोडाफार उलगडा व्हावा व त्यांनी ह्या मुलांना जाणून घेण्याचा प्रयत्न करावा हा यामागील इरादा आहे. व्यसनाधीन व गुन्हेगार मुलं, मानसिक रूग्ण असलेली मुलं यांच्याबाबत समाजात चुकीच्या कल्पना असतात. ही मुलं गुन्हेगारीकडे, व्यसनांकडे का प्रवृत्त झाली याचा फारसा विचार केला जात नाही. ही मुलं आहेत - तुमच्या-माझ्या मुलांसारखी. त्यांची दिशा, मार्ग चुकवायला अनेक वेळा समाज कारणीभूत असतो, म्हणजे पर्यायाने आपण जबाबदार असतो!

अनुभवांना सर्वार्थांनी सामोरं जाण्याची ओढ असल्यामुळे मला सतत शोध घेत राहण्याची नैसर्गिक प्रेरणा लाभली आहे. अनुभवांचा हा जिवंतपणा, ताजेपणा व त्यांचा परिणाम टिकवण्यासाठी क्लिष्ट रचना, वजनदार भाषा अगर अवघड पारिभाषिक शब्द यांची कसरत न करता साध्या, सरळ भाषेत कथा सांगण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

माझी नोकरी डायग्नॉस्टि-प्रिस्क्रीप्टिव्ह स्पेशालिस्टची. मानसिक दुर्बल अशा कुमार वयातील रुग्णांसाठी असलेल्या हॉस्पिटलमधील स्पेशल एज्युकेशनच्या शाळेत मी काम करत असे. या नात्याने माझा या मुलांशी परिचय झाला. त्यावेळी त्यांची भाषा, त्यांचे रीतीरिवाज, त्यांची संस्कृती जाणून घेणं महत्त्वाचं व जरुरीचं वाटलं. यासाठी सर्वांचा विरोध पत्करून, त्यांच्या मर्जीविरुद्ध शहरांतील त्यांच्या वस्तीत (inner city) मी दोन आठवडे राहिले. त्यांच्या राहणीचे विविध पैलू तेथे जवळून पाहण्यास मिळाले. त्यांना समजून घेण्याचा, त्यांची घडण अशी होण्यास काय कारणीभूत झालं ते जाणण्याचा योग आला. या सर्व अनुभवांचा पुढील अनेक वर्षे माझ्या व्यवसायामध्ये मला बराच फायदा झाला.

हॉस्पिटलमधील त्याच शाळेत पुढे मुख्याध्यापिका, मुख्याधिकारी बनण्याचं भाग्य माझ्या वाट्याला आलं. हॉस्पिटलमधील ह्या शाळेचे व राहण्याच्या वॉर्डचे दरवाजे कुलुपबंद असत. चांगल्या वागणुकीसाठी काहींना खुल्या वॉर्डमध्ये राहण्याचं बक्षीस मिळे, परंतु शाळेचे दरवाजे मात्र सतत बंद असत. आसपासच्या तीन स्थानिक स्वराज्य संस्थांनी धाडलेली काही मनोरूग्ण मुलं व मानसिक आजारापायी गुन्हेगार व आक्रमक बनलेले विद्यार्थी फक्त शालेय शिक्षणापुरते

# अनुक्रम


| | |
|---|---|
| दोष कोणाचा? | १ |
| घराची ओढ | १३ |
| स्वत:ची ओळख | २१ |
| प्रयत्न वाळूचे... | ३१ |
| समज | ४१ |
| प्रवासाचा शेवट | ५१ |
| विरलेलं स्वप्न | ५९ |
| प्रायश्चित्त | ७० |
| उंच हवेत... | ७८ |
| धूसर झालेलं बालपण | ८५ |
| उपरा | ९५ |
| एका मातेचं ऋण | १०२ |
| परतीची वाट | ११३ |

या कथासंग्रहातील काही कथा 'एकता', 'बृहन्महाराष्ट्रवृत्त' व 'चैत्राली' या दिवाळी अंकांत प्रसिद्ध झाल्या आहेत. मासिकांतून वा नियतकालिकांतून एकेक कथा प्रसिद्ध केल्या जातात व त्याही अनेक ठिकाणी. त्यामुळे या कथा काळाच्या ओघात सहज वाहत जाऊन नाहीशा होतात. या मुलांचं दुःखद जीवन, त्यांना सहन करावे लागलेले मानसिक व शारीरिक प्रहार, समाजाकडून त्यांच्या वाट्याला आलेलं उपेक्षित जिणं हे सलगपणे दीर्घकाळ वाचकांच्या मनावर ठसा उमटवून त्यांच्या विचारशक्तीला चालना देऊ शकत नाही. ही मुलं जगातील कोणत्याही समाजात चपखलपणे बसू शकतील. त्यासाठी कथांचं संकलन करून कथासंग्रह प्रसिद्ध करणं मला जरुरीचं वाटलं.

मी लिहिलेल्या कथा वाचून त्याबद्दल प्रामाणिक अभिप्राय व काही बदल करण्याबाबत सूचना दिल्याबद्दल मी लीला साळगावकर व सौ. विजया जोशी ह्यांची मन:पूर्वक आभारी आहे. ह्या कथा पुस्तकरूपानं प्रसिद्ध करण्याचा विचार माझ्या मनात रुजवला डॉ. सुरेश व डॉ. निर्मला लिमये या दांपत्यानं. त्यांनी नुसतं बीज रोवलं नाही तर त्यांनी खतपाणीही घातलं. डॉ. दिना खटखटे ह्यांनी अट्टाहासानं पुस्तक प्रसिद्ध करण्याचा आग्रह धरलाच, परंतु एवढ्यावर न थांबता त्यानं नरेंद्र जाधव ह्यांच्याशी ओळख करून दिली. जाधव ह्यांनी मुख्य काम केलं ते 'ग्रंथाली'शी गाठ घालून देण्याचं. ह्या सर्वांच्या सहकार्यामुळे व मार्गदर्शनामुळे हा कथासंग्रह प्रसिद्ध करणं शक्य होत आहे. हे पुस्तक वास्तवात आणण्याच्या कामात 'ग्रंथाली'चे दिनकर गांगल यांचा सिंहाचा वाटा आहे. लंडनचे मुकुंद भावे, मधू अभ्यंकर ह्यांनी स्वतः शब्दकोष बनून वेळोवेळी मदत केल्याबद्दल त्यांना धन्यवाद. या सर्वांची मी अत्यंत ऋणी आहे. सर्वांत शेवटी, परंतु सर्वांत महत्त्वाचं पाठबळ व कामगिरी शरदची - माझ्या पतीची. अनेकदा वेदनांपायी नैराश्यात घेरलेली असताना उत्तेजन व प्रोत्साहन देऊन त्यानं लिहिण्यास उद्युक्त केलं. कॉपी करण्याचं व पोस्टाची कामं, इ-मेल पाठवण्याचं काम त्यानं उत्साहानं व आनंदानं केलं. त्याच्या मदतीशिवाय कथासंग्रह अस्तित्वात आलाच नसता. एवढंच नव्हे तर माझं स्वतःचं अस्तित्व निकामी ठरलं असतं.

- **लता देशपांडे**

रोज बसने आमच्या शाळेत येत. नंतर, वर्षाच्या आत मुक्या व बहिऱ्या मुलांच्या वसतिगृहातील आक्रमक व मनोरूग्ण विद्यार्थी उपचारांसाठी वेगळ्या बंद वॉर्डमध्ये दाखल करण्यात येऊ लागले. त्यांच्यासाठी वेगळी शाळा सुरू करावी लागली. हा अनुभव माझ्यासाठी नवीन व आगळा होता. हॉस्पिटलमध्ये कुमार वयातील मनोरूग्ण कोर्टामार्फत जज्जच्या हुकूमावरून उपचारांसाठी दाखल केले जात. त्याबरोबरच डिपार्टमेंट ऑफ सोशल सर्व्हिसेस (ही स्थानिक सरकारी संस्था घर नसलेल्या, कुटुंब अगर नातलग नसलेल्या, मानसिक-शारीरिक लैंगिक छळ झालेल्या मुलांसाठी राहण्याची व्यवस्था पाहते) या संस्थेनं पाठवलेली मुलंही उपचारासाठी राहण्यास पाठवली जातात. बालगुन्हेगारांसंबंधातील कायदेशीर कारवाईसाठी स्वतंत्र खाते असून बालगुन्हेगार मुलांना कोर्टामार्फत हॉस्पिटलमध्ये पाठवण्यात येते. या मुलांना हॉस्पिटलबाहेर कुठेही पाठवण्याची वेळ आल्यास प्रथम युनिट डिरेक्टरची, कोर्टाची परवानगी घ्यावी लागते. त्याबरोबरच पाठवणाऱ्या संस्थेच्या कार्यकर्त्यांशी विचारविनिमय करावा लागतो.

माझ्या आजारानंतर माझं व्हीलचेअरच्या आधारानं चालणं सुरू झालं. त्यामुळे कामासाठी प्रवास करणं कठीण होऊ लागलं. मग १९९१ साली सेवानिवृत्त होण्याखेरीज अन्य मार्ग मला उरला नाही. चार महिने स्वस्थ बसून लिहिण्या-वाचण्यात गेले. तरी आजवर ध्यानी-मनी-स्वप्नी वास्तव्य करून राहिलेली मनोरूग्ण, बालगुन्हेगार व निराधार मुलं स्वस्थ बसू देईनात. अखेर, कुमार वयाच्या व्यसनाधीन मुलांवरील उपचाराकरता उघडलेल्या Alcohol या संस्थेत उपचाराचा भाग म्हणून खास शाळा स्थापन करण्यासाठी डिरेक्टर ऑफ एज्युकेशन या पदावर मी पुन्हा व्यवसायास आरंभ केला. या उपचारकेंद्रामधील मुलंसुद्धा हॉस्पिटलमधील मुलांप्रमाणे मनोरूग्ण, बालगुन्हेगार व आक्रमक वृत्तीची होती. फरक एवढाच, की ही सर्व मुलं कोणत्या ना कोणत्या तरी व्यसनाच्या अधीन झालेली होती, त्यामुळे हा अनुभव थोडा वेगळा होता. व्यसनासक्तांवरील उपचारक परीक्षेचं प्रमाणपत्र मिळवण्याकरता मला पुन्हा विद्यार्थीदशा पत्करावी लागली. या संस्थेतील बहुतांशी मुलं व्यसनाधीन होण्यास मुख्यतः त्यांचे आईवडील कारणीभूत होते. बालवयापासून मानसिक, शारीरिक व लैंगिक छळ सोसलेली, आईबाप घर सोडून गेल्यामुळे किंवा तुरुंगात असल्यामुळे पोरकी झालेली किंवा म्हाताऱ्या आजीआजोबांना

उतारवयात त्यांची देखभाल न करता आल्यामुळे वाईट संगतीमुळे मोकाट सुटलेली अशी ही मुलं व्यसनाधीन, गुन्हेगार व आक्रमक न बनली तरच नवल! मुलं व्यसनाधीन होण्यास कारण ठरणाऱ्या सर्व रसायनांविषयी, औषधांविषयी, झाडपाल्याविषयी व दारूविषयी बरंच ज्ञान या संस्थेत प्राप्त झालं. हीसुद्धा मुलंच होती व नशिबी आलेल्या परिस्थितीवर काहीही अधिकार नसलेली. असं असूनही ह्या सर्व मुलांमध्ये प्रेम होतं, माया होती, दुसऱ्यासाठी काहीतरी करण्याची उमेद होती.

समाजानं जवळजवळ वाळीत टाकलेल्या अशा काही मुलांचं व इतरही अनेक मुलांचं प्रेमळ, सरळ, अकृत्रिम वागणं मला बरंच काही शिकवून गेलं. यांतील काही मुलं अशा समाजात वाढली की त्या ठिकाणी त्यांचं बालपणच बळी गेलं, स्पर्शाच्या-प्रेमाच्या काही क्षणांसाठी आसुसलेली ही मुलं त्यावाचून मोठी झाली. माझ्या व्यवसायापायी मला या समाजाचं दाहक दर्शन घडलं. उपेक्षेच्या, छळाच्या, कष्टांच्या विस्तवात तावून-सुलाखून निघालेल्या या मुलांमध्ये मला माणुसकीची, प्रेमाची, आपुलकीची थंडाई मिळाली, ओलावा मिळाला.

गेल्या पस्तीस-छत्तीस वर्षांत माझ्या व्यवसायामध्ये मला अनेक आगळे अनुभव आले. त्यांतील काही मुलं माझ्या मनाला नुसता स्पर्श करून गेली नाहीत तर त्यावर कायमचा ठसा उमटवून गेली. स्वतःचा आपल्या जीवनावर काहीही अधिकार नसलेली ही मुलं आपल्या वर्तणुकीपायी अत्यंत दुःखद स्मृती मागे ठेवून गेली. सर्व दृष्टींनी सुबत्ता असूनही अमेरिकेसारख्या देशात उपेक्षित, दरिद्री, निर्मूल्य, निष्प्रेम, छळाचं जीवन जगणारी मुलं आहेत हे सर्वप्रथम जाणवलं तेव्हा या सत्यावर विश्वास ठेवण्यास मन तयार होईना. परंतु जसजशी वर्षं उलटू लागली तशी मी काया-वाचा-मनानं या पाखरांसाठी स्वतःला वाहून घेतलं; उडून जाण्याचं बळ त्यांच्या पंखांत येईपर्यंत त्यांना घरट्याचा आसरा देण्याचा प्रयत्न केला आणि आनंदाचा भाग असा, की काहींना उडायला शिकवण्यातही यश मिळालं. या मुलांनी मला प्रेम दिलं, जिव्हाळा दिला, मैत्री दिली, हास्य दिलं, आनंद दिला. त्याखेरीज स्वतःच्या वेदना व दुःख विसरण्यासाठी मनोबळसुद्धा दिलं. मी त्यांना जे देऊ शकले, त्यांच्यासाठी थोडंफार काही करू शकले त्याच्या अनेक पटींनी अधिक मला त्यांनी दिलं, त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

# दोष कोणाचा?

मे महिन्याच्या पाच तारखेला कोर्टात उपस्थित राहण्यासाठी वकिलामार्फत आलेलं कोर्टाचं साक्षीसमन्स पाहून मला धक्का बसला! तसं पाहू जाता, कोर्ट ही संस्था मला अपरिचित नाही. गेल्या वीस-बावीस वर्षांत 'चाईल्ड ॲडव्होकेट' या भूमिकेमुळे किंवा माझ्या व्यवसायानिमित्त कोर्टाची पायरी चढण्याची वेळ माझ्यावर अनेक वेळा आलेली आहे. परंतु केवळ गुन्हेगार व मनोरूग्ण मुलांनी केलेल्या कृत्यांचं व त्यांच्या वागण्याचं समर्थन करण्यासाठी ती आलेली असे, त्यांना सुधारण्यासाठी, योग्य निवासस्थान मिळवून देण्यासाठी ती असे. परंतु आज हाती आलेलं हे समन्स कोणा एका वीस वर्षांच्या ड्रायव्हरचा माफीचा साक्षीदार होण्यासाठी होतं.

लिफाफा उघडल्यानंतर माझ्याच हस्ताक्षरातले लिखाणाचे झेरॉक्स केलेले काही कागद जमिनीवर इतस्ततः विखुरले, तेव्हा ह्या साऱ्याचा उलगडा झाला. त्याबरोबरच, ज्यांनी या तरुण माणसावर दावा केला त्यांची चीड आली. केवळ पैशांच्या लोभापायी एका निरपराधी माणसावर त्यांनी वाहनाने मनुष्यवध घडवल्याबद्दल दावा लावला होता.

मी ज्या मनोरूग्ण मुलांच्या हॉस्पिटलमध्ये काम करत होते त्या हॉस्पिटलच्या स्पेशल एज्युकेशन शाळेत

हॉवर्ड काऊंटीच्या स्कूल बोर्डातर्फे रोज येणारी शेरी ही एक विद्यार्थिनी होती. त्यावेळी तिच्या वागणुकीबाबत मी तिच्या फाईलमध्ये अनेक टिपणं केली होती. तेराव्या वर्षी भर दिवसा एका गाडीचा धक्का लागून शेरी मृत्युमुखी पडली होती व शेरीच्या आईवडिलांनी त्या गाडीच्या ड्रायव्हरवर मनुष्यवधाचा दावा करून वीस लाख डॉलरच्या नुकसानभरपाईची मागणी केली होती. शेरीबद्दल मी केलेल्या नोंदी वाचून त्या ड्रायव्हरच्या वकिलाने, शेरीला मानसिक विकृती होती व अनेक वेळा ती रागाच्या वा निराशेच्या भरात अविचारी कृती करत असे हे ज्युरीला पटवून देण्यासाठी माफीचा साक्षीदार म्हणून मला बोलावले होते. साक्षीदार म्हणून प्रौढ फौजदारी गुन्हेगारांच्या कोर्टात जाण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग होता. त्यामुळे थोडी भीती वाटू लागली. त्याहूनही, मुलगी जिवंत असताना तिचा मानसिक छळ करणारे हे आईवडील आज, तिच्या मृत्यूनंतर तिच्या नावावर पैसे मिळवू पाहत होते याबद्दल चीड आली. परंतु जाण्याखेरीज गत्यंतर नव्हते.

वकिलांनी बोलावलेल्या दिवशी त्यांना भेटण्यासाठी मी त्यांच्या ऑफिसमध्ये पोचले. केस कोर्टात जाण्यापूर्वी माझ्याकडून माझ्याबद्दल व शेरीबद्दल अधिक माहिती मिळवण्यासाठी व केसची पुरती ओळख करून देण्यासाठी ही पूर्वतयारीची भेट होती.

माझं नाव डेव्हिड ॲडलर अशी आपली ओळख करून देऊन वकिलांनी पुढे बोलण्यास सुरुवात केली, "तुम्हाला तसदी दिल्याबद्दल मी प्रथम दिलगिरी व्यक्त करतो. माझ्या अशिलाच्या दृष्टीनं तुमची साक्ष महत्त्वाची आहे. मी त्यांची तुमच्याशी ओळख करून देतो. प्लीज, मीट मिस्टर सॅम रिचर्डसन." हस्तांदोलन वगैरे उपचार आटोपल्यानंतर वकीलसाहेबांनी माझ्याबद्दल, माझ्या शिक्षणाबद्दल, हॉस्पिटलमधल्या माझ्या व्यावसायिक स्थानाबद्दल व व्यावसायिक अनुभवाबद्दल माहिती विचारून मूळ मुद्द्याला हात घातला.

"शेरीला तुम्ही किती वर्षं ओळखत होता? तिचा व तुमचा संबंध का व कशामुळे आला?"

"मी शेरीला जवळजवळ वर्षभर ओळखत होते. ती हॉवर्ड काऊंटीच्या स्पेशल एज्युकेशन डिपार्टमेंटतर्फे आमच्या हॉस्पिटलच्या शाळेत डे स्टुडंट म्हणून दाखल झाली होती. मी शाळेची प्रिन्सिपल आणि आक्रमक, काबूत ठेवण्यास कठीण असलेल्या मुलांची सल्लागार या नात्यानं शेरीला ओळखत होते."

"तुम्ही तिच्या फाईलमध्ये तिच्याबद्दल लिहिलेला मजकूर हृदयद्रावक व त्याबरोबरच स्पष्ट आहे. तुम्ही तिची सर्व कहाणी तुम्हाला तिच्या संदर्भात आलेल्या अनुभवांसह पुन्हा सांगू शकाल का? जशी आठवेल तशी सविस्तरपणे सांगा. तुमची हरकत नसल्यास मी हा टेपरेकॉर्डर चालू ठेवू का?"

अर्थात, टेपरेकॉर्डर लावण्यास माझी हरकत होती, परंतु नाइलाजही होता. माझ्यासमोर बसलेल्या त्या निरपराधी वीस-बावीस वर्षांच्या ड्रायव्हर माणसाला एका लोभी, कपटी जोडप्यापायी तुरुंगात जावं लागावं अशी माझी इच्छा नव्हती. म्हणून टेपरेकॉर्डर लावायला मी परवानगी दिली.

हॉवर्ड काऊंटीच्या स्पेशल एड डिपार्टमेंटकडून मला शेरीबद्दल मिळालेली माहिती अशी :

शेरीचं वय बारा वर्षांचं होतं व ती पाचवीत म्हणजे तिच्या वयाच्या मानानं एक वर्ष मागे होती. तिची गेली तीन वर्षं शाळेत कोणत्याही वर्गात प्रगती नव्हती. वर्गमित्रांशी मारामारी करणं, शिक्षकांना उलट उत्तरं देणं, मन मानेल तेव्हा वर्गातून बाहेर पडणं व कॉरिडॉरमधून फिरणं अशा तिच्या वागणुकीमुळे तिला अनेकदा शाळेच्या सायकॉलॉजिस्टकडे पाठवली जात असे. तिची मानसिक चाचणी होऊन ती मनोरूग्ण असल्याचं ठरवण्यात आलं होतं. तिची काऊंटीच्या शाळेतल्या स्पेशल क्लासमध्ये रवानगी करण्यात आली होती. परंतु त्यामुळे तिच्या वागणुकीत फारसा फरक पडला नव्हता. ती दिवसेंदिवस अधिकाधिक आक्रमक बनत चालली होती. तिची मजल वह्या-पुस्तकं फाडणं, वस्तू उचलून फेकणं, एवढंच नाही तर शिक्षकांना ढकलणं व त्यांच्यावर हात उगारणं इथवर पोचली होती. त्यामुळे तिला रेसिडेन्शियल स्पेशल स्कूलमध्ये दाखल करण्यात यावं अशी शिफारस स्पेशल एज्युकेशन डिपार्टमेंटनं केली होती. तशी व्यवस्था होण्यापूर्वी, दरवाजे बंद असणाऱ्या आमच्यासारख्या बंदिस्त स्पेशल एड डे स्कूलमध्ये तिला दाखल करून काही सुधारणा होते का हे पाहावं असं ठरवण्यात आलं. त्यासाठी प्रवेश मिळवण्याकरता तिचा अर्ज फाईलसकट माझ्याकडे आला.

शेरीची फाईल चांगलीच लठ्ठ होती. तिचा सर्व इतिहास अगोदर फोनवर कळला होता. ॲडमिशन टीमनं तिला आणखी एक संधी देण्याचं ठरवलं आणि तिथंच तिच्या भीषण मृत्यूचं बीज रोवलं गेलं.

माझ्या ऑफिसमध्ये मी फोनवर बोलत असताना खोलीच्या बाहेर कोणाच्या

तरी जोराने ओरडण्याचा, शिव्या देण्याचा, फर्निचर फेकण्याचा आवाज कानावर आल्यामुळे घाईघाईनं फोन खाली ठेवून मी खोलीबाहेर आले. अकरा-बारा वर्षांची, जवळजवळ पाच फूट उंचीची, शिडशिडीत बांध्याची एक मुलगी कॉरिडॉरमध्ये भिंतीवरील व बुलेटिन बोर्डावरील सर्व फोटो-पेपर्स फाडत, जमिनीवर फेकत एका टोकाहून दुसऱ्या टोकाला पळत होती. तिला थांबवण्यासाठी तिच्यासोबत आलेली सोशल वर्कर तिच्यापाठोपाठ पळत तिची विनवणी करत होती. हॉस्पिटलच्या सिक्युरिटी डिपार्टमेंटला मदतीसाठी फोन करण्यात आला होता. आपापल्या वर्गांचे दरवाजे बंद करून शिक्षक विद्यार्थ्यांना खोलीत थोपवून धरण्याचा प्रयत्न करत होते. पटकन काहीतरी करून या मुलीला थोपवून धरणं आवश्यक होतं. ती मुलगी माझ्या थोडीशी जवळ येताक्षणी मी माझ्या टेबलावरचा भरलेला पाण्याचा जग तिच्या चेहऱ्यावर रिकामा केला. काय होत आहे हे न कळून ती खूप भांबावली. त्यावेळी दोन शिक्षकांनी तिला घट्ट पकडून धरलं. त्याबरोबर ती जोरजोरानं रडू लागली. तिच्या खांद्यावर हलके हात ठेवून मी तिला म्हटलं, 'रागामुळे डोकं गरम झालं की कधी कधी ते असं थंड करावं लागतं, बघ.'

ते ऐकल्याबरोबर तिच्या रडण्याचं एकदम हसण्यात रूपांतर झालं. मी कपड्यांचा एक नवा सेट मागवून तिला कपडे बदलायला दिले. त्या कपड्यांत ती बुजगावण्यासारखी दिसू लागली. तिचे कपडे वाळवण्यासाठी होम एकनॉमिक्स रूममध्ये पाठवले व मी तिला माझ्या ऑफिसमध्ये आणलं. ही शेरीची आणि माझी पहिली भेट! का कोण जाणे, पण या प्रथम भेटीपासून आम्हां दोघींमध्ये एक स्नेहबंध निर्माण झाला. दोन दिवसांनंतर शेरी बसनं नियमितपणे शाळेत येऊ लागली.

दोन महिने काही विशेष न घडता निघून गेले. काही किरकोळ कारणांमुळे शेरीला चांगल्या वागणुकीसाठी मिळणाऱ्या विशेष सवलती प्राप्त होऊ शकत नव्हत्या. एके दिवशी, माझ्या ऑफिसच्या दारापाशी उभी राहून शेरीने मला विचारलं, "या शाळेत सर्व शिक्षक इतके चांगले का आहेत? ते मला कधी नावं ठेवत नाहीत, माझा कधी अपमान करत नाहीत."

"शेरी, तू जर चांगली वागत असलीस तर कोण-कशासाठी तुला नावं ठेवील, तुझा अपमान करील?"

"पण त्यामुळे मला राग येत नाही, उलट उत्तरं देता येत नाहीत. एवढंच काय, पण वस्तू फेकायचीही गरज भासत नाही."

मला हसू आवरेना व त्याबरोबर तिला काय उत्तर द्यावं तेही सुचेना. मी तिला म्हटलं, 'शेरी, तू अशीच वागत राहिलीस ना तर चांगल्या वागणुकीबद्दल तुला ॲवॉर्ड देण्यात येईल. अशी ॲवॉर्ड्स मिळवत राहिलीस तर तुला लवकरच काऊंटीच्या शाळेत परत जाता येईल.' माझ्या उत्तरानं तिचं समाधान झाल्याचं तिच्या चेहऱ्यावरून वाटलं नाही. ती काहीही न बोलता तिथून निघून गेली.

दुसऱ्याच दिवशी, शिक्षकांवर पुस्तक भिरकावण्याबद्दल व वर्गातील मुलीला ओरबाडल्याबद्दल शेरीला माझ्या पुढ्यात उभं करण्यात आलं. ती खाली मान घालून गुपचूप उभी होती. मी टीचर-असिस्टंटला जाण्याची सूचना केली.

"शेरी, कालच मी तुझ्यात झालेल्या सुधारणेबद्दल तुझं कौतुक केलं, तुला शाबासकी दिली आणि आज हे काय केलंस तू?" ती काही बोलली नाही, तेव्हा मीच पुढे म्हटलं, "तू जर अशी वागायला लागलीस तर त्याचा परिणाम काय होईल हे ठाऊक आहे तुला?"

"हो. मला काऊंटीच्या शाळेत परत पाठवावं लागणार नाही. मी इथंच राहीन."

आता माझ्या डोक्यात प्रकाश पडला! मी तिच्याकडे पाहिलं. तिच्या डोळ्यांत आसवं होती. "मला इथून दुसऱ्या कुठल्याही शाळेत पाठवू नका, प्लीज. ही शाळा मला आवडते. आजपर्यंतच्या प्रिन्सिपलांचा व त्यांच्या ऑफिसांचा मी धसका घेतला आहे. प्रत्येक प्रिन्सिपलची मला चीड येत असे. इथं आल्यापासून मात्र मला तुमच्या ऑफिसमध्ये रोज यावंसं वाटतं, तुमच्याशी खूप बोलावंसं वाटतं. मला दुसऱ्या शाळेत नाही जायचं."

"ठीक आहे. आपण दुसऱ्या शाळेचं नावही नाही काढायचं यापुढे. आता तरी तू तुझं वागणं सुधारशील ना?"

"हो."

मी शेरीला शिक्षकांची व त्या मुलीची क्षमा मागायला लावली. तिनंही न कुरकुरता ती मागितली.

शेरी आता चांगली रुळली होती; चांगल्या वर्तणुकीबद्दल बरीच ॲवॉर्ड्स मिळवत होती; शिक्षणातही प्रगती करत होती; काऊंटीच्या स्पेशल एज्युकेशन डिपार्टमेंटच्या सदस्यांचा विश्वास न बसण्याइतपत तिचं वागणं सुधारलं होतं. ते भेटायला येत त्यावेळी ती त्यांच्याशी नम्रतेनं बोलत असे, आपल्या यशाच्या गोष्टी त्यांना अभिमानानं ऐकवत असे. ती शिक्षकांतही प्रिय झाली होती.

शेरीला शाळेत येऊन आता आठ-दहा महिने झाले होते. रोज माझ्याशी थोडा वेळ तरी बातचीत केल्याशिवाय ती घरी जात नसे. सर्व काही सुरळीत चालू असताना एके दिवशी शेरी शाळेत आली नाही. मी शाळेच्या नियमाप्रमाणे तिच्या घरी फोन केला. तो तिच्या मामांनी उचलला. शेरी आजारी असल्यामुळे शाळेत न आल्याचं त्यांनी सांगितलं. तिसऱ्या दिवशी शेरी शाळेत आली ती जरा घुश्श्यातच. ती एक-दोन तास कोणाशीच बोलली नाही. नंतर वर्गातून एकदम बाहेर पळाली. टीचर असिस्टंटनी शोधलं तेव्हा ती बाथरूममध्ये हुंदके देऊन रडताना आढळली. मीटिंगमधून उठून मला तिला ऑफिसमध्ये आणावं लागलं. तिच्या रडण्याचा ओघ खोलीत आल्यावर कमी होण्याऐवजी वाढला. मीही तिला बऱ्याच वेळपर्यंत रडू दिलं. माझा हात हातात घेऊन रडता रडता एकदम माझ्या गळ्यात पडून 'आपल्याला घरी पाठवू नये' म्हणून मला गळ घालू लागली.

ते शक्य होणार नाही असं मी सांगताच ती म्हणाली, "मी घरी जाणार नाही. मला घरी पाठवू नका. घरी पाठवल्यास मी जीवाचं बरंवाईट करून घेईन. मला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करा."

शेरी कळवळून माझी आर्जवं करत होती. मी आता चांगलीच हादरले. मी माझ्या सेक्रेटरीला तिच्यापाशी बसवून ठेवून आमच्या युनिट डिरेक्टरंना भेटले व त्यांच्या कानावर सर्व हकीगत घातली.

'Looks like she is threat to herself. Let our psychologist evaluate her. I will talk to her later and interview Sheri,' त्यांनी उत्तर दिलं.

सायकॉलॉजिस्टच्या खोलीत शेरीला पोचवून मी परतले. ती घरी न पाठवण्याबद्दल परत परत आर्जवं करत होती.

शेरीला निरीक्षणासाठी एक दिवस हॉस्पिटलमध्ये ठेवावं असा युनिट डिरेक्टरंनी निर्णय घेतला तेव्हा मी सुटकेचा निश्वास टाकला.

शेरी घरी जाण्यास का तयार नव्हती हे सांगण्यास ती अजूनपर्यंत तयार नव्हती. घरी पाठवल्यास जीव देण्यास मागेपुढे पाहणार नाही अशी धमकी ती वारंवार देई. ती मनातून फार घाबरल्यासारखी वाटत होती. दोन दिवस शाळेची गैरहजेरी, धास्तावलेली नजर, घरी न जाण्याचा आग्रह, जीव देण्याची धमकी... घरी काहीतरी घडलं होतं खास! निदान, आईवडिलांकडून तरी काही खुलासा होईल या समजुतीनं मी त्यांना फोन करण्याचा प्रयत्न केला तर ती दोघं घरी सापडली नाहीत. फोन शेरीच्या मामांनी उचलला. शेरीला हॉस्पिटलमध्ये

दाखल केलं आहे असं मी त्यांना सांगताच, 'तुम्ही त्या पोरीवर मुळीच विश्वास ठेवू नका. पार बिघडून गेलेली मुलगी आहे ती. द्या घरी पाठवून तिला. मी पाहतो तिला काय म्हणायचंय ते' असा त्यांनी उलट मलाच सल्ला दिला! सहा वाजून गेले तरी तिच्या आईवडिलांचा फोन आला नाही. ती दोघं ऑफिसमध्ये किंवा घरी नव्हती.

शेरीच्या आईचा संध्याकाळी जवळजवळ सात वाजता फोन आला. शेरीला हॉस्पिटलमध्ये दाखल केल्याचं सांगून पेपरवर्क पुरं करण्यासाठी मी त्यांना हॉस्पिटलमध्ये बोलावलं तर तिची आई माझ्यावरच उखडली.

"तुम्ही लोकांनी तिला फार डोक्यावर चढवून ठेवली आहे. आतापर्यंत शाळेत सर्वांना त्रास देत होती. आता आपला मोर्चा आमच्याकडे वळवला आहे तिने. काही देत नाही जीव! आपल्याला हवं ते साधण्यासाठी वाटेल त्या धमक्या देते व तुमच्यासारखी माणसं त्यावर विश्वास ठेवतात."

"तुम्ही येता आहात ना पेपरवर्क पूर्ण करण्यासाठी?" - मी म्हटलं.

"फुकट घालवायला आता वेळ नाही माझ्याकडे. उद्या पाहू."

एवढं बोलून तिने रीसीव्हर फोनवर आदळला. युनिटच्या नर्सला तिला पुन्हा फोन करायला सांगून मी घरी जाण्यास निघाले. मनात विचार आला-मुलगी हिची आणि हिला इथं यायला वेळ नाही! मी मात्र अजूनपर्यंत अडकले आहे हिच्यामुळे.

त्या दिवशी संध्याकाळी शेरीच्या घरून कोणीही आलं नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी दहाच्या सुमारास शेरीची आई मामासह हॉस्पिटलमध्ये हजर झाली. मामा अजून झोपेत असल्यासारखा दिसत होता. तिची आई पुन:पुन्हा 'या मुलीला फोडून काढलं पाहिजे. त्याशिवाय ती वळणावर येणार नाही. तुम्ही सर्वजण बाबापुता करून तिची समजूत घालू पाहता म्हणून ती बिथरली आहे' असं बडबडत होती. आईबरोबर आलेल्या मामाला पाहून शेरी आईशीही बोलायला तयार होईना. तिनं आणलेले कपडे व वस्तू शेरीनं नर्सला घेण्यास सांगून ती आपल्या खोलीत निघून गेली. सर्व फॉरमॅलिटीज आटोपून दोघं चडफडत निघून गेली.

दोन दिवस निरीक्षणासाठी ठेवल्यावर शेरी आत्महत्याप्रवण नाही असं निदान करून तिला घरी पाठवण्यात आलं, तिच्या विरोधाला न जुमानता.

त्यानंतर दोन दिवसांनी शाळेत आल्यावर तिनं पुन्हा वस्तू फेकायला व

भिंतीवरची चित्रं व बुलेटिन बोर्डावरील नोटिशी फाडून टाकायला आणि त्याबरोबरच कॉरिडॉरमध्ये पळायला सुरुवात केली. ती पळता पळता शिव्या देत सर्वांचा उद्धार करत होती. हॉस्पिटलच्या सिक्युरिटी ऑफिसला फोन केला होता. मी मीटिंगहून परतले तर हा तमाशा माझ्या ऑफिससमोर चालू होता.

शेरीनं मला पाहताच कॉरिडॉरच्या दुसऱ्या टोकापाशी जाऊन तिथं येण्यासाठी मला खूण केली. तिच्या हातात वुडशॉपमधून उचललेला लाकडाचा एक दांडा होता. मी सिक्युरिटी गार्डच्या विरोधाला न जुमानता तिच्याजवळ जाण्याचा निर्णय घेतला. हळुहळू पावलं टाकत, तिला शांत करण्याचा प्रयत्न करत मी तिच्या रोखानं जात होते. मी जवळ पोचताच दांडा जमिनीवर फेकून तिनं मला घट्ट मिठी मारली आणि ती ढसाढसा रडू लागली. मी गार्डला जाण्याची खूण करत तिला माझ्या ऑफिसमध्ये घेऊन आले.

"घरी न जाण्याचं खरं कारण सांगितलं तर तुम्ही मला इथं ठेवाल?" शेरीनं डोळे पुसत प्रश्न केला.

"इथं ठेवण्याचं आश्वासन मी देऊ शकणार नाही. पण कारण जर पटण्याजोगं असलं तर सोशल सर्व्हिसमार्फत तुला दुसऱ्या घरी पाठवण्याची व्यवस्था जरूर करीन."

त्यानंतर शेरीनं जे काही सांगितलं ते ऐकून मी चांगलीच हादरले. तिचा मामा ड्रग डीलर होता. तो स्वतः व्यसनाधीन तर होताच, पण ड्रग्ज घेण्याबाबत तिलाही सक्ती करत होता. शेरीनं ड्रग्ज घेण्यास नकार दिला होता. आईवडिलांकडे तक्रार करून काहीही फायदा नव्हता. कारण मामांकडून त्यांना भरपूर पैसे मिळत असत. त्यामुळे मामाला दुखावायला ते तयार नव्हते. शेरीला भीती वाटायची ती त्याच्या ड्रग्जची नाही, तर त्याची. तो तिला नको तिथं हात लावत असे, अचकट-विचकट विनोद सांगत असे. काही दिवसांपूर्वी रात्री तिच्या खोलीत येऊन तिच्या शेजारी तिच्या बिछान्यावर झोपायलाही त्यानं कमी केलं नाही. ती घाबरून ओरडताच तिला वाईट स्वप्न पडलं असेल म्हणून पाहण्यास तिच्या खोलीत शिरल्याचं त्यानं तिच्या आईला सांगितलं. शेरी त्या प्रसंगानंतर आपली खोली लॉक करून झोपू लागली. त्यानं तिला जवळ ओढून तिचा मुका घेण्याचाही प्रयत्न अनेकदा केला होता.

शेरीची कहाणी ऐकून घरी जाण्यासाठी ती का नाराज असते याची कल्पना आली. मी लगेच सोशल सर्व्हिसेसच्या ऑफिसचा फोन फिरवून त्यांना शेरीची हकीगत कळवली. त्यांनी सर्व चौकशी करून लवकरच निर्णय कळवण्याची

हमी दिली. त्यांचा चार तासांनंतर दुपारी तीन वाजता फोन आला, 'शेरीवर विश्वास ठेवू नये. शेरीला कारणाशिवाय तक्रार करण्याची सवय आहे. सर्व चौकशीअंती तिच्या घरी काही गैर घडत नसल्याबद्दल आमची खात्री पटली आहे. तिला घरी पाठवून द्यावं.'

मी बुचकळ्यात पडले. माझा शेरीवर विश्वास बसत होता. हॉस्पिटल तिला ॲडमिट करण्यास तयार नव्हतं. केवळ घरी पाठवू नये म्हणून ती आत्महत्येची धमकी देत आहे, ती आत्महत्याप्रवण अगर दुसऱ्यास धोकादायक नाही म्हणून तिला ॲडमिट करण्यास नकार मिळत होता. नाइलाजानं मी ज्युव्हेनाईल कोर्टाच्या जज्ज स्टीव्हन्सह्यांचा फोन नंबर फिरवला. त्यांनीही आपण स्वतः या बाबतीत काही करण्यास असमर्थ असल्याची कबुली देऊन पुन्हा सोशल सर्व्हिसेसच्या मागे लागण्याचा सल्ला दिला. बोर्ड ऑफ एज्युकेशननंही तोच सल्ला दिला. सोशल सर्व्हिसेसच्या ऑफिसमधली सोशल वर्कर तिला घरी पाठवून द्या म्हणून आग्रह करत होती. मी मात्र मधल्या मधे अडकले होते. शेरी घरी जाणार नाही म्हणून हट्ट धरून बसली होती. माझी सदसद्विवेकबुद्धी शेरीला घरी पाठवण्यास विरोध करत होती. ह्या वेळपर्यंत शाळेच्या बसेस निघून गेल्या होत्या. मी सहाच्या सुमारास तिच्या आईला फोन करून तिला घरी घेऊन जाण्याची विनंती केली. 'तुमच्या बेजबाबदारपणामुळे तिची बस चुकली, तेव्हा तिला घरी पोचवण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. शिवाय, तिची घरी येण्याची इच्छा नाही तेव्हा तिला तिथंच ठेवलंत तरी आमची मुळीच हरकत नाही' असं सांगून त्यांनी फोन बंद केला.

शेरी हमसून हमसून रडत होती. घरी गेल्यास चांगला मार खावा लागणार याबद्दल तिची खात्री होती. शिवाय, मामाचा खवीस घराच्या दारात उभा होताच! ती घरी पाठवू नका म्हणून मला काकुळतीनं विनवत होती. मी असा प्रसंग माझ्यावर आणल्याबद्दल देवाला दोष देत होते. त्याच वेळी, काहीतरी चमत्कार करून तिची दुसरीकडे राहण्याची व्यवस्था कर म्हणून त्याची मनोभावे प्रार्थना करत होते. परंतु माझी श्रद्धा अपुरी पडत होती. शेवटचा उपाय म्हणून सोशल सर्व्हिसेसच्या इमर्जन्सी नंबरवर फोन केला. परंतु तिथंही पदरी निराशा आली. कोणालाही नकोशा झालेल्या या मुलीला देवही दूर लोटत होता.

मी आठ वाजण्याच्या सुमारास गावातल्या पोलिस स्टेशनला फोन करून त्यांना सविस्तरपणे सर्व हकीगत सांगितली. शेरीला घरी नेण्यासाठी दोन

पोलिस व एक स्त्री पोलिस ह्यांची मदत द्यावी अशी विनंती केली. आम्ही, रडणाऱ्या शेरीसह साडेआठच्या सुमारास तिच्या घरापाशी पोचलो. पोलिसांनी शेरीच्या दोन्ही हातांना धरून, तिच्या घराच्या प्रवेशद्वाराशी जाऊन घराची घंटा वाजवली. उघडलेल्या दरवाज्यात मामा दृष्टीस पडताक्षणी पोलिसांच्या हाताला हिसडा मारून शेरी मागे पळाली. गाडीजवळ उभ्या असलेल्या पोलिसानं तिला पकडलं आणि आईवडिलांच्या स्वाधीन केलं. हीच शेरीची व माझी अखेरची भेट.

मी पुन्हा ऑफिसमध्ये जाऊन, शेरीबद्दल सविस्तर रिपोर्ट लिहून घरी परतले. कसेबसे दोन घास खाऊन बिछान्यात कोसळले. झोप लागणं शक्य नव्हतं. मदत करण्यासाठी आपले हात किती कमजोर आहेत याची जाणीव होऊन हुंदके देत राहिले.

अपेक्षेप्रमाणे शेरी दुसऱ्या दिवशी शाळेत आली नाही. तिसऱ्या दिवशी दुपारी तिचा मला ऑफिसमध्ये फोन आला. तिनं मी केलेल्या मदतीबद्दल, दिलेल्या प्रेमाबद्दल माझे आभार मानले. मला फार त्रास दिल्याबद्दल दिलगिरीही व्यक्त केली. माझ्या हातात असतं तर मी नक्की तिला घरी पाठवलं नसतं याबद्दल तिला खात्री वाटत असल्याचं तिनं कबूल केलं. तिच्याकडून दुसऱ्या दिवशी शाळेत येण्याचं वचन घेऊन मी फोन ठेवला, पण माझ्या मनात कुठेतरी पाल चुकचुकली.

शेरीशी माझं बोलणं झालं ते गुरुवारी. शेरी वचन दिल्याप्रमाणे, शुक्रवारी शाळेत आली नाही. ती सोमवारी शाळेत न आल्यास घरी फोन करण्याचं व सोशल सर्व्हिसेसच्या सोशल वर्करला तिच्या घरी पाठवून तिची चौकशी करण्यास सांगण्याचं मी मनात ठरवलं. सबंध आठवड्यात फार मानसिक ताण झाल्यामुळे निदान वीकएण्डपुरतं तरी शेरीला विसरून जावं असं मनाला बजावण्याचा अयशस्वी प्रयत्न मी करत होते. दिवसभर काही ना काही कामात मन गुंतल्यामुळे तिचा विसर पडणं शक्य झालं होतं. रात्री बिछान्याला पाठ टेकताच शेरी डोळ्यांसमोरून हलत नव्हती.

"मला सोशल सर्व्हिसेसच्या ऑफिसची, त्यांच्या डिरेक्टरची, सोशल वर्कर्सची, सर्व यंत्रणेची चीड आली होती. केवळ आईवडिलांच्या थापांना, त्यांच्या तोंडदेखल्या नम्र वागणुकीला भुलून ही मंडळी या छोट्या पोरीच्या आक्रंदनाकडे दुर्लक्ष करत होती. तिची पूर्वीची वागणूक लक्षात ठेवून तिच्या कोणत्याही तक्रारीवर विश्वास ठेवण्यास ही मंडळी तयार नव्हती. डिपार्टमेंटचा

पैशांचा पुरवठा कापण्यात आल्यामुळे सोशल वर्कर्सचा तुटवडा होता. डिपार्टमेंटचा शक्यतो कमी केसेस हातात घेण्याकडे कल होता व त्यासाठी अशा तऱ्हेची काहीही किंमत मोजण्याची त्यांची तयारी होती!

रविवारी दुपारी घरातली सर्व कामं आटोपून मी आरामखुर्चीत अंग झोकून दिलं व वाचण्यासाठी वर्तमानपत्र उघडलं. भरपूर जाहिराती व धक्का देणाऱ्या जवळजवळ त्याच त्या बातम्या पाहून मी ते खाली ठेवलं. माझा डोळा लागला असावा. जवळच पेपर वाचत बसलेल्या माझ्या मुलाच्या ओरडण्यानं मला जाग आली. "आई, ही बातमी वाच. बारा-तेरा वर्षांची एक मुलगी शुक्रवारी दुपारी आपल्या घराजवळच्या रस्त्यावर एका गाडीचा धक्का लागून मरण पावली. शाळेच्या दिवशी बारा-तेरा वर्षांची मुलगी शाळेत न जाता घरासमोरच्या रस्त्यावर काय करत होती? आईवडील कुठे असतात या मुलांचे?"

मी त्याच्या हातून पेपर जवळजवळ हिसकावून घेतला. बातमी वाचताच माझ्या डोळ्यांसमोर अंधेरी आली. मी ज्याला घाबरत होते तो माझा तर्क खरा ठरला होता. ती मुलगी दुसरी-तिसरी कोणी नसून शेरी होती. तिनं आत्महत्येबाबत दिलेली धमकी ही धमकी नसून तो तिचा पक्का विचार होता आणि तिनं तो पुराही केला होता. या दोन दिवसांत तिच्या घरात काय घडलं असेल हे तिचं तीच जाणे! काहीतरी भयंकर घडलं होतं खास!

एक दीर्घ सुस्कारा सोडून मी डोळे टिपले व वकीलसाहेबांना टेपरेकॉर्डर बंद करण्याची खूण केली.

श्रीयुत ॲडलर यांच्या चेहऱ्यावर विषण्ण भाव होते. ड्रायव्हर मुलगा सॅम रिचर्डसन गप्प बसला होता. आपल्या गाडीचा धक्का लागून मरण पावलेल्या त्या मुलीनं आत्महत्या केली होती हे त्याला आज प्रथम समजलं होतं. त्याची वाचाच जणू बंद झाली होती.

घसा खाकरून डेव्हिड ॲडलर ह्यांनी कोर्टात मला कोणत्या प्रकारचे प्रश्न त्यांच्याकडून विचारण्यात येतील व फिर्यादीच्या वकिलाकडून कोणत्या प्रकारच्या प्रश्नावलीची अपेक्षा करावी हे समजावून सांगितलं. मीही त्यांना सोशल वर्करला व आमच्या हॉस्पिटलच्या सायकॉलॉजिस्टला साक्षीदार म्हणून बोलावण्याचा सल्ला दिला. त्यामुळे माझ्या साक्षीला दुजोरा मिळाला असता.

ज्या दिवशी केस कोर्टात आली त्या दिवशी शेरीचे आईवडील व मामा उपस्थित होते. कोर्टरूमच्या बाहेरच्या बाकावर बसून ती तिघं; चर्चा करत होती. माझ्याकडे नजर वळताच ती तिघंही चपापली. मी साक्षीला येईन ही त्यांची अपेक्षा नसावी.

अपेक्षेप्रमाणे केसचा निकाल आरोपीच्या बाजूनं देण्यात आला. शेरीच्या केसबाबत सोशल सर्व्हिसेस डिपार्टमेंटची चौकशी व्हावी असा कोर्टानं आदेश दिला तेव्हा माझा आनंद द्विगुणित झाला!

माझं मन आतून ओरडत होतं, की शेरीच्या आईवडिलांना व मामांना गाठून सांग, की "तो गाडीचा ड्रायव्हर शेरीच्या मृत्यूला कारणीभूत झाला असला तरी तुम्ही तिघांनी मिळून तिचा खून केला आहे व त्याची सजा तुम्हाला सर्वात मोठ्या न्यायाधीशाकडून मिळाल्याखेरीज राहणार नाही."

◆◆◆

# घराची ओढ

घामानं डबडबलेल्या चेहऱ्याचा, विखुरलेल्या केसांचा, किरकोळ अंगयष्टीचा तो मुलगा भर उन्हात हायवेच्या कडेला हनुवटी हातावर व कोपर गुडघ्यावर टेकवून आपल्या सूटकेसवर बसला होता. रस्त्यावर गाड्यांची फारशी रहदारी दिसत नव्हती. तरीसुद्धा त्याची आतुर नजर रस्त्यावर लागली होती.

त्याच्या मनात फार दिवसांपासून पत्र लिहिण्याचा विचार घर करून होता. परंतु आज, ते पत्र लिहिण्यास तो उत्सुक झाला होता. ते पत्र लिहिणं म्हणजे आपल्या जवळच्या व्यक्तीशी बातचीत करण्यासारखं त्याला वाटत होतं.

झिपर ओढून त्यानं सूटकेस उघडली व तळाला हात घालून एक नोटपॅड बाहेर काढलं. सूटकेसचा वापर टेबलासारखा करून खिशातून काढलेल्या पेननं तो पॅडवर लिहू लागला;

प्रिय,.... प्रिय आई,

आतापर्यंत डॅडचा माझ्यावरील राग गेला असला आणि त्यांनी परवानगी दिली तर घरी परतण्याची माझी इच्छा आहे. परंतु डॅड परवानगी देण्याची शक्यता कमी आहे हे मी जाणून आहे. मी घर सोडण्यापूर्वी त्यांनी एकदा मला सुनावलं होतं, की जर घरातून पळून जाण्याचा मी प्रयत्न केला

तर मला आयुष्यभर पळतच राहावं लागेल!

मी ज्यावेळी घराबाहेर पडलो त्यावेळी तसं करणं माझ्या दृष्टीनं जरुरीचं होतं. कॉलेजमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी जीवन ही काय चीज आहे हे जाणून घेण्याची गरज मला भासत होती. मला जे सांगायचं आहे ते ऐकून डॅडच्या, अगोदरच दुखणाऱ्या जखमेची खपली निघण्याची शक्यता आहे. परंतु त्यांना माझा एवढा निरोप जरूर दे. माझ्या यशस्वी जीवनाचं कॉलेज हे उत्तर आहे ह्याबद्दल माझी अद्याप खात्री पटलेली नाही. कॉलेज व करियर ह्यांच्या बाबतीत विचार करण्यासाठी मला अजून काही अवधी हवा आहे.

मला स्वतःचा पत्ता नसल्यामुळे तू मला पत्र पाठवू शकणार नाहीस. मी ह्यानंतर कुठे अशीन ह्याची मलाही कल्पना नाही. तरी येत्या काही अवधीत मी आपल्या घराजवळून जाईन. डॅड जर मला घरात घेण्यास तयार असेल तर आपल्या घरामागे, ट्रेन ट्रॅक्सच्या बाजूला असलेल्या सफरचंदाच्या झाडाला, मला ट्रेनमधून सहजपणे दिसेल अशी सफेद रिबन बांधायला सांग. ट्रेनमधून जाताना जर तशी रिबन मला दिसली नाही, तर मी डॅडबद्दल न रागावता पुढे निघून जाईन.

तुझाच,
डेव्हिड

त्या दिवशीची संध्याकाळ त्याला बरीच आक्रमक असल्यासारखी वाटली. एकमेकांत मिसळून अडकलेले ढग युद्ध करत असल्याप्रमाणे गर्जना करत एकमेकांवर आदळत होते. त्यातून निघणारा विजेचा लोळ व कान भेदून टाकणारा आवाज काही कारणास्तव आज प्रथमच त्याला भयभीत करत होता.

आभाळातून सूर्य नाहीसा झाल्यामुळे त्याला वाईट वाटलं. तो उदास झाला. त्याला एकाएकी अनामिक हुरहूर वाटू लागली. तिन्हीसांजेच्या वेळी अंधार पडायला सुरुवात होताच एकाकीपणा जवळ येऊ लागतो व हळुहळू व्यापून टाकतो हे त्याला आता अनुभवानं ठाऊक झालं होतं.

रस्त्यावर आता ट्रॅफिक वाढू लागला होता. एकामागोमाग येणाऱ्या गाड्यांच्या दिव्यांनी हायवेचा डॉमिनो करून टाकला होता. गाड्यांचे दिवे त्याच्या शरीरावरून पुढे जाऊ लागले तेव्हा त्यानं नाखुषीनं आपल्या उजव्या हाताचा अंगठा लिफ्ट मिळवण्यासाठी ड्रायव्हरांना दाखवण्यास सुरुवात केली. त्याच्या अंगावरून एकापाठोपाठ एक गाड्या निघून जात होत्या. गाड्यांच्या मागचे लाल दिवे जणू

त्याचा अपमान करण्यासाठी त्याच्या चेहऱ्यावर आपला ठसा उमटावून ठेवत होते.

बऱ्याच वेळानं येत असलेल्या एका गाडीकडे तो आपल्या लाकडासम कोरड्या, थंड नजरेनं पाहत असताना एकाएकी गाडीचे मागचे लाल दिवे गडद झाले. ती गाडी ब्रेक्सचा जोरात आवाज करत थोडी पुढे जाऊन रस्त्याच्या कडेला उभी राहिली. ती गाडी गाठण्यासाठी तो धावत असताना, गाडी जवळ येऊ लागली तसा स्वप्नात असल्याप्रमाणे लाल रंग त्याच्या सर्वांगभर पसरू लागला!

एखाद्या थकलेल्या पोहणाऱ्याला मदतीचा हात मिळावा त्याप्रमाणे त्या गाडीचा दरवाजा त्याच्यासाठी धाडकन उघडला गेला.

"आत बस, मुला" आतला घोगरा आवाज त्याला सतत उन्हात काम करणाऱ्या शेतकऱ्याच्या आवाजासारखा वाटला. "मी तुला न पाहताच निघून जाणार होतो, काळोखात तू दिसलाच नाहीस."

"थँक्स, मिस्टर."

"काळजी करू नकोस. मीसुद्धा लहान असताना अनेक वेळा रस्त्यावर अंगठा वापरला आहे."

"तुम्ही किती दूर जाणार आहात?" डेव्हिडनं त्या गृहस्थाला प्रश्न विचारला.

त्या माणसानं दोनशे मैल दूर असलेल्या आयोवा राज्यातील एका गावाचं नाव सांगितलं. अजून बराच लांबचा पल्ला आहे हे जाणून डेव्हिडने खुर्चीला निःशंकपणे पाठ टेकवली.

"तू कुठं जायला निघालास?"

डेव्हिडने त्याच्याकडे रोखून पाहिलं. त्याचं नाक चेहऱ्याच्या मानानं बरंच मोठं असल्यासारखं त्याला वाटलं. त्याचा चेहरा रुंद असला तरी त्याच्या नजरेत मार्दव होतं व चेहरा सभ्य वाटत होता. त्यात फारसं सौंदर्य नव्हतं. तो रुक्ष व कणखर वाटला तरी त्यात मित्रत्वाची, सौजन्याची झाक होती. त्यानं डेव्हिडचा ह्या अवस्थेतही स्वीकार केला होता.

डेव्हिडने गाडीच्या खिडकीतून हायवेकडे प्रेमपूर्वक नजरेनं पाहिलं. त्याच्या मनात आलं, की ही लांबवरची सफर एका चांगल्या साथीदाराच्या सहवासात घालवता येईल.

"मी घरी चाललो आहे." तो गालातल्या गालात हसत म्हणाला.

"घर कुठे आहे तुझं?"

"मेरिलँडला. बाल्टिमोरपासून तीस एक मैलांवर आमचं शेत आहे."

"तू कुठं गेला होतास? कुठून घरी परत जात आहेस?'

"वेस्ट कोस्टला गेलो होतो. मेक्सिकोत जाण्याची इच्छा होती. पण जमलं नाही."

"आणि आता बऱ्याच दिवसांनी घरी परत चालला आहेस का?" त्या माणसाच्या आवाजात असा काही सूर होता, की त्यानंही घराबाहेर पडण्याचा असाच अनुभव घेतला असावा.

"येस सर."

मागच्याच आठवड्यातल्या एका आठवणीनं डेव्हिड स्वतःशी कडवटपणे हसला. सॅन योक्विन व्हॅलीमध्ये तो झाडावरची द्राक्षं तोडण्याचं काम करत होता. सूर्य आपल्या नेहमीच्या सवयीप्रमाणे दयामाया न दाखवता तळपत होता. दाहक उष्णतेमुळे द्राक्षांच्या झाडांची पानं वाकली होती. अनेक कामगारांनी उन्हापासून रक्षण करण्यासाठी डोक्याला स्कार्फ बांधला होता. कामगारांच्या बुटांच्या वजनामुळे त्यांच्या पायांखालची धूळसुद्धा शक्तिहीन वाटत होती. डेव्हिडने खाली वाकून वाळूत रुतलेल्या आपल्या पायांकडे नजर वळवली. गेले चार तास आपण पायांकडे पाहिलंसुद्धा नाही हे त्याच्या ध्यानी आलं. तो अचानक थांबला व त्याने आपण कितपत प्रगती केली आहे हे अजमावण्यासाठी मागे वळून पाहिलं. तो फारतर पन्नास यार्ड चालून आला असेल.

अर्ध्या भरलेल्या आपल्या टोपलीतल्या कातरीचा आवाज त्याच्या कानांवर पडला; निदान त्याला तसा भास झाला. त्याबरोबर फोरमनचा प्रश्न त्याला ऐकू आला, 'ए, कुठे निघालायस तू? लंच टाईमला अजून बराच अवकाश आहे.' डेव्हिडने आपल्या धुळीनं माखलेल्या पायांकडे पुन्हा पाहिलं. त्याचे पाय जितके दूर पळू शकतील तितके दूर पळत होते व त्याची पावलं त्याच्यामागे धूळ उडवत होती. तो केलेल्या कामाचे पैसे घेण्यासाठीही थांबला नाही. तो जेव्हा हायवेजवळ पोचला तेव्हा त्याला मागे टाकून गाड्या पळत होत्या. त्यांना थांबवण्यासाठी त्यांच्या पुढे जाऊन उभं राहणं एवढंच काय ते त्यानं बाकी ठेवलं होतं.

"हां," गाडीचा ड्रायव्हर म्हणाला तेव्हा डेव्हिडची तंद्री भंग पावली. "मला ठाऊक आहे हे सर्व कसं असतं ते." हसण्यासाठी त्याच्या पापण्यांचे कोपरे आवळले गेले, परंतु तो हसला नाही. "मीही असाच हायवेजवळून पळत

होतो कोणे एके काळी. सारखं धावत असल्यामुळे पायांखाली गवत उगवू देत नव्हतो. पण ते उगवावं असं अनेक वेळा मनातून इच्छित मात्र होतो.''

''मग?'' डेव्हिडनं विचारलं. ''तुम्ही परत घरी गेला का?''

''नाही. घरी परतण्यासाठी मला तुझ्यासारखं घरच नव्हतं. रस्ता हेच माझं एकुलतं एक घर होतं. मी फार लहान असताना माझे आईवडील कारच्या अपघातात वारले होते.''

''अरेरे! फार वाईट झालं.'' डेव्हिड इतक्या कळवळ्यानं म्हणाला, की त्या माणसानं मान वळवून त्याच्यावर दृष्टी फेकली.

डेव्हिड रात्रीच्या अंधाराकडे डोळे फाडून पाहत होता. आपण त्याच्या विचारात कदाचित व्यत्यय आणू या जाणिवेनं त्या गृहस्थानं आवाजात मार्दव आणून त्याला हळुवारपणे म्हटलं, ''तुला झोपेची फार गरज असावी असं वाटतंय.''

''तुम्हाला जागं ठेवण्याकरता माझी गरज तर नाही लागणार?'' डेव्हिडनं विचारलं.

''माझी मुळीच काळजी करू नकोस. मी रात्रीच्या वेळी गाडी चालवणं जास्त पसंत करतो. तू सीटच्या मागे डोकं टेकून झोपण्याचा प्रयत्न कर.''

''ठीक आहे. तुम्ही म्हणता आहात तर झोपतो. तुम्हाला काही मदत लागल्यास मला जरूर उठवा. तुमच्या साहाय्याबद्दल मी तुमचा ऋणी आहे.''

गाडीचा वेग एकाएकी मंदावल्यामुळे डेव्हिडला जाग आली. गाडी हायवे सोडून एका शहरात शिरत होती. तो सरळ होऊन बसला व आतापर्यंत विसर पडलेलं पत्र खिशात आहे का हे त्यानं चाचपून पाहिलं.

''सर, तुम्ही जरा पोस्टाच्या पेटीजवळ गाडी थांबवू शकाल का? मला हे पत्र पेटीत टाकायचं आहे. पत्र माझ्या आधी घरी पोचावं अशी माझी इच्छा आहे.''

''जरूर,'' तो गृहस्थ उत्तरला व त्यानं थोड्याच वेळात एका मेलबॉक्सजवळ गाडी उभी केली. डेव्हिड पत्र पेटीत टाकून पुन्हा गाडीत येऊन बसला तेव्हा तो गृहस्थ त्याला म्हणाला, ''तुझं पत्र मिळताच तुझ्या आईवडिलांना नक्की आनंद होईल.''

''तशी माझीही फार फार इच्छा आहे.'' खुर्चीला पाठ टेकवून त्यानं डोळे मिटून घेतले. दुसऱ्या दिवशीचा प्रवास डेव्हिडला फार कंटाळवाणा जाणवला. त्या राईडला तो 'शेतकऱ्याची राईड' समजू लागला. इथे थोडे मैल, तिथे थोडे

मैल व मधे दीर्घकाळ प्रतीक्षा.

त्यानं संध्याकाळी सिमेंटरोडवरचा प्रवास सोडून हळुहळू धापा टाकत जाणाऱ्या फ्रेट ट्रेनची संगत धरली. मिसिसिपी नदीवरच्या पुलावरून जाताना काही मिनिटं त्याला पाण्यावाचून काहीच नजरेस पडेना. फ्रेट ट्रेनच्या प्रवासात तोल सांभाळण्यासाठी तो डब्याबरोबर दोन्ही बाजूंना झुकू लागला तेव्हा त्याच्या नकळत त्याच्या दृष्टीसमोर गेले सात महिने उभे राहिले, झपाटलेले सात महिने.

वर्तुळात फिरणारा वेगवेगळ्या चेहऱ्यांच्या चक्राचा पाळणा – एकेक पुढे येऊन मागे पडणारे चेहरे. ट्रक ड्रायव्हरचे चेहरे, वेट्रेसेस, सेल्समन, पोलिस, दारुडे, बारटेण्डर्स, नोकरी मिळवून देणारे दलाल. या सर्वांचे विविध चेहरे. काही मैत्रीचा हात पुढे करणारे, दयाळू, शांत, तर काही गुन्हेगार, क्रूर, रागीट, त्याचा फायदा घेऊ पाहणारे.

ते चेहरे तो पुन्हा पाहू इच्छित नव्हता. त्यानं भोवळ आल्यासारखा त्यांचा अनुभव घेतला होता. ह्या क्षणी ती माणसं कुठे असतील ह्याची त्याला मुळीसुद्धा कल्पना नव्हती, पर्वा नव्हती. तो ह्यावेळी काय करत असेल याबद्दल त्यांनाही आस्था नव्हती. तो पूर्वेकडे आपल्या घरी निघाला होता. त्याच्या घरच्या माणसांनाही तो कुठे असेल ह्याबद्दल काही कल्पना नव्हती.

ट्रॅकच्या बाजूला असलेल्या घरांवर नजर जाताच त्याच्या डोक्यात गाडीच्या वेगानं चक्रं फिरू लागली. काय चाललं असेल बरं घरी ह्या वेळी? कसं असेल घर? पलीकडील पोर्च लाईट जळत असलेल्या घरासारखं की ह्या दुसऱ्या घरासारखं, जिथे पोर्च लाईट लागला नव्हता व खिडक्यांच्या पिवळ्या शेड्स खालपर्यंत ओढलेल्या होत्या.

आणखी दोन दिवसांनंतर, मेरिलँडच्या अगदी जवळ पोचेपर्यंत मागितलेल्या व मिळालेल्या राईड्स कमी कमी होत थांबल्या. जिथे गाड्या नजरेस पडल्या नाहीत तिथं तो चालला. त्याने काही काळानंतर थांबून अंगठा दाखवण्याचे परिश्रमही घेतले नाहीत. झपाटल्यासारखा तो चालू लागला.

मेरिलँड जवळ आल्यावर, पॅसेंजर ट्रेनमध्ये बसल्यानंतर आपल्या छातीचे ठोके वाढू लागल्याचं त्याला जाणवलं. आपण पुन्हा हायवेवर उलट दिशेनं धावावं असं त्याला वाटलं.

त्यांच्या नाकापासून फक्त तीन इंचांवर धुळीनं माखलेली खिडकी होती.

तो अगदी थोड्या वेळात त्यामधून आपल्या वडिलांच्या शेताकडे पाहणार होता. त्याच्या मनात दोन वेगवेगळी चित्रं धिंगाणा घालू लागली– पांढरी रिबन बांधलेलं झाड आणि एकही रिबन न बांधलेलं झाड. त्याचा कंठ हळुहळू शुष्क होऊ लागला व श्वास घेणं त्याला कठीण झालं. घरात आपलं स्वागत होवो-न होवो, निदान घर तरी पुन्हा नजरेस पडेल अशी मनाची समजूत तो घालू लागला. ओळखीच्या एकेक खुणा मागे टाकत शेत जवळ येऊ लागलं. मनात आलं तरी तो आता गाडी थांबवू शकत नव्हता. धापा टाकत जाणाऱ्या गाडीचा आवाज द्राक्षं कापत जाणाऱ्या कातरीसारखा त्याला भेडसावू लागला. आता स्थगित करता येण्याजोगं काही नव्हतं. सफरचंदाचं झाड पुढच्याच वळणावर होतं.

झाडाला रिबन बांधलेली नसेल या धास्तीनं डेव्हिड घाबरला होता आणि म्हणूनच, तो डोळे उघडे ठेवून खिडकीबाहेर पाहू शकत नव्हता. त्याच्याकडे टक लावून पाहणारं एखादं परकं झाड, शेत किंवा जागा आपल्याला वाकुल्या दाखवील म्हणून तो धास्तावला होता. तो खिडकीपासून चटकन दूर सरला.

तो पलीकडच्या सीटवर बसलेल्या एका पोरगेल्याशा पॅसेंजरच्या खांद्याला हलवत घाईघाईत म्हणाला, "मिस्टर, माझ्यावर जरा मेहेरबानी कराल का? बाहेर नजर टाकल्यास सफरचंदाचं एक झाड दिसेल. त्याच्या एका फांदीवर फीत बांधलेली असेल तर मला सांगाल का?" एवढं बोलून त्याने डोळे मिटून घेतले.

शेतं मागे टाकून गाडी थोडी पुढे आल्यावर डेव्हिडनं डोळे उघडून त्याला विचारलं, 'मिस्टर, रिबन दिसली का?' त्याच्या आवाजात कंप होता.

"मला तरी काही दिसलं नाही." त्या मुलाने रुक्ष आवाजात व तशाच चेहऱ्याने डेव्हिडची चेष्टा करण्यासाठी खोटंच सांगितलं.

स्टेशन जवळ आल्यामुळे गाडीचा वेग मंद होऊ लागला होता. आपला श्वासोच्छ्वास जवळजवळ बंद झाल्यासारखं डेव्हिडला वाटलं. हृदयाची धडधडही ऐकू येईनाशी झाली. तो एकदम हताश झाला व आपण काय करत आहोत हे कळण्यापूर्वी त्यानं दरवाज्याकडे धाव घेतली.

डेव्हिडच्या येण्याच्या वाटेकडे डोळे लावून बसलेल्या त्याच्या वडिलांनी फोनची घंटा वाजताच उतावीळपणे रिसीव्हर उचलला. फोनवर मिळालेली बातमी ऐकताच फोन त्यांच्या हातातून गळून पडला. फोन होली क्रॉस हॉस्पिटलमधून आलेला होता. डेव्हिड चालत्या ट्रेनमधून पडल्यामुळे त्याला

दुखापत झाली असून उपचारांसाठी होली क्रॉस हॉस्पिटलमध्ये नेल्याचं त्यांना सांगण्यात आलं होतं.

शुद्ध आली तेव्हा डेव्हिडला प्रथम जाणवलं ते आपण पाय हलवू शकत नसल्याचं. डोळे उघडताच प्रथम अंधुकपणे व नंतर स्पष्टपणे आपल्या वडिलांचा चेहरा त्याच्या नजरेसमोर उभा राहिला. त्याच्या दोन्ही पायांना मल्टिपल फ्रॅक्चर झालं होतं. त्याने वडिलांनी पुढे केलेले त्यांचे हात हाती घेतले व तो ढसढसा रडू लागला. डेव्हिडला त्याचे आईवडील परत मिळाले होते व तो त्यांच्याबरोबर आपल्या घरी जाणार होता याचाच त्याला आनंद होता.

सफरचंदाच्या झाडाला फक्त एक नव्हे तर सबंध झाड झाकलं जाईल एवढ्या आपण फिती लावल्या असूनही तो आत्महत्येला का प्रवृत्त झाला याचा उलगडा त्याच्या वडिलांना झाला नाही.

◆◆◆

# स्वतःची ओळख

वय असेल कोवळं, सोळा-सतराचं; तो रक्तबंबाळ होऊन पावसात रस्त्यावर पडला होता. त्याच्या अंगातल्या गडद-जांभळ्या रंगाच्या जॅकेटवर मागच्या बाजूला 'द जेट्स' असं लिहिलेलं होतं. जॅकेटच्या पुढच्या बाजूला हृदयाच्या जागी रेशमी धाग्यांनी 'होजे' असं त्याचं नाव लिहिलं होतं.

कुणीतरी दहा मिनिटांपूर्वीच त्याच्या शरीरात चाकू खुपसला होता. त्याचं शरीर बरगड्यांच्या खाली फाडून मांस बाहेर पडेल एवढ्या जोरात त्यांच्या पोटात चाकू खुपसला गेला होता. ज्यानं हे कृत्य केलं ती व्यक्ती आडदांड असावी.

एप्रिल महिन्यातल्या पावसामुळे अंधारलेल्या एका गल्लीत, रस्त्याच्या कडेला होजे पडला होता. त्याचं रक्त धुऊन टाकता टाकता पावसानं त्याचं शरीर व जॅकेट झोडपून काढलं होतं. चाकू अंगात शिरला तेव्हा असह्य वेदनांनी तो कळवळला होता. मारणाऱ्या व्यक्तीने तो चाकू अंगातून बाहेर काढला तेव्हा त्याला वेदनांतून अचानक सुटका झाल्यासारखं वाटलं. त्याच वेळी कुणाची तरी जड बुटांची पावलं दूर जाताना वाजत होती. अस्पष्ट होणारे शब्द त्याच्या कानी पडले होते, 'हे घे तुझं बक्षीस, जेट!' आणि तो रक्त थांबवण्याच्या प्रयत्नात पोट हातांनी दाबून धरत जमिनीवर कोसळला होता.

होजेनं मदतीसाठी ओरडण्याचा प्रयत्न करून पाहिला, परंतु त्याच्या तोंडून आवाज उमटेना. आपला आवाज अनपेक्षितपणे आपल्याला का सोडून गेला? पाऊस असा एकाएकी निर्दयपणे का झोडपू लागला? याचा उलगडा प्रयत्न करूनही त्याला होईना.

आता,रात्रीचे साडेअकरा वाजण्याचा सुमार होता.

आणखी एक गोष्ट त्याच्या ध्यानात येत नव्हती.

रक्तबंबाळ स्थितीत रस्त्याच्या कडेला पडलेला असताना त्याचं विचारचक्र चालू होतं, त्याचा झगडा निर्दय होता, क्रूर होता. ह्यावेळी त्यांनी त्याला चांगलंच नमवलं होतं. आपण मृत्यूच्या फार जवळ पोचलो आहोत ह्याचा त्याला अंदाज नव्हता. कळलं असतं तर तो कदाचित घाबरून गेला असता. अज्ञानाच्या पडद्याखाली, आपण अजूनही मदतीसाठी कोणाला तरी आवाज देऊ शकू या आशेवर तो रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. तो बोलण्यासाठी जेव्हा जेव्हा तोंड उघडण्याचा प्रयत्न करत असे त्यावेळी त्याच्या तोंडून तोंडातल्या रक्तामुळे फक्त बुडबुड्यासारखा आवाज येई. आपल्या असह्य वेदनांसह, कुणीतरी आपल्याला लवकरच शोधून काढील ह्या आशेवर मूळ स्थितीत तो जमिनीवर निश्चलपणे पडून राहिला.

त्याला रस्त्याच्या पलीकडे, गल्लीच्या टोकावर दूर कुठेतरी पावसानं भिजलेल्या रस्त्यावर गाड्यांच्या टायरचे आवाज अस्पष्ट ऐकू येत होते. त्याचा चेहरा फूटपाथला भिडला होता. त्याला पावसाच्या रेघांतही दूरवर निऑनच्या दिव्यांचे उघडझाप करणारे लाल-निळे-हिरवे भडक रंग अंधुकसे दिसत होते.

मारिया आपल्यावर चिडली तर नसेल ना? होजे विचार करू लागला. धूम्रपानाची तलफ आल्यामुळे, सिगारेटचं पाकिट खरीदण्यासाठी पार्टीमध्ये मारियाबरोबर नाचत असताना तो पार्टीतून मधेच, एकाएकी बाहेर पडला होता. दहा-बारा मिनिटांत परत येण्याचं त्यानं तिला आश्वासन दिलं होतं. त्याला बाहेर आल्यावर जवळचं कॅण्डी स्टोअर बंद झाल्याचं कळलं. पुढच्या नाक्यावरचं 'आल्फ्रेडोज' नक्की उघडं असेल ह्याबद्दल त्याची खात्री होती. म्हणून तो त्या रोखानं झटपट पावलं उचलू लागला. गल्ली ओलांडून पलीकडे जाण्यासाठी गल्लीत शिरला. वीस-पंचवीस पावलं पुढे गेला असेल त्याचवेळी त्याच्यावर हा प्राणघातक हल्ला झाला.

दूरवरून येणारे संगीताचे स्वर आता त्याच्या कानांवर पडू लागले. तेव्हा मारिया अजूनही नाचत असेल का, असल्यास कोणाबरोबर नाचत असेल,

आपण अद्याप का परतलो नाही म्हणून ती आपला शोध घेईल का? असे प्रश्न त्याच्या मनात गर्दी करू लागले. कदाचित आपण परत येणार नाही असं तिला वाटत असेल का? की पार्टी सोडून ती आपल्या घरी गेली असेल? त्याच्या नजरेसमोर तिचा चेहरा उभा राहिला.... ऑलिव्ह वर्ण, काळेभोर केस, डोळ्यांतली चमक. मारियाचा विचार मनात येताच त्याला आपल्या वेदनांचा, वाहणाऱ्या रक्ताचा काही क्षण विसर पडला. पुढे कधीतरी मारियाशी लग्न करण्याचा विचार त्याच्या मनात डोकावला. मुलं झाल्यावर ही वस्ती सोडून जाण्याचं त्यानं ठरवलं. आपली मुलं ड्रग्ज व दारू ह्यांनी ग्रासलेल्या ह्या वातावरणात वाढवण्याची त्याची मुळीच इच्छा नव्हती.

त्याला गल्लीच्या टोकाशी कोणाची तरी पावलं वाजल्याचा भास झाला. त्यानं महत्प्रयासानं जमिनीवरून आपला गाल उचलण्याचा प्रयत्न केला. चेहरा थोडा वर उचलून कोणी दिसतं का हे पाहण्यासाठी व ओरडण्यासाठी त्याने परिश्रम घेतले. परंतु ह्या वेळीही फक्त घशातल्या रक्ताच्या बुडबुड्यांचा आवाज बाहेर पडला.

एक माणूस ह्या वेळी गल्लीत शिरला होता. त्यानं अजून होजेला पाहिलं नव्हतं. त्यानं हळुहळू पावलं उचलली व थोडं पुढे येऊन विटांच्या बिल्डिंगला पाठ टेकून तो काही क्षण उभा राहिला. तशा स्थितीत त्याची नजर होजेवर पडली. तो होजेजवळ आला व त्याच्यावर थोडा वाकून त्याच्याजवळ उभा राहिला. काळ मिनिटा-मिनिटानं पुढे सरकत होता. त्या माणसानं मात्र काहीही बोलण्याचा प्रयत्न केला नाही.

तो एकदम म्हणाला, “काय झालं, मित्रा?”

होजे प्रयत्न करूनही हलू किंवा बोलू शकला नाही. त्यानं त्या माणसाकडे पाहण्याचा प्रयत्न केला, तेव्हा पावसाच्या ओल्या वासात त्याला वस्कन दारूचा वास आला. त्याला मळमळू लागलं. तो माणूस दारूच्या नशेत होता. तो नशेत असल्याचं कळल्यावर मात्र होजेची फार निराशा झाली. पण तो घाबरला नाही किंवा आपण मरणाच्या उंबरठ्यावर आहोत असं त्याला अजूनही वाटलं नाही.

एकाएकी तो माणूस मोठ्यानं हसू लागला.

“तू पडलास का, पार्टनर?” त्यानं विचारलं. “तूसुद्धा माझ्यासारखाच नशेत आहेस,” तो हसत म्हणाला. अचानक, त्याला आपण गल्लीत का शिरलो ह्याची आठवण झाली असावी. “तू इथून जाऊ नकोस”, तो होजेला

म्हणाला, “मी लवकरच परत येतो.”

तो माणूस घाईघाईत निघून गेला. काही क्षणांतच होजेला कोणीतरी कचऱ्याच्या डब्यावर आदळल्याचा आवाज ऐकू आला व पाठोपाठ त्या माणसाच्या तोंडच्या शिव्याही त्याच्या कानांवर पडल्या. होजे त्याच्या परतण्याची मोठ्या आशेनं वाट पाहू लागला.

आता, पावणेबारा वाजत आले होते.

तो माणूस परत आला व होजेच्या शेजारीच जमिनीवर टेकला. तो होजेकडे मान वळवून म्हणाला, “तू इथं असा पावसात पडून राहिलास तर तुला सर्दी होईल. असं ओल्या जमिनीवर पडून राहण्यात तुला काय मजा वाटते?”

उत्तर देणं अर्थात होजेला शक्यच नव्हतं.

होजेच्या चेहऱ्यावर नजर स्थिर करत त्या दारुड्यानं विचारलं, “तुला माझ्या बाटलीतलं थोडं ड्रिंक हवंय का?”

होजेनं नकारात्मक मान हलवण्याचा मोठ्या मुष्किलीनं प्रयत्न केला.

“माझ्याकडे भरलेली बाटली आहे. मी आताच विकत घेतली,” असं म्हणत त्यानं आपल्या खिशातून बाटली काढून उघडली व होजेच्या समोर धरली. होजेनं पुन्हा हलण्याचा प्रयत्न करून पाहिला, परंतु वेदनांनी त्यावर मात केली.

“घे.” दारुडा म्हणाला. होजे हलला नाही तेव्हा, “काही हरकत नाही, तुला नको असेल तर मी स्वतः संपवीन” असं म्हणत त्याने बाटली तोंडाला लावली. शर्टाच्या बाहीनं तोंडं पुसत तो पुढे म्हणाला, “दारू प्यायला तू अजून बच्चा आहेस. दारू पिऊन असा तर्र होण्याची शरम वाटली पाहिजे तुला. थांब, मी आता पोलिसांना घेऊन येतो.”

होजेनं मान डोलावली. हो, प्लीज, लवकर घेऊन ये पोलिसांना - त्यानं बोलण्याचा असफल प्रयत्न करून पाहिला.

“पोलिसांनी या नशिल्या स्थितीत तुझा शोध घ्यावा हे तुला आवडत नाही ना? पोलिसांनी तुला या स्थितीत पाहू नये असं वाटतं ना तुला? सोडतो मी तुला. तू लकी ठरलास बाबा.” तो लडखडत उठून उभा राहिला व हवेत हात उडवत होजेला बाय बाय करून निघूनही गेला.

“थांब, थांब, जाऊ नकोस. मी नशेत नाही.” होजेनं बोलण्याचा निष्फळ प्रयत्न केला.

तो पडल्या पडल्या पुन्हा मारियाचा विचार करू लागला. “मारिया,

मारिया, कुठे आहेस तू?'' एक जोडपं त्याच वेळी गल्लीत शिरलं. ती दोघं पावसापासून सुटका होण्यासाठी पळत होती. त्यातल्या मुलानं त्या मुलीचा हात पकडला होता व ती मुलगी वर्तमानपत्र डोक्यावर धरून आपली केशरचना पावसापासून वाचवण्याच्या प्रयत्नात होती. पेवमेंटच्या बाजूला वेडावाकडा पडून होजे, त्यांना हसत हसत वळताना पाहत होता. ती दोघं त्याच्यापासून नऊ-दहा फुटांवर असलेल्या इमारतीच्या पायऱ्यांवर उभी होती.

''केवढा हा धो धो पाऊस! वाहून जायला होईल,'' तो म्हणाला.

''मला घरी गेलं पाहिजे. आधीच खूप उशीर झालाय, फ्रेडी.''

''अजून थोडा वेळ आहे,'' फ्रेडी म्हणाला, ''थोडा अधिक वेळ झाला तर तुझे आईवडील काही म्हणणार नाहीत, निदान या अशा हवेत तरी नाही.''

''इथं किती काळोख आहे बघ,'' ती खुदुखुदू हसत म्हणाली.

''हो.'' त्याच्या आवाजात मार्दव होतं.

''फ्रेडी. . .''

''हूं.''

''तू मला खेटून उभा आहेस.''

''हूं.''

काही क्षण स्तब्धता होती. नंतर तिचा आवाज उमटला, ''ओह.''

एकच शब्द. पण होजेला उमजलं, की फ्रेडीनं तिचं चुंबन घेतलं असावं. त्याला मारियाची फार याद आली व त्याच वेळी आपण मृत्यूच्या दारी तर उभे नाही ना ह्याबद्दल प्रथमच त्याला शंका वाटू लागली.

शक्य नाही, त्यानं विचार केला. मी मरणं शक्यच नाही. रस्त्यावरच्या अशा छोट्याशा हल्ल्यात तर मुळीच नाही. अशा छोट्याशा आघातानं मी मरणं अशक्य आहे. गँगमधले कित्येक जण रोज कुठे ना कुठे तरी कापले जातात. मरणाचा विचार करणंही वेडेपणाचं आहे.

''असं नको करूस.'' तिची सूचना.

''का बरं?''

''मला नाही ठाऊक.''

''माझं तुझ्यावर जिवापलीकडे प्रेम आहे, अँजी.''

ते ऐकून मनातल्या मनात होजे म्हणाला,

''माझंही तुझ्यावर फार प्रेम आहे, मारिया.''

त्याला एकदा वाटलं, की आपण मृत्युपंथावर आहोत की काय!

होजेनं पुन्हा एकदा बोलण्याचा व हलण्याचा प्रयत्न करून पाहिला. ती दोघं उभी असलेल्या पायऱ्यांजवळ सरपटत जाण्याचा त्याचा प्रयत्नही असफल ठरला. काहीतरी आवाज करण्यासाठी त्यानं तोंड उघडलं, परंतु आवाज उमटला नाही. त्याच्या घशातून फक्त गुरगुरण्याचा आवाज बाहेर पडला. त्यांने पुन्हा प्रयत्न करून पाहिला, तेव्हा मात्र वेदनांमुळे घशातल्या गुरगुरण्याचा जरा मोठ्यानं आवाज झाला.

"कसला आवाज हा?" अँजीनं विचारलं व ती फ्रेडीपासून दूर झाली.

"मला नाही माहीत."

"जरा जवळ जाऊन तर पाहा, फ्रेडी."

"थांब. एवढ्यात नको."

होजेनं ओठ पुन्हा हलवून गुरगुरण्याचा आवाज केला.

"फ्रेडी."

"हूं."

"मला फार भीती वाटते, रे."

"तू थांब इथंच. मी पाहून येतो."

फ्रेडी पायऱ्यांवरून खाली उतरला, होजे पडला होता तिथं आला. त्याच्याकडे पाहत त्याच्याजवळ जाऊन उभा राहिला.

"तू ठीक आहेस ना?" फ्रेडीनं होजेला प्रश्न केला.

"कोण आहे?" अँजीनं पायऱ्यांवरून प्रश्न केला.

"कुणीतरी जखमी झाला आहे."

"आपण इथून लगेच निघून जाऊया . . .'

"नाही. थांब जरा." फ्रेडी होजेजवळ खाली वाकला. "तू जखमी झाला आहेस ना?"

होजेनं मान हलवली. फ्रेडी होजेकडे टक लावून पाहत उभा राहिला. त्यानं होजेच्या जॅकेटवरचे 'द जेट्स' हे शब्द वाचले व अँजीकडे वळून तो म्हणाला, "हा 'जेट'च्या गँगमधील आहे."

"तुला काय करायचं आहे, फ्रेडी?"

"काही सुचत नाही. मला या गँगच्या भानगडीत गुंतायची मुळी इच्छा नाही." फ्रेडी उद्गारला.

"हा जेट आहे. त्याला आपण मदत केली हे रॉयल्संना कळलं तर

आपली धडगत नाही. मला यात अडकायचं नाही.''

''तो फार जखमी झाला आहे का? दुखावला गेला आहे का?''

''हो, असं दिसतं आहे.''

''आपण काय करायचं अशा परिस्थितीत?''

''मला काहीच उमजत नाही.''

''आपण ह्याला इथं असं पावसात सोडून जाणंही बरं दिसत नाही.''

''आपण पोलिसांना बोलावलं तर रॉयल्संना नक्की समजेल. मला काहीच सुचेनासं झालंय,'' फ्रेडी म्हणाला.

अँजी थोडा वेळ विचार करून त्याला म्हणाली, ''मला लगेच घरी गेलं पाहिजे. घरी काळजी करायला सुरुवात झाली असेल एव्हाना.''

''हो. तेही खरंच आहे.''

फ्रेडीनं होजेवरून नजर फिरवली. ''तू ठीक आहेस ना?'' त्यानं होजेला विचारलं.

होजेनं डोळ्यांनी खूण करून सांगितलं - ''प्लीज, प्लीज मला मदत करा.''

फ्रेडीला ते समजलं की नाही कोण जाणे!

''फ्रेडी, चल आपण इथून लगेच निघुया, प्लीज.'' तिच्या आवाजात अगतिकता होती, आर्जव होतं.

फ्रेडी उठून उभा राहिला व त्यानं होजेकडे पाहून म्हटलं, ''माफ कर.'' अँजीचा हात हाती घेऊन तो तिथून पटकन निघूनही गेला.

''ही माणसं रॉयल्संना एवढी का घाबरतात?'' होजे विचार करू लागल, ''मी तर त्यांना कधीच घाबरलो नाही.''

पाऊस एव्हाना कमी झाला होता. त्याला वाटलं, पावसाचं पाणी फार गार आहे. पण त्याच्या गरम झालेल्या शरीरावर होणारा थंड पाण्याचा शिडकावा त्याला हवाहवासा वाटत होता. त्याला पाऊस आवडत असे. पडणाऱ्या पावसाकडे खिडकीतून पाहत राहणं हा त्याचा आवडता छंद होता.

एकदा, तो असाच मारियाबरोबर खिडकीतून बाहेरचा पाऊस पाहत होता. बाहेर रस्त्यावर 'जेट्स'चे गँगमेंबर्स उभे होते. होजेला त्यांचं फार कौतुक होतं. त्यांच्याविषयी आदर वाटत होता. त्यानंतर एक-दोन आठवड्यांत जेट्संनी त्याला मेंबर करून घेतलं होतं. तो स्वतःला धन्य समजला होता त्यावेळी!

रात्रीच्या निःस्तब्ध वातावरणात थंड पाऊस... त्यामुळे त्याच्या शरीरात ऊब धरेना. पण तशा अवस्थेतही तो स्वतःच्या 'जेट' बनण्यामुळे लाभलेल्या

भाग्याचा विचार करू लागला. यावेळी जर त्याला मरण आलं तर ते होजे म्हणून येणार होतं, जेट म्हणून नव्हे, फक्त होजे म्हणून. जेट बनल्यामुळे मृत्युमुखी पडलेल्या होजेला वाटलं, आपल्यावर हल्ला करणाऱ्या रॉयल्संना आपण होजे आहोत हे माहीत असेल का? की त्यांच्यासाठी तो फक्त जांभळं जॅकेट घातलेला जेट होता? त्यांनी होजेला भोसकलं होतं की जॅकेटला व त्याबरोबर मिळालेल्या पदवीला? आता आपण मृत्युपंथावर पडलो असता जॅकेटचा काय उपयोग होणार होता? जेट, जॅकेट, पदवी, गॅंग हे सर्व शब्द त्याला निरर्थक वाटू लागले.

'मी होजे आहे, मी होजे आहे,' तो शब्दांवाचून आक्रोश करू लागला. गल्लीच्या टोकाशी, जिथे कचऱ्याचे डबे रचले होते तिथे एक म्हातारी उभी होती. तिच्या हाती राणीच्या रुबाबात धरलेली मोडक्या तारांची एक छत्री व खांद्यावर एक शॉपिंग बॅग होती. ती आपल्या परीनं अगदी हळुवारपणे डब्यांची झाकणं काढण्यात दंग झाली होती. त्यामुळे तिला होजेचं कण्हणं ऐकू आलं नाही. त्यात, ह्या वयात तिचं ऐकणंही बरंच कमी झालं होतं. तिचं ते कचऱ्याचे डबे हाताळण्याचं काम बराच वेळ चालू होतं. तिनं वर्तमानपत्र व दोरी गोळा केली व त्याबरोबर पिसं लावलेली एक हॅटसुद्धा. तिनं हळुहळू सर्व डबे बंद केले व ती छत्रीसह सर्व वस्तू घेऊन काहीतरी पुटपुटत गल्लीबाहेर पडली.

होजेला आता गल्ली लांबलचक झाल्यासारखं जाणवू लागलं. गल्लीच्या एका टोकाला असलेल्या तुरळक रहदारीच्या रस्त्यावर माणसांना येता - जाता तो पाहत होता. यावेळी ही माणसं इथं काय करत असावीत ह्याबद्दल तो तर्क करू लागला. त्याबरोबरच कोणत्या 'रॉयल'नं आपल्याला मारलं असेल, कोणी तो चाकू आपल्या पोटात खुपसला असेल, 'जेट्स' याचा सूड घेतील का ह्याबद्दलही त्याच्या मनात चक्रं फिरू लागली.

जमिनीवर पडत असताना 'हे बक्षीस तुझ्यासाठी आहे जेट!' हे शब्द त्याच्या कानांवर आले होते. वेदना सहन होत नसूनही खाली पडताना त्याला आपण 'जेट' असल्याबद्दल अभिमान वाटला होता. आता मात्र तो अभिमान नष्ट होत त्याला अनाठायी व निरर्थक वाटू लागला. पोटातून रक्त वाहत असता, गरम झालेल्या शरीराला पावसाच्या पाण्यानं हुडहुडी भरत असता त्याला ओरडून जगाला सांगावंसं वाटलं, "मला फक्त होजे व्हायचंय!"

हे काही फार मोठं मागणं नव्हतं.

तो गल्लीच्या टोकावरच्या रस्त्यावरून येणाजाणाऱ्या माणसांना पाहत

होता, पण त्याच्याकडे मात्र कोणाचंही लक्ष नव्हतं. तो होजे आहे हे जगाला ठाऊक नव्हतं. तो जिवंत आहे हे जग जाणत नव्हतं. त्याला वाटलं की जगाला ओरडून सांगावं, 'अरे, मी ज़िवंत आहे अजून! माझ्याकडे पाहा जरा. माझ्या शरीरात अद्याप धुगधुगी आहे, प्राण आहेत, हे तुम्हाला कळत नाही का? माझं अस्तित्व तुम्हाला जाणवत नाही का?'

त्याला फार अशक्तपणा व थकवा आला होता. त्याची अवस्था विकल झाली होती. स्वतःचा एकलेपणा, अगतिकता त्याला जाणवत होती. थंड पाणी अंगावर पडत असतानाही त्याचं मन होरपळून निघत होतं. मृत्यू आता अटळ आहे याची त्याला जाणीव झाली. तरीसुद्धा तो घाबरला नाही, डगमगला नाही. मनातून दुःखी मात्र झाला. त्याचं मन एका विचारानं आक्रंदलं. त्याला निराशेनं, वैफल्यानं घेरलं.

आपलं आयुष्य सोळाव्याच वर्षी संपुष्टात येणार; काही न करता, न पाहता, कुठेही न जाता. अनेक गोष्टी करण्याजोग्या होत्या. परंतु हा विचार आपल्या मनात ह्यापूर्वी का आला नाही ह्याचं त्याला आश्चर्य वाटलं. हे जांभळं जॅकेट, दुसऱ्यांवर हल्ले, मारामाऱ्या ह्यांना आजवर आपण महत्त्व का देत आलो हे त्याला उमजेना. आता त्याला ह्या गोष्टी क्षुल्लक वाटू लागल्या. त्या गल्लीच्या टोकापाशी त्याच्या नजरेसमोर ते जग त्याच्यापासून दूर जाऊ लागलं होतं.

'मला इतक्यात मरायचं नाही' त्याचं मन आक्रोश करू लागलं, 'मी अजून जगलोच नाही.'

त्याला अंगातलं जांभळं जॅकेट काढून फेकून द्यावं असं वाटू लागलं. त्याच्या शरीराला ते टोचत होतं. तो लवकरच मरणार होता व त्याच्या मरणानंतर लोकांनी, पोलिसांनी जांभळं जॅकेट घातलेलं त्याचं शरीर पाहून म्हणायला नको होतं, 'हा जेट आहे!'

तो महत्प्रयासानं पाठीवर वळण्यात यशस्वी झाला. वेदना त्याचं शरीर फाडून टाकत होत्या. वेदना इतक्या असह्य असू शकतात हे त्याला प्रथमच कळलं. त्याला अंगातलं जॅकेट काढून फेकून द्यायचं होतं. त्याच्या दृष्टीनं त्या जॅकेटचं महत्त्व संपुष्टात आलं होतं. त्या जॅकेटचा कार्यभाग संपला होता.

ते जॅकेट नसतं तर त्याचा खून करण्याचा प्रयत्न झाला नसता. होजेबद्दल वाटणाऱ्या द्वेषामुळे त्याच्या पोटात चाकू खुपसला गेला नव्हता. चाकूला फक्त जांभळ्या जॅकेटचा राग होता. ते अर्थशून्य जॅकेट त्याच्यापासून त्याचं आयुष्य हिसकावून घेत होतं. होजेला जॅकेट काढून टाकायचं होतं.

होजेनं दुरून येणाऱ्या दिव्यांच्या प्रकाशात चकाकणारं ते जॅकेट ओढून काढायचा प्रयत्न केला. त्याचे हात जड झाले होते. थोडंसं हलताच वेदना त्याच्या शरीरभर अग्निज्वाळेसारख्या पसरल्या. परंतु तो कण्हत, कुंथत शरीराला पिळवटून, सर्व शक्ती एकवटून ते जॅकेट काढण्यासाठी झगडू लागला. तो प्रथम एक हात व नंतर दुसरा हात काढण्यात यशस्वीही झाला. तो जमिनीवर सरपटत जॅकेटपासून दूर झाला. आता, त्याचा श्वासोच्छ्वास जड झाला होता व तो स्वस्थ पडून मनात घोष करत होता, 'मी होजे आहे, जेट नाही.'

मारियाला मध्यरात्र उलटून गेल्यानंतर त्याचा शोध लागला. ती सर्वजण नको म्हणत असतानाही नाच अर्ध्यावर सोडून त्याच्या शोधार्थ पार्टीतून बाहेर पडली. तो सापडला तेव्हा तिला फार आनंद झाला. त्याच्या शेजारी गुडघे टेकून बसत ती त्याला म्हणाली, "होजे, ओळखलंस का मला? मी मारिया."

त्याच्याकडून काहीच उत्तर आलं नाही. ती एकदम उठून उभी राहत त्याच्यापासून दूर झाली व रस्त्यावरून धावत सुटली आणि पोलिसांपर्यंत जाऊन पोचली.

'कॉप'जागेवर आले. होजेजवळ उभी राहून, खाली वळून ती होजेकडे पाहू लागली. त्याच्यापाशी वाकलेला पोलिस उठून उभा राहिला व तिला म्हणाला, 'तो आता जिवंत नाही.' तिनं आतापर्यंत दाबून ठेवलेले हुंदके बाहेर पडले. थोड्या वेळानं शांत झाल्यानंतर पेव्हमेंटवर पडलेल्या होजेकडे व थोड्या अंतरावर पडलेल्या त्याच्या जांभळ्या जॅकेटकडे पाहत, काही न बोलता ती स्तब्ध उभी राहिली.

पोलिसानं जमिनीवरचं जॅकेट उचलून आपल्या हाती घेतलं व वळवलं.

'जेट हां,' तो पुटपुटला.

ह्या वेळपर्यंत पाऊस स्थिरपणे पण जोरात कोसळू लागला होता.

मारियानं पोलिसाकडे शांतपणे पाहिलं व ती हळुवारपणे म्हणाली, 'त्याचं नाव होजे आहे.' पोलिसानं आपल्या हातावरचं जॅकेट पुन्हा फिरवलं. आपल्या खिशातून एक काळं पॅड काढून कोरं पान येईपर्यंत त्यानं पानं पालटली.

'जेट,' तो म्हणाला व आपल्या पॅडवर काहीतरी खरडण्यास त्यानं सुरुवात केली...

◆◆◆

# प्रयत्ने वाळूचे...

उन्हं अजून उतरली नव्हती. ऑफिस सुटायला बराच अवधी होता. फार थकल्यासारखं वाटल्यामुळे मी एक-दोन रिपोर्ट्सवर सह्या करून बाकीचं काम गुंडाळून ठेवलं व घरी जाण्याची तयारी केली. थकवा येण्याचं खरं कारण म्हणजे, हॉस्पिटलमधल्या कुणा स्टाफच्या किल्ल्या चोरून दोन मानसिक रुग्ण पळून गेले होते. पोलिसांना कळवल्यामुळे त्यांचा हॉस्पिटलबाहेर तपास चालू होता. हॉस्पिटल आधीच शोधून पालथं घालण्यात आलं होतं. माझ्या दुःखाचं कारण त्या मुलांचं पळून जाणं हे नसून, त्यांनी पुढील प्रगती बाजूला ठेवून स्वहस्ते आपल्या पायांवर धोंडा पाडून घेतला हे होतं.

माझ्या चिडखोरपणात भर घालण्यासाठी जणू ट्रॅफिक हलत नव्हता. ऑफिस सुटण्याची वेळ झाली नसूनही रस्त्यावर गाड्यांची गर्दी होती. कशीबशी घरी पोचताच मी किल्ल्या टेबलावर आपटल्या, चपला भिरकावून दिल्या व रेडिओचं बटण फिरवून आरामखुर्चीत बसकण मारली. पळून गेलेल्या त्या मुलांचे विचार डोक्यातून जाता जात नव्हते. सवयीप्रमाणे मी वर्तमानपत्र उचललं. पहिल्याच पानावरच्या 'पोर्ट्रेट ऑफ इन्स्पिरेशन' या सदरानं माझं लक्ष वेधून घेतलं. कोणा वीस-एकवीस वयाच्या एका

तरुण मुलाचा त्यात फोटो छापून आला होता. त्याखाली त्याची मुलाखतही प्रसिद्ध झाली होती. हा मुलगा शहराच्या एका दरिद्री व गुन्हेगारी भागांत वाढला असून आज जॉन हापकिन्स युनिव्हर्सिटीमधून सर्व विषयांत 'ए' ग्रेड मिळवून ग्रॅज्युएट झाला होता. मग त्यानं अनेक बक्षिसं व शिष्यवृत्त्याही पटकावल्या होत्या. मी फोटोकडे वारंवार निरखून पाहिलं तरी ओळख पटेना. परंतु चेहरा मात्र ओळखीचा वाटत होता. त्याचं नाव वाचताच माझं नैराश्य व थकवा कुठल्या कुठे गायब झाला व माझं मन एकदम दहा वर्षं मागे गेलं.

काऊंटीच्या सोशल वर्करबरोबर तो प्रथम माझ्या ऑफिसमध्ये आला तेव्हा थोडा भेदरलेला वाटत होता. वय असेल दहा-अकरा वर्षांचं. वयाच्या मानानं थोडा उंच, मध्यम वर्णाचा, छोटे कुरळे केस, थोडं नकट्यावर जाईल असं नाक. कोणालाही आकर्षित करतील असे पाणीदार, तेजस्वी डोळे. डोळ्यांत मार्दव होतं, स्निग्धता होती. त्या डोळ्यांकडे पाहिलं की या मुलाच्या आक्रमक वागणुकीवर किंवा त्यानं केलेल्या छोट्यामोठ्या गुन्ह्यांवर विश्वास बसणं शक्य नव्हतं; इतके निरागस होते त्याचे डोळे! चेहराही निष्पाप वाटत होता. दिसतं तसं नसतं हेच खरं! मनातल्या मनात मात्र मी वर्तणुकीत विकृती असलेल्या मुलांची स्वतःजवळ आठवण करत राहिले.

त्याच्या आगमनापूर्वी त्याच्यापेक्षाही मोठी व लठ्ठ वाटणारी त्याची फाईल डिपार्टमेंट ऑफ सोशल सर्व्हिसेसच्या ऑफिसकडून माझ्या टेबलावर येऊन पडली होती. त्याला रुग्णालयात दाखल करून घ्यायचं होतं. कोर्टानं त्याचं वय व कौटुंबिक परिस्थिती ध्यानी घेऊन, त्याच्या मानसशास्त्रीय चाचणीच्या रिपोर्टमध्ये केलेल्या शिफारशीनुसार त्याला रिमांड होममध्ये न पाठवता आमच्या मनोरूग्ण मुलांच्या हॉस्पिटलमध्ये उपचारांसाठी पाठवलं होतं.

वर्गातल्या व आळीतल्या मुलांना मारणं, छोट्या-मोठ्या चोऱ्या करणं, अनेकदा घरातून पळून जाणं अशा तक्रारींची लांबलचक यादी त्याच्या फाईलमध्ये होती. ह्यावेळी, त्यानं आळीतल्या मोठ्या मुलांना फशी पाडलं होतं, रस्त्यावर उभ्या केलेल्या गाड्यांना रंग फासण्याचे उपद्व्याप केले होते.

सोशल वर्करनं त्याची माझ्याशी ओळख करून दिली तेव्हा त्यानं हसून माझा हात हातात घेतला. त्याचं नाव होतं रॉनी ग्रॅहॅम. वय वर्षं अकरा. त्याला तेरा वर्षांची एक मोठी बहीण होती. रॉनीच्या आईवडिलांचा त्याच्या जन्मानंतर लगेच घटस्फोट झाला होता. त्यानंतर वर्षभरातच सेक्शुअल असॉल्ट व

बलात्कार केल्याच्या आरोपावरून त्याच्या वडिलांना वीस वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली होती.

"तुला इथे का राह्यला पाठवलं याची तुला काही कल्पना आहे का, रॉनी?" मी विचारलं.

रॉनीनं फक्त होकारार्थी मान डोलावली.

"का?" मी पुन्हा विचारलं.

"कारण जज्ज मूरची खात्री आहे, की माझी आई मला योग्य प्रकारे वाढवू शकणार नाही."

"ते कशावरून?"

"कारण माझ्या आणि माझ्या मोठ्या बहिणीच्या गरजा भागवण्यासाठी माझ्या आईला दोन नोकऱ्या कराव्या लागतात. त्यामुळे घरी राहून आमची काळजी घेण्यासाठी तिच्यापाशी वेळच नसतो!"

"हे झालं तुझ्या आईचं कारण. तू स्वतः काय केलंस म्हणून तुला इथं पाठवण्यात आलंय?"

"ती सर्व हकीगत या माझ्या फाईलमध्ये लिहिलेली आहे. ती तुम्ही वाचली नाही का?" त्यानंच मला उलट प्रश्न केला.

"मी ती फाईल वाचली आहे. परंतु तुला इथं का पाठवण्यात आलंय याबद्दल तुला काय माहीत आहे, रॉनी?" मी विचारलं. "तुला काय वाटतं ते जाणून घ्यायची माझी इच्छा आहे. तू जे काही केलंस ते का व कशाकरता केलंस ते कळलं तर तुला मदत करणं मला सोपं होईल."

"मला राग अजिबात आवरत नाही असं ह्या सर्वांचं म्हणणं आहे. मी खोड्या करतो व कधी कधी घरातून पळूनही जातो."

"मग ते खरं आहे का?"

"थोडंफार खरं असेलही."

"तू असं वागण्याचं कारण काय आहे?"

रॉनीनं फक्त खांदे उडवले.

"मला सांगशील, तुला असं का करावंसं वाटतं?"

"मी तुम्हाला ओळखतही नाही, तर मी तुम्हाला का सांगू?"

"कारण त्यामुळे तुला मदत करणं सोपं होईल. तुझ्यावर उपचार करायचे ते नीट आखता येतील."

"नाही तरी तुम्ही मोठी माणसं माझ्यावरचे सर्व उपचार मला न विचारताच करणार. मग मी सांगितलं किंवा नाही, त्यामुळे काय फरक पडणार आहे?" रॉनीनं सडेतोडपणे प्रश्न विचारला.

"मी जर तुला आश्वासन दिलं की तुला विचारल्याखेरीज तुझ्या उपचाराबद्दल व त्यानंतर तुला कोठे ठेवायचं ह्याबद्दल कोणतेही निर्णय घेतले जाणार नाहीत तर ह्या बाबतीत तू सहकार्य करशील?"

"मी विचार करीन."

मुलगा हुशार व चुणचुणीत होता. मनात आलं पोषक वातावरण, काळजी घेणारं कुटुंब व योग्य मार्गदर्शन करणारे शिक्षक व काऊन्सेलर मिळाल्यास हा मुलगा कुठल्या कुठे पोचेल! नाहीतर त्याचा तुरुंगवास चुकणार नाही किंवा ऐन जवानीत हा कोणाच्या तरी बंदुकीच्या गोळीचं भक्ष्य होईल! त्याला दाखल करून घेण्याचे सर्व सोपस्कार मी पुरे केले. त्याच्या फाईल व पेपरवर्कसह त्याला रेसिडेन्शियल युनिटच्या स्वाधीन करून त्याची बोळवण केली.

रॉनीचा विचार कित्येक दिवस माझ्या मनातून जात नव्हता. त्याची आई दिवसा एका शाळेत व संध्याकाळी एका नर्सिंग होममध्ये हाऊसकीपरची नोकरी सांभाळून कुटुंबाचं पोट कसंबसं भरत होती. तिचं शालेय शिक्षण फक्त आठवीपर्यंत झालं होतं. त्याचे वडील दारूच्या आहारी गेले होते. रॉनीच्या जन्मानंतर त्याच्या आईशी घटस्फोट घेतलेला असूनही ते मधुनमधून रॉनीला भेटण्यासाठी, त्याच्याशी खेळण्यासाठी, त्याला सिनेमाला किंवा बॉल गेम्संना घेऊन जाण्यासाठी काही भेटवस्तू घेऊन येत असत. थोरली मुलगी टानिया ही त्यांचीच मुलगी असूनही ते तिला आपली मुलगी मानण्यास तयार नव्हते! ती आपल्या बायकोला दुसऱ्यापासून झाली आहे असा त्यांचा दावा होता. ते टोमणे मारण्याव्यतिरिक्त इतर काहीही तिच्याशी बोलत नसत. ती तिच्या आईला विवाहबाह्य संबंधापासून झाली नसली तरी त्यांनी तसा गैरसमज करून घेतला होता.

रॉनीची व त्याच्या बहिणीची, एकमेकांशी सुरुवातीला फार मैत्री होती. ती दोघं बरोबर खेळत व एकमेकांच्या सुखदुःखांत सहभागी होत. रॉनी अभ्यासात हुशार असल्यामुळे त्याला हुशार - 'गिफ्टेड' व 'टॅलेंटेड' - मुलांच्या वर्गात पाठवण्यात आलं होतं. तो आपल्या मोठ्या बहिणीला अभ्यासातही मदत करत असे. तीसुद्धा शाळेतल्या काही मोठ्या, बिघडलेल्या मुलांपासून त्याचं रक्षण करी. त्यानंतर पुढे वडिलांनी त्यांच्यात दुफळी माजवण्याच्या केलेल्या प्रयत्नांमुळे ते एकमेकांपासून दूर जाऊ लागले होते. मग थोड्याच दिवसांत टानियानं

वडिलांवर, त्यांनी आपल्यावर लैंगिक हल्ला केल्याचा आरोप केल्यानंतर ही मैत्री संपुष्टात आली.

रॉनी दोन-चार दिवसांत हॉस्पिटलच्या वातावरणात रुळू लागला. त्याच्या थोड्याशा उद्धट वाटणाऱ्या बोलण्यापायी व स्टाफला उलट प्रश्न विचारण्याच्या सवयीपायी तो फारसा कोणाला आवडत नव्हता. त्याच्या विनोदी स्वभावामुळे बरोबरच्या मुलांमध्ये मात्र तो लोकप्रिय होता. तो शाळेत तर चमकत होताच. त्याच्याबरोबरची इथली सर्व मुलं स्पेशल एज्युकेशनच्या वर्गात शिकली होती. उलट, रॉनीला आजवर हुशार – 'गिफ्टेड' व 'टॅलेंटेड'– मुलांच्या वर्गात शिक्षण मिळालं होतं. रॉनीच्या अंगी पुढाऱ्याचे गुण होते. तो बरोबरीच्या व काही मोठ्या मुलांना अभ्यासातही मदत करत असे. त्याच्यामुळे इतर मुलांनाही शिक्षणात गोडी वाटू लागली होती. हॉस्पिटलची शाळा स्पेशल एज्युकेशनची असल्यामुळे तिथं रॉनीच्या बुद्धीला आव्हान मिळू शकत नव्हतं. त्याच्या बौद्धिक गरजा तिथे भागू शकत नव्हत्या. यातून् काहीतरी मार्ग काढणं आवश्यक होतं. नाहीतर हा मुलगा हातातून पुन्हा निसटण्याची शक्यता होती. ह्या मुलाच्या भविष्याची काळजी माझं मन पोखरत होती.

हॉस्पिटलच्या बाहेर काऊंटीच्या पब्लिक स्कूलमध्ये त्याच्यासाठी काही कार्यक्रम उपलब्ध आहे का ह्याची चौकशी मी सुरू केली. त्याला नेण्या-आणण्यासाठी वाहनाची व्यवस्था केल्यास शाळेनं रॉनीला त्यांच्या हुशार मुलांच्या अभ्यासवर्गामध्ये दिवसाचे निदान काही तास तरी शिक्षण द्यावं म्हणून मी विनंती केली. आमच्या हॉस्पिटलच्या ह्या युनिटमध्ये अशी घटना प्रथमच घडणार होती. ह्यापूर्वी कोणाही पेशंटला हॉस्पिटलबाहेर शाळेत जाण्यास परवानगी नव्हती. रॉनीच्या व माझ्या सुदैवानं हॉस्पिटलचे अधीक्षक माझ्याशी सहमत झाले व त्यांनी या योजनेला परवानगी दिली.

त्याच्या शिक्षणाच्या योजनेबद्दल त्याला सांगण्यासाठी व त्याचे विचार ऐकण्यासाठी रॉनीला मी माझ्या ऑफिसमध्ये बोलावून घेतलं.

"रॉनी, तुझ्या भविष्याबद्दल तुझा काय विचार आहे? तुझे विचार मला सांगण्याइतपत तुझा माझ्यावर विश्वास आहे का? तुझी उपचारयोजना ठरवताना तुझा विचार जरूर घेतला जाईल असं आश्वासन मी तुला दिलं होतं. आज तशी वेळ आली आहे. त्यासाठी मी तुला इथं बोलावलं आहे."

"माझा तुमच्यावर विश्वास आहे. मला दिलेलं आश्वासन तुम्ही पाळलं ह्याबद्दल मी तुमचा आभारी आहे. माझ्या शिक्षणाबाबत तुमच्या काय योजना आहेत हे मला

कळेल का?'' त्यानं नम्रपणे विचारलं. त्याच्या आवाजात मार्दव होतं.

''प्रथम माझ्या प्रश्नाचं उत्तर दे, रॉनी. तुला मोठेपणी कोण व्हायचं आहे? कधी त्याबद्दल विचार केला आहेस का तू?''

तो क्षणभर थांबला. नंतर त्यानं होकारार्थी मान डोलावली. सवयीप्रमाणे त्यानं मलाच प्रश्न विचारला, ''मी माझे विचार सांगितले तर तुम्ही हसणार नाही ना? माझी चेष्टा तर करणार नाही ना?''

''नाही रॉनी. या देशाचा प्रेसिडेण्ट होण्याचा तर तुझा विचार नाही ना? प्रयत्न केलास तर तू नक्की होऊ शकशील.''

''प्रेसिडेण्ट नाही, पण मोठेपणी डॉक्टर होण्याचा माझा विचार आहे. डॉक्टर होऊन गरिबांना मदत करायची आहे मला.''

''का बरं?''

''घरात जाण्यासाठी पर्समधून दाराची किल्ली काढत असताना गेल्या वर्षी कोणा गँगच्या मेंबरनं झाडलेली गोळी लागून माझी आई जखमी झाली होती. मी बाजूला खेळत होतो. मीच धावत जाऊन तिला घरात आणलं आणि लगेच ॲम्ब्युलन्ससाठी ९११ला फोन केला. तोपर्यंत आईचं बरंच रक्त वाहून गेलं होतं. पाठीला व पायाला गोळी लागली होती. ती बेशुद्धीत काहीबाही बडबडत होती. तिची काळजी घेणारा मी एकटाच होतो.

''ॲम्ब्युलन्स जवळजवळ पंचेचाळीस मिनिटांनी आली.रक्तस्राव फार झाल्यामुळे आई पांढरीफटक पडली होती. ती जिवंत आहे की नाही तेही मी समजू शकत नव्हतो. गरिबांना हॉस्पिटलमध्ये नेण्यासाठी ॲम्ब्युलन्स जर वेळेवर येऊ शकत नाही तर हॉस्पिटलमधले डॉक्टर तिच्यावर काय उपचार करणार? आमच्या सुदैवानं ती ह्या सर्वांतून वाचली. तिचा जवळजवळ पुनर्जन्म झाला! ह्यासाठी मी गरिबांचा डॉक्टर होण्याचं ठरवलं आहे.''

रॉनी बोलायचा थांबला. ह्या एवढ्या कोवळ्या वयात ह्या मुलानं आणखी काय काय सोसलं असेल याची कल्पनाही करवेना. मनातला राग, नैराश्य, वैफल्य वाढू लागलं की घरातून पळून जाऊन त्यांना वाट मोकळी करून देण्याखेरीज त्याला दुसरा मार्ग सापडला नव्हता.

रॉनीची स्वप्नं बाल्यातील निरागसतेतून जन्माला आली होती. बिल क्रॉस्बीचा डॉक्टर त्यानं टेलिव्हिजनवर पाहिला होता. त्याचा आदर्श नजरेसमोर ठेवला होता. त्यानं मित्रांकडून, काही शिक्षकांकडून जॉन हापकिन्स युनिव्हर्सिटीबद्दल बरंच काहीं ऐकलं होतं. त्याचा तिथून ग्रॅज्युएट व्हायचा मानस होता. परंतु

बाल्टिमोरच्या बकाल व दरिद्री वस्तीतील हाऊसिंग प्रोजेक्टमध्ये वाढत असलेल्या मुलाची, हाऊसकीपरची नोकरी दोन ठिकाणी करून पालकत्वाची जबाबदारी कशीबशी सांभाळणाऱ्या अशिक्षित आईच्या लेकराची स्वप्नं कुठवर पोचणार? ती हळुहळू धुसर होऊन विरून जातात. उरते ती फक्त वास्तवता!

स्वप्नं पाहणारा त्या संकटांना धैर्यानं तोंड देऊन, पडेल ती मेहनत करून, वेळेवर मिळालेली मदत घेऊन चिकाटीनं, जिद्दीनं त्यांना पकडून राहतो, तेव्हाच ती स्वप्नं जिवंत राहू शकतात.

रॉनी पब्लिक स्कूलमध्ये शिक्षण घेण्याची योजना ऐकून खूष झाला. त्यानं पुन्हा वाईट वर्तन न करण्याचं व मन लावून अभ्यास करण्याचं आश्वासन दिलं व तो परत गेला.

आता, कोर्टाची तारीख ठरवून जज्ज मूर ह्यांची त्यासाठी परवानगी घेणं आवश्यक होतं. रॉनीनं त्यांच्याशी झालेल्या संभाषणात त्यांच्यावर चांगलीच छाप पाडली. जज्ज मूर त्याच्यातील नम्रता व नवीनच आलेली पक्वता पाहून खुष झाले. त्याच्यात थोड्या अवधीत झालेला बदल पाहून योग्य मार्गदर्शन, शिक्षण व पाठिंबा मिळाल्यास या मुलाचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे हे जाणून त्याला पब्लिक स्कूलमध्ये पाठवण्याची परवानगी त्यांनी दिली. रॉनीला पळून जाण्याची बुद्धी देऊ नकोस म्हणून मी देवाला गाऱ्हाणं घातलं. कारण मी या साऱ्याला जबाबदार होते.

रॉनीचं शिक्षण नियमितपणे सुरू झालं. तो आपल्या शाळेवर खूष होता. त्याचे शिक्षकही त्याच्यावर, त्याच्या हुशारीवर, समजूतदारपणावर खूष होते. तो चांगल्या ग्रेड्स मिळवत होता. त्यानं आपल्या लाघवी स्वभावामुळे हॉस्पिटलच्या स्टाफची मनं जिंकून घेतली होती.

युनिटमधल्या मनोरुग्णांना एड्सबद्दल माहिती पुरवणं महत्त्वाचं व जरुरीचं होतं. त्यासाठी, त्यावर भाषण देण्यासाठी एक दिवस डॉक्टर्स, नर्सेस, काऊन्सेलर्स यांची टीम बोलावली होती. कार्यक्रम सुरू होईपर्यंत सर्व सुरळीत चालू होतं. पण डॉक्टरांचं भाषण सुरू होताच एकाएकी रॉनी उठून धावत आपल्या खोलीकडे गेला. नर्सिंग असिस्टंट त्याच्यामागे धावला. रॉनी जोरजोरानं दारावर मुठी आदळत होता. त्याला परत आणण्याचा प्रयत्न व्यर्थ ठरला होता. त्याच्या ह्या अनपेक्षित वर्तणुकीमुळे त्यानं स्वतःचं नुकसान करून घेतलं होतं. युनिटच्या नियमांप्रमाणे आता, अठ्ठेचाळीस तास तो हॉस्पिटलच्या बाहेर जाऊ शकणार नव्हता. त्याचा परिणाम म्हणजे दोन दिवस त्याची शाळा बुडणार होती आणि

शाळा बुडवून तर चालणार नव्हतं.

हे सारं त्याला ऐकवण्यासाठी मी त्याच्या खोलीत गेले. त्याच्या खांद्यावर हात ठेवताच तो हमसून रडू लागला. रडण्याचा ओघ थोडा ओसरल्यावर मी त्याच्या उठून येण्याचं कारण त्याला विचारलं. त्यानं आपल्या वागणुकीचा खुलासा केला, तेव्हा मलाही त्याच्याबद्दल अनुकंपा वाटली. सहा महिन्यांपूर्वी इतर कोणाही नातलगाचा आधार न मिळाल्यामुळे त्याचे मामा नाइलाजानं त्याचे मामा आपल्या या गरीब बहिणीकडे राहण्यास आले होते. त्यांचा आजार अशा प्रकारचा होता की त्यांना कोणी जवळ करायला तयार नव्हतं. त्यांच्याजवळ औषधांसाठी पैसा नव्हता की हेल्थ इन्शुरन्ससुद्धा नव्हता. ते आजारापायी नोकरीही करू शकत नव्हते. त्यांची रॉनीवर फार माया होती. रॉनीही त्यांच्यावर प्रेम करत होता, एखाद्या जवळच्या मित्राप्रमाणे. वेळात वेळ काढून रॉनीनंच आपल्या परीनं त्यांची सेवा केली होती. दोन-अडीच महिन्यांपूर्वी उपचार व औषधं ह्यांच्याअभावी त्याचे मामा या आजाराला बळी पडले. रॉनीच्या पुढ्यात, त्यांनी त्याचा हात हाती घेतलेला असताना त्यांना मृत्यू आला, तो या एड्समुळे. तो आज ह्या विषयावर भाषण ऐकण्यासाठी गेला असता त्याच्या सर्व स्मृती जागृत झाल्या, भावना उचंबळून आल्या. सारं असह्य झाल्यामुळे तो तिथून बाहेर पडला होता. त्याला समजून घेण्याची फारशी कोणाची इच्छा नव्हती. त्यांच्या दृष्टीनं नियम म्हणजे दगडावरली रेघ! नियम पाळला गेला पाहिजे. परंतु त्याला शाळेत जाण्याची परवानगी आहे अशी ऑर्डर मी युनिट डिरेक्टरमार्फत लिहवून घेतल्यामुळे स्टाफचा नाइलाज झाला.

रॉनीशी बातचीत करत असताना मी त्याला एकदा सहजपणे प्रश्न केला, "रॉनी, तू एवढा समजूतदार व हुशार असूनसुद्धा गुन्हेगारीचा हा मार्ग का पत्करलास?"

सवयीप्रमाणे त्यानं मलाच उलट प्रश्न विचारला, "मग तुमच्या मते, अशा बिकट परिस्थितीत दुसरं काय करण्यासारखं आहे?'

काही क्षण मी काही न बोलता त्याच्याकडे रोखून पाहिलं. तोच पुढे म्हणाला, "आई सबंध दिवस कामाच्या निमित्तानं घराबाहेर, आजारी मामा घरात, बहीण ड्रग्जवर स्वतःचं मनोरंजन करण्यात दंग. वेळ घालवायला, मन रमवण्यासाठी माझ्याकडे पुस्तकांशिवाय काही नव्हतं. मग मित्र चिडवू लागले. त्यांना बाहेर खेळताना पाहून मला पायांनी तिथं ओढून नेलं. माझ्या बुद्धीचा, सदसद्विवेकबुद्धीचा पराजय झाला. हे मित्र, गल्लीतली - बिल्डिंगमधली मुलं काही ना काही भुरट्या चोऱ्या करत, रस्त्यांवर उभ्या केलेल्या गाड्यांवर दगड

मारत किंवा त्यांना रंगवून टाकत, घरांवर वेडंविद्रं काहीतरी लिहून ठेवत व दुसऱ्या दिवशी त्यांच्या मालकांना चिडलेलं पाहून एकमेकांना टाळ्या देऊन हसत. मलाही त्यात गंमत वाटू लागली व मी स्वतःच्या नकळत त्यांच्यात सामील होऊ लागलो.''

त्यानं बोलणं पुढे चालू ठेवलं. ''मी तिसरीत असताना आमच्या संगीत शिक्षकांनी कुठल्याशा अनुदानामधून आम्हाला ट्रॉम्बोन घेऊन दिला होता. वाजवण्याचे धडे शाळेत ते आम्हाला देत व आम्ही घरी येऊन त्यावर प्रॅक्टिस करत असू. मला त्यावेळी बाहेर जाण्याची गरज भासली नाही. मी व माझी बहीण, दोघंही घरात बसून ट्रॉम्बोन वाजवू लागलो. वर्षानंतर पैशांअभावी हा प्रकल्प रद्द झाला व आम्हाला आमचं ट्रॉम्बोन परत करावं लागलं.

''मला अजूनही वाचनाची फार आवड आहे. यापुढें वेळ घालवण्यासाठी मी नियमितपणे पब्लिक लायब्ररीत जाऊन वाचत बशीन. पुन्हा रस्त्यावर नक्कीच जाणार नाही. मी वचन देतो तुम्हाला. माझ्या आयुष्याच्या पुस्तकाचं हे पान मला उलटायचंय.''

रॉनीला आठ-दहा महिन्यांनंतर हॉस्पिटलमधून डिस्चार्ज देण्यात आला. त्याआधी त्याच्या शाळेच्या प्रिन्सिपलना, काऊन्सेलरना व शिक्षकांना भेटून, मी, त्यांच्याकडून त्याला मदत करण्याचं आश्वासन मिळवलं. त्याच्या वस्तीतल्या, सरकारी आरोग्य केंद्रामध्ये वैयक्तिक उपचार व फॅमिली उपचारासाठी उपचारकाची सोय केली. कोर्टातर्फे त्याच्या व कुटुंबाच्या थेरपीसाठी कोर्ट ऑर्डर घेतली व त्याला घरी जाऊ देण्याची शिफारस त्याच्यातर्फे जज्जना केली.

रॉनीला घरी पाठवण्यात आलं व तो नित्यनेमानं शाळेत, लायब्ररीत व उपचारार्थ जाऊ लागला. त्याचा अधुनमधून फोन येई. आपले शिक्षक, काऊन्सेलर व लायब्ररियन ह्यांची तो नेहमी तारीफ करत असे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे, मदतीमुळे चांगल्या ग्रेड्स मिळवत असल्याचं तो सांगत असे.

काही वर्षांनी त्याचं, पदवीदान समारंभाला हजर राहण्याबद्दलचं अगत्याचं पत्र आलं. मी त्या पदवीदान समारंभाला आवर्जून हजर राहिले. मी सहा फूट उंचीच्या एकशेपन्नास पौंडी रॉनीला ओळखू शकले नाही. तो चांगला रुबाबदार दिसत होता. त्याच्या चेहऱ्यावरून आत्मविश्वास ओसंडत होता. त्याच्या तोंडून त्याच्या प्रगतीच्या, यशाच्या गोष्टी ऐकून मला फार आनंद झाला. रॉनी 'ऑनर रोल'सह पदवीधर झाला होता. जॉन हापकिन्स युनिव्हर्सिटीत शिक्षण घेण्याचं आपलं ध्येय तो पुरं करणार होता. जॉन्स हापकिन्सची चार वर्षांची प्रतिष्ठेची

शिष्यवृत्ती त्यानं मिळवली होती. आपल्या आईच्या मनाची तयारी करून तिलाही शिक्षण घेण्यास भरीला घातलं होतं. शालेय कोर्स संपवून डिप्लोमा मिळवण्यासाठी आवश्यक असणारी परीक्षा देण्यास तिला त्यानं प्रोत्साहन दिलं होतं व त्यासाठी तिला अभ्यासक्रमात मदतही केली होती. तिलाही त्याच्याबरोबर ह्या वर्षी हायस्कूल डिप्लोमा मिळाला होता! बहीण मात्र शालेय शिक्षण पुरं न करता दोन अनौरस मुलांची माता झाली होती. तिला हायस्कूल डिप्लोमा मिळवून देण्यासाठी तो अभ्यासात मदत करता करता मामाची भूमिकाही आनंदानं पार पाडत होता.

तीन वर्षं उलटली. रॉनीची काही खबर कळली नव्हती. त्याचा जवळजवळ विसर पडला होता. आज वर्तमानपत्रात त्याच्याबद्दलची माहिती वाचून त्याची आठवण पुन्हा जागृत झाली. मी पुढे वाचू लागले. त्याला देशातील अनेक प्रसिद्ध विद्यापिठांत मेडिकल स्कूलमध्ये स्कॉलरशिपसह प्रवेश देऊ करण्यात आला होता.

वर्तमानपत्रातील बातमीनुसार रॉनीनं आपलं वैद्यकीय शिक्षण दीड-दोन वर्षं पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला होता. त्याचं कारणही तसंच होतं. आपल्या आयुष्यात जर आपल्या शिक्षकांनी योग्य मार्गदर्शन केलं नसतं, योग्य वेळी पाठिंबा दिला नसता तर आपणही कुठेतरी भरकटलो गेलो असतो ह्याची जाणीव ठेवून त्या शिक्षकांचं थोडं तरी ऋण फेडण्यासाठी तो इनर सिटी स्कूलमध्ये बकाल वस्तीतील शाळेमध्ये शिक्षकाचं काम करणार होता. मुलांना शिक्षणाकडे प्रवृत्त करण्याचा प्रयत्न पुढील दीड-दोन वर्षांत करणार होता. त्यांचं स्फूर्तिस्थान बनून त्यांना मार्गदर्शन करणार होता. डॉक्टर झाल्यावर ते जमण्यासारखं नव्हतं.

सामान्य माणसाच्या सबंध आयुष्यभरात भोगवट्याला येऊ शकणार नाही एवढं रॉनीनं वयाच्या पंधरा-सोळाव्या वर्षी पाहिलं होतं, भोगलं होतं. गरिबांची स्वप्नं व्यवहाराच्या, वास्तवाच्या धुक्यात विरून जाण्यासाठी जन्माला आलेली असतात. परंतु या नियमाला अपवाद ठरणारी माणसं ह्या जगात पाऊल टाकताना काही वरदान घेऊन जन्माला येतात. रॉनी जिद्द, चिकाटी व बुद्धी घेऊन जन्माला आला होता. 'आय कॅन डू दॅट' या वृत्तीची त्याला जोड मिळाली होती. वेळीच मिळालेलं योग्य मार्गदर्शन व मेहनत या सर्वांच्या सोबतीनं आपलं स्वप्न केवळ कल्पनेत जमा होण्याऐवजी तो साकार करू शकला.

◆◆◆

# समज

रात्री अकरा-साडेअकराचा सुमार असावा. घरातील सर्वजण ह्या वेळपर्यंत झोपेच्या अधीन झाले होते. अचानक, फायर ब्रिगेडच्या जोरात किंचाळणाऱ्या घंटेच्या कर्कश्श आवाजानं मला व विजयला जागं केलं. त्यानंतर प्रयत्न करूनही निद्रादेवी प्रसन्न होण्याचं चिन्ह दिसेना. कुठे आग लागली ते पाहण्यासाठी विजय घराबाहेर पडला. एवढ्यात, कोणाचा तरी हाका मारण्याचा आवाज माझ्या कानी आला, 'टोनी, ओ ऽ टोनी.'

याचा अर्थ, ती पुन्हा गायब झाली असावी. ती ह्या वर्षीच जवळजवळ पंचवीस-तीस वेळा तरी गायब झाली असेल. एरवी, ती इतक्या उशिरा घरी आल्याचं माझ्या ऐकिवात नाही. ती नेहमी जेवणाच्या वेळेनंतर उशिरा घरी पोचत असे. त्यामुळे घरातील सर्वजण तिच्याशिवाय जेवून घेत असत. तिच्यासारखं कुटुंब माझ्या वाट्याला आलं असतं तर मीसुद्धा एकटीनं जेवणं पसंत केलं असतं.

तिला हाका मारणाऱ्या तिच्या वडिलांच्या आवाजाचा सूर आता बराच वर चढला होता. 'टोनी, ओऽ टोनीऽ', ओरडता ओरडता त्यांच्या आवाजाला बरीच धारही आली होती. ती नक्की सापडेल याची खात्री असल्यामुळे त्यांच्या आवाजात रागही डोकावत होता. कारण, अशी नाहीशी

होऊन ती नेहमी नंतर घरी येत असे. मी तिला निष्काळजीपणे गबाळ्या वेशात रस्ता ओलांडताना अनेकदा पाहिलं आहे. उघडलेल्या तोंडात कॅण्डी टाकताना एका बाजूला कललेली मान, अनवाणी पाय, भुरभुरणारे-पिंजल्यासारखे दिसणारे-चेहऱ्यावर आलेले केस, उड्या मारत चालणारे लठ्ठ पाय अशा अवतारात ती येत असे. जणू काही, घरी वेळेवर पोचणं किंवा चिडलेले आईवडील ह्या गोष्टी तिच्या अस्तित्वात नसाव्यात!

तिचे वडील थोड्या वेळात दरवाजा धाडकन आपटून घरात परत जातील. ते आपलं ओरडणं वा तिचा शोध फार वेळ कधी चालू ठेवत नाहीत. आपण लायक, आदरणीय व काळजीयुक्त आईबाप आहोत व इतरांप्रमाणे आपल्यालाही आपली मुलगी सुरक्षितपणे घरी यावी असं वाटतं हे शेजाऱ्या-पाजाऱ्यांना कळावं एवढ्यापुरताच हा खटाटोप करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

पहिल्या आवाजाच्या सुरात आता आणखी एक आवाज मिसळला गेला. हा आवाज एका स्त्रीचा होता. 'टोनीऽ टोनीऽ'... ही तिची आई असावी. माझी जिज्ञासा जागृत झाल्यामुळे मी माझ्या नकळत खिडकीजवळ पोचले. पलीकडील रस्त्यावरून तोंडावर दोन हातांचा कप करत टोनीची आई आपल्या घराच्या पायऱ्यांवरून ओरडून टोनीच्या नावाचा पुकारा करत होती. थोडं दूरवर जाऊन दोन्ही बाजूंना शोधत तिचे वडील तिला जोरजोरात हाका मारत होते. कदाचित, आग शमवण्यासाठी नुकत्याच गेलेल्या फायर इंजिनमुळे ती आग टोनीनं तर लावली नसेल ना या शंकेने ते घाबरले असावेत. टोनी काहीही करण्याची शक्यता आहे ह्याबद्दल त्यांना खात्री असावी आणि ती पकडली गेल्यास काय होईल याकारणाने त्यांना  जास्त चिंता वाटत असावी. या माझ्या कल्पनेबद्दल मी स्वतःवर खूष झाले. तिच्या आईवडिलांसमोर टोनी ही एक फार मोठी समस्या उभी करून ठेवणार ह्याबद्दल माझं व विजयचं एकमत होतं. नाहीतर दुसरी कोणती वाट तिच्यासाठी मोकळी होती? रिफॉर्म स्कूलखेरीज अन्य कोणते दरवाजे तिच्यासाठी उघडे आहेत? सकाळपासून रात्रीपर्यंत कोणीही देखभाल करणारी व्यक्ती नसल्यामुळे स्वतःच्या आयुष्याची सर्व सूत्रं, निर्णय स्वतःच्या हाती घेतलेल्या व्यसनाधीन भावाचा आदर्श नजरेसमोर असलेल्या व बेजबाबदार तरुण बहिणीचं अंधानुकरण करू पाहणाऱ्या नऊ वर्षांच्या मुलीसाठी आणखी कोणता मार्ग खुला असू शकतो?

बाहेर ओरडणं चालू होतं, 'टोनीऽ ओ टोनी!'

पहिलं 'टोनी' जोरात आणि दुसरं त्याहून जरा हळू आवाजात.

मी खिडकीपासून मागे परतून बिछान्यात पडले, पण टोनीचा विचार मनातून जाईना. तिचा रेखीव चेहरा एकंदर लठ्ठपणामुळे मांसाच्या गोळ्यात लपल्यासारखा भासत असे. तिच्या हातात खाण्याच्या पदार्थांवाचून दुसरं काही कधी दिसलंच नाही! ती ज्या ज्या वेळी आमच्या अनियाला बोलावण्यासाठी येत असे त्या प्रत्येक वेळी तिच्या हातात बटाट्याच्या चिप्सची बॅग, एखादा सोडा कॅन किंवा आईस्क्रिम स्टिक असे. तिच्या हातातील खाद्यपदार्थ गळणारे, डाग पाडणारे, नाही तर वजन वाढण्यास मदत करणारे असत. ती कॅन, बाटल्या किंवा खोके, खाऊन संपल्यावर कोणाच्याही बागेत लॉनवर फेकून देई.

एकदा, सूपचा प्रकार घडल्यापासून मी तिचं आमच्या घरी येणं बंद केलं होतं. त्या दिवशी अनिया खेळायला येईल का हे विचारण्यासाठी तिनं आमच्या घराची घंटा वाजवली.

'आत ये', मी तिला घरात बोलावलं. तिच्याकडे नीटसं न पाहताही मी ओळखलं, की ती पाठीमागे हातात माझ्यापासून काहीतरी लपवत आहे. माझ्यामागून ती घरात आली. मी स्वयंपाकखोलीकडे वळले तेव्हा ती दिवाणखान्यामधून माझ्या मुलीने जिथे बाहुलीचं घर उभं केलं होतं तिथं, फॅमिली रूममध्ये गेली. काही वेळाने मी जेव्हा दिवाणखान्यात गेले तेव्हा तिथल्या मोतिया रंगाच्या गालिच्यावर मला भलेमोठे लाल डाग पडल्याचं आढळून आलं.

फॅमिली रूममध्ये मुली बसल्या होत्या. तिथं जाऊन, मी आवाज चढवून विचारलं, 'आपल्या लिव्हिंग रूममधल्या गालिच्यावर हे डाग कसले?' हा प्रश्न विचारत असतानाच माझी नजर टोनीच्या हातातल्या, ती खात असलेल्या टोमॅटो सूपच्या डब्याकडे गेली.

"टोनी, तू हा सूपचा डबा घरात आणलास का?"

"अं, हो" टोनी चाचरत उद्गारली.

"आताच्या आता तो सूपचा डबा घेऊन घराबाहेर जा. यापुढे अशी खाण्याची वस्तू घेऊन आमच्या घरात पाऊल टाकू नकोस. माझ्या मुलींना फक्त स्वयंपाकघरात खाण्याची परवानगी आहे. दिवाणखान्यात कुणीही खाण्याचे पदार्थ आणत नाही."

टोनी काहीही न बोलता, आपला थंड सूपचा डबा घेऊन, मख्ख चेहऱ्यानं पुढील दरवाज्यातून घराबाहेर पडली. मी माझ्या मुलीकडे तोंड वळवून ओरडले, "यापुढे खेळण्यासाठी टोनीला घरात मुळीच घ्यायचं नाही. तिचे घाणेरडे, अनवाणी पाय या घरातल्या गालिच्यावर पडलेले मला आवडणार नाहीत." मुलींनी एकमेकींकडे पाहिलं.

"काही वेळा मलासुद्धा बाहेर जाऊन अनवाणी पायांनी चालण्याचा मोह आवरत नाही," अनिया म्हणाली.

"ते शक्य नाही," मी म्हणाले, "मी तुम्हाला अनेकदा सांगून चुकलेय की तसं करणं गलिच्छ व अपायकारक आहे."

"आपल्याकडे पाहुणे आले की आपणसुद्धा कित्येक वेळा व्हिडिओवर सिनेमा पाहात फॅमिली रूममध्ये जेवतो. आम्ही इथे बिस्किटं, शेंगदाणे, बेदाणेसुद्धा खातो. तूच तर देतेस आणून." अनिया पुन्हा म्हणाली.

मी निरुत्तर होऊन खाली बसले व डोक्यातला राग निवळवयाचा प्रयत्न करू लागले. टोनीच्या आईनं तिला काहीच कसं वळण लावलं नाही! तिच्या अशा वागण्यामुळे या कॉलनीतली अनेक कुटुंबं तिला आपल्या घरात येऊ देत नसत. तिनं तशी अपेक्षा तरी का करावी? माझ्या मुलींनी तिच्या घरात कधी पाऊलही टाकलेलं नसताना, तिच्या खेळण्यांशी त्या कधीही खेळलेल्या नसताना, त्या कधी बर्थ डे पार्टीला तिच्या घरी गेलेल्या नसताना मी माझ्या घरात तिचं 'बेबीसीटिंग' का करावं? मी माझ्या मुलींना तिच्या घरात कधीच पाऊल टाकू दिलं नसतं. तिचा भाऊ ड्रग्जवर हवेत चढून मोठ्यानं गिटार वाजवत किंवा बूमबॉक्सवर जोरानं लावलेलं संगीत ऐकत बसलेला असे; तर बहीण नखं, चेहरा व केस रंगवण्यात मग्न असे. तिच्या आईवडिलांना मी तिला फक्त हाका मारताना किंवा गाडीत चढता-उतरताना पाहिलेलं होतं, तेवढंच. मी टोनीकडून अनेकदा ऐकलं होतं, की तिची आई स्वीमिंग पूल बांधण्याकरता पैसे जमवण्यासाठी दोन दोन नोकऱ्या करते.

आता, मी इथे विचार करत बसलेली असताना स्वीमिंग पूलवर घडलेल्या घटनेची मला आठवण झाली. आमचा स्वीमिंग पूल तसा छोटा आहे, फॅमिली रूमच्या स्लायडिंग डोअरपासून फारतर दहा फुटांवर असेल. रस्त्यापासून रक्षण करण्यासाठी त्याच्या सभोवती विटांची एक भिंत आहे व ड्राईव्ह वेकडे जाणाऱ्या बाजूला एक लाकडी गेट आहे. आमचा पूल हे माझं काम करण्याचं

स्थान आहे. मला तिथं कधीही विश्रांती घेता येत नाही. मी लॉन चेअरवर बसण्यासाठी जेव्हा बाहेर येते तेव्हा माझं काम सुरू होतं.

"पुलाच्या फार कडेला पोहू नका - सोनिया, काँक्रिटला डोकं आपटेल. मध्यावर पोहत राहा."

"अनिया, एका वेळी तीन ट्यूब्ज् नका वापरू."

"मायरा, खोल पाण्यात उडी मारायची तुला मुळीच परवानगी नाही. तुला अजून नीट पोहता येत नाही. तू पायऱ्यांजवळ राहा. पाण्यात जायचं असल्यास लाईफ जॅकेट घाल. नाही घातलंस तर लगेच बाहेर यावं लागेल. पुन्हा पाण्यात उतरू देणार नाही."

मला स्वीमिंग पूल हे नीटनेटक ठेवणं जरी काम वाटत असलं तरी मुलींना उन्हाळ्यात पोहायला खूप मजा येत असे. एके दिवशी टोनी परवानगीवाचून गेट उघडून आत शिरली व जवळच्याच एका ॲल्युमिनियमच्या खुर्चीवर बसली. आलीच आहे म्हणून मी तिला मुलींबरोबर पोहण्यास परवानगी दिली. दुसऱ्या दिवशी सकाळीही ती अशीच एकाएकी उगवली व पोहण्यास तयार झाली. तिसऱ्या दिवशी आम्ही नाश्ता खात असता मी तिला स्वीमिंग पूलमध्ये उतरताना पाहिलं. तिचा चेहरा मळकट व केस विस्कटलेले होते. ती आधी शॉवरखाली उभं न राहताच पाण्यात उतरली. तेव्हा मी तिला पाण्यातून बाहेर येण्यास सांगून घरी पाठवलं व गेटला कुलूप ठोकलं.

आता, रात्रीच्या वेळी तिच्या आईवडिलांना तिला हाका मारताना ऐकून का कोण जाणे माझं मन चलबिचल झालं. मात्र तिनं आतापर्यंत केलेल्या अनेक उपद्व्यापांपायी तिच्यावर असलेला माझा राग काही केल्या कमी होत नव्हता. टोनीनं काही दिवसांपूर्वीच आमच्या सशाच्या पिंजऱ्याचं दार उघडून त्याला बाहेर सोडून दिलं होतं. त्यानंतर तो दोन-तीन दिवस गायब झाला होता. आता पुन्हा मला त्या घटनेची आठवण झाली.

कॉलनीत आईस्क्रिमची गाडी शिरल्यावर तिला थांबवून टोनी आळीतील मुलांना आईस्क्रिम बार आग्रहानं देई. त्या मागचा तिचा स्वार्थ मला जाणवला होता. तिच्याजवळ नेहमीच पैसे असत. तिचे आईवडील दिवसातला काही वेळ तिच्या सहवासात घालवण्याऐवजी तिला पैसे देऊन त्याची भरपाई करत. त्याचप्रमाणे टोनीदेखील आपल्या पैशांनी आपल्या मित्रमैत्रिणी 'विकत घेण्या'साठी जिवाचा आटापिटा करत असे. आळीतील एक-दोन खट्याळ मुलं वगळता

इतर कोणीही तिच्या औदार्याला बळी पडत नसत. अशा वेळी, खांदे उडवून टोनी आपल्या लठ्ठ पायांची घडी घालून, चेहऱ्यावर येणारे केस सावरत रस्त्याच्या कडेला बसून एकटीच आइस्क्रिम खात असे.

कधी कधी, तिची मोठी बहीण घरातूनच ओरडून तिला विचारताना ऐकू येई, 'टोनी, तुला आज होमवर्क आहे का? आत येऊन लवकर पुरं कर.' तिची बहीण सोळा वर्षांची आहे. तिच्या चेहऱ्यावर नेहमी कडवट व चिडखोरपणाचे भाव असतात. टोनीनं तिच्या भावाचं काही बिघडवलं असेल तरच तो तिच्याशी बोलतो आणि तेही असं- "माझ्या मोटारसायकलचा आरसा फिरवलास का पुन्हा? माझा टेपरेकॉर्डर ऑन का ठेवलास? पुन्हा माझ्या वस्तूंच्या जवळ जाताना किंवा त्यांना हात लावताना दिसलीस तर तंगडं मोडून टाकीन. लक्षात ठेव."

टोनीची उत्तरं ठरलेली असत. ती बहिणीला सांगे, "मला कधीच होमवर्क नसतं." किंवा भावाला- "मी कधीच तुझ्या मोटारसायकलला किंवा टेपरेकॉर्डरला हात लावत नाही."

रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पाहात, शेंगदाणे किंवा थंड हॉट डॉग खात ती रस्त्याच्या कडेला बसून राहते. रस्त्यावरून येणाऱ्याजाणाऱ्या तिच्या मैत्रिणींच्या आयांकडे पाहून ती नम्रपणे म्हणते, "हॅलो, मिसेस स्मिथ." किंवा "हाऊ आर यू, मिसेस स्लेटर?" तिच्यावर सहज विश्वास बसावा इतकं टोनीचं वागणं विनम्र आहे. परंतु या वस्तीत राहणाऱ्या मुलांच्या आया मात्र तिच्यावर विश्वास ठेवण्याइतक्या मूर्ख नक्की नाहीत. प्रत्येक जण कधी ना कधीतरी तिच्या विक्षिप्त संगोपनाच्या तिच्याप्रमाणेच बळी पडलेल्या आहेत. तिच्या वागण्यातला धांदरटपणा व विचित्रपणा लोक फार काळ सहन करू शकत नाहीत.

कधी कधी सकाळी, टोनी चुरगळलेला तोकडा स्कर्ट व जवळजवळ ट्रेडमार्क बनलेले आपले काळे बूट घालून पायऱ्यांवर बसून राहते आणि मी माझ्या मुलींना शाळेत पोचवण्यासाठी जात असता आमच्याकडे निरखून - टक लावून पाहात बसते. आणि मुलींबरोबर चाललेला माझा संवाद कानात साठवून ठेवते.

"तुमचं लंच बरोबर घेतलंत का? अनिया, तू गर्ल स्काऊटचे पैसे घेतलेस का? ट्रिपबद्दल परवानगीची नोट शिक्षकांना द्यायला विसरू नको. सोनिया, थांब, तुझा बो नीट करून देते. गार्ड नसेल तिथे क्रॉसवॉकच्या ठिकाणीच रस्ता ओलांडा. आय लव्ह यू बोथ. बाय. हॅव अ नाईस डे."

टोनी आपलं लंच स्वतः बनवते. अनिया सांगते, की ती खाण्याच्या काहीही विचित्र वस्तू लंचसाठी आणते - केचपबरोबर ब्रेड, बीन सूपचा डबा वगैरे. एकदा तर, एका शिक्षिकेने तिला पाच-सहा कप-केक्स खाताना पाहून प्रिन्सिपलच्या ऑफिसमध्ये पाठवलं होतं. मी सावधपणे मुलींना सांगितलं, की तुम्ही शक्यतो टोनीची संगत धरू नका, कारण त्यामुळे तुमच्या शिक्षकांचं तुमच्याबद्दल मत वाईट होईल. मी याबद्दल टोनीला दूषण देत नाही. तिला आईवडिलांनी वळण व शिस्त न लावल्यामुळे व तिच्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे ती तशी बनली आहे.

गेल्या आठवड्यातली गोष्ट. अनियाची गर्ल स्काऊटची ब्राऊनी पिन आमच्या घरापुढच्या लॉनवर हरवली. अनिया व सोनिया यांना गुढघ्यांवर बसून पिन शोधताना पाहून टोनीही त्यांना मदत करू लागली. आपल्या हातापायांवर रांगत व पोटावर लोळत ती गवताचा इंच न् इंच धुंडत होती. माझ्या मुली किड्यांना घाबरून शोधायच्या थांबल्या तरी टोनी, कशाचीही पर्वा न करता, अंधार पडत आला तरी पिन शोधत होती. मुली घरात जेवायला आल्या, मात्र मी नको म्हणत असतानाही टोनीने आपला शोध जारी ठेवला. शेवटी, अंधार पडल्यावर मीच जबरदस्तीनं तिला घरी पाठवलं.

त्या संध्याकाळी नऊच्या सुमारास माझ्या मुली दमल्यामुळे झोपण्यासाठी आपापल्या खोल्यांत गेल्या. त्यावेळी पुढील दरवाज्यावर कोणीतरी हळुवारपणे थाप मारल्याचा आवाज ऐकू आला.

"कोण आहे?" मी विचारलं.

"मी टोनी."

"काय हवंय तुला?" दरवाजा किलकिला करत, फटीतून डोकावत मी विचारलं.

"मी अनियाशी बोलू का जरा?"

"ती झोपलीय. तिला जे काही सांगायचंय ते मला सांगशील का?"

"अं. . हो." ती अडखळत म्हणाली. दरवाज्याच्या फटीतून आपला हात ढकलत ती मला म्हणाली, "ही माझी ब्राऊनी पिन मी अनियाला देण्यासाठी आणली आहे." तिच्या हातातली पिन मंद दिव्याच्या प्रकाशात चमकली. "मी आता ब्राऊनी नाही. माझी आई आमच्या मीटिंग्जना हजर राहू शकत नाही

किंवा रिफ्रेशमेंट्स किंवा पेय आणू शकत नाही, म्हणून तिनं माझं नाव गर्ल स्काऊटमधून काढून टाकलं आहे. अनिया माझी पिन वापरू शकेल.''

''ओह!'' मी म्हणाले, ''तो तुझा मोठेपणा आहे, टोनी. थांब, मी अनियालाच इथं बोलावते.''

मी टोनीला घरात न घेता पायऱ्यांवर उभं ठेवलं व अनियाला उठवून, टोनी आल्याचं सांगितलं. अनिया पायऱ्यांकडे गेली व माझ्या अपेक्षेपेक्षा लवकर आपल्या खोलीत परतली.

''काय झालं?'' मी आवाजात उत्सुकता येऊ न देता विचारलं.

''टोनी मला आपली ब्राऊनी पिन देण्यासाठी आली होती. मी तिला 'नो थँक्यू' म्हणून सांगितलं.''

''ती एवढी द्यायला आली तर तू ती पिन का नाही घेतलीस?'' माझ्या आवाजातून थोडी निराशा डोकावली असावी, ''तुला जी पिन हवी आहे ती तिच्याजवळ आहे. तू घ्यायला हवी होतीस.''

''मला वाटलं, तू ती पिन मला घेऊ देणार नाहीस.''

सोनियाने मधेच तोंड खुपसलं, ''तिने ती चोरली असेल कुठूनतरी.''

''टोनी आपला चांगुलपणा तुला दाखवत होती. तुला कळत का नाही? कधीतरी, कुणीतरी तिच्या चांगुलपणाला होकार द्यायला हवा. तुझ्या चांगुलपणाची दखल घेतली गेली नाही तर तुला काय वाटेल?'' मी म्हटलं.

''ओह!'' अनिया दात आवळत, आवाजातला कडवटपणा कमी करण्याचा प्रयत्न करत उत्तरली, ''मला वाटलं, की ती चांगली मुलगी नाही असं तुझं मत आहे.''

खिडकीबाहेर काही वादावादी चालली असल्याचे आवाज ऐकू येऊ लागले. मी उठून खिडकीजवळ गेले. टोनीच्या घराचा जाळीचा दरवाजा कोणीतरी जोराने बंद केल्याचा आवाज ऐकू आला व टोनीचे वडील तिथून आत जाताना माझ्या नजरेस पडले. तिची आई रस्त्यातून पळत जाताना दिसली. बाहेर जाऊन टोनीला हाका देण्याची मलाही इच्छा झाली. कितीतरी वेळा माझ्या मुलींना तिनं आइस्क्रिम देऊ केल्याचं मला आठवलं, ब्राऊनी पिन आठवली व त्याबरोबरच ती किती लहान आहे तेही ध्यानी आलं. तिचा कधीही न हसणारा गुबगुबीत चेहरा नजरेसमोर उभा राहिला. तिचे फार घट्ट किंवा ढगळ होणारे कपडे आठवले.

आगीचे बंब आता परत निघाले होते. लोक आपापल्या घरी परतू लागले होते. एवढ्यात, माझ्या कानांवर कोणाच्या तरी बुटांचे आवाज व त्यासोबत ओरडणं ऐकू आलं.

"तू पुन्हा तिथे गेलीस तर याद राख, तंगडं मोडून टाकीन, जीव घेईन तुझा. ऐकू आलं तुला?"

आपल्या आईचे हे बोल ऐकणारी टोनी एकटी नव्हती. ब्लॉकमधल्या सर्वांनी तिचं वक्तव्य ऐकलं होतं. चेव आल्यासारखी टोनीची आई ती वाक्यं पुनःपुन्हा उच्चारत होती. हा आवाज टोनीला मारण्याचा धाक दाखवणारा नव्हता, तर आपल्या मुलीवरचा आपला वचक, ताबा केव्हाच सुटल्यामुळे अपराधी वाटणाऱ्या, अपमानित झालेल्या एका स्त्रीचा होता.

रस्त्याच्या पलीकडील टोनीच्या घराचा दरवाजा पुन्हा उघडला गेला व टोनीचे वडील बाहेर आले. त्यांची पत्नी ओरडली, "ती सापडली मला."

"कुठे होती?" रस्त्यावर येत वडिलांनी विचारलं.

"रेक्रिएशन सेंटरच्या पूल हॉलमध्ये होती."

"टोनी, तू तिथं काय करत होतीस या वेळी?" त्यांनी रागात विचारलं.

ती काहीच बोलली नाही.

आपापल्या काही वैयक्तिक कारणांस्तव आम्हा सर्वांना टोनीलाच सर्व गोष्टींबद्दल दूषणं देण्याची, तिला जबाबदार धरण्याची गरज भासत होती. आग विझवून आगीचे बंब परत गेल्यावर विजय परतला होता. अनिया माझ्या शेजारी खिडकीजवळ येऊन केव्हा उभी राहिली ते माझ्या ध्यानात आलं नाही.

"टोनी अजून जागी आहे," अनिया म्हणाली, "तिचे आईवडील तिच्यावर ओरडत आहेत."

"तिने झोपायला हवं होतं आतापर्यंत. तुला आठवतं, तिनं तुला ब्राऊनी पिन देऊ केली होती?" मी.

"हूं," अनिया जांभई देत म्हणाली, "त्या दिवशी तिच्याकडून ती पिन घ्यायची माझी फार इच्छा होती."

"मग का नाही घेतलीस?"

"तू रागावशील म्हणून भीती वाटली. पण तिच्याशी मैत्री करावी असं मला मनापासून वाटतं. कित्येक वेळा फार शहाण्यासारखं वागते ती!"

"असं मलाही कधी कधी वाटतं, अनिया. मी कशाला मान्यता देईन

यापेक्षा तुझ्या भावना काय कौल देतात त्याप्रमाणे वागायचा तू प्रयत्न करावास.''

''मला तुझ्याकडून ब्राऊनी पिन हवी आहे असं मी तिला उद्या सांगीन.''

''जरूर.''

''मॉम,मला काय वाटतं, माहीत आहे? टोनीचं आयुष्य फार सुखी आहे किंवा यापुढे सुखी होईल असं मला नाही वाटत. परंतु मी जर या वयात तिला माझ्या मैत्रीचे, प्रेमाचे काही क्षण देऊ केले तर, मला वाटतं, पुढे-मागे तिच्या वागणुकीत खचित बदल होण्याची शक्यता आहे.''

''अनिया, तुझ्यासारखी माणसं या दुनियेत पुष्कळ झाली तर आयुष्यात काही क्षण का होईना सुखी होण्याची संधी प्रत्येकाला नक्की मिळेल.''

''मी उद्यापासून खेळत जाऊ तिच्याशी?''

''ते तुझं तू ठरव. यापुढचे बरेचसे निर्णय स्वतःचे स्वतः घेण्याइतपत मला वाटतं, तू प्रौढ झाली आहेस!''

◆◆◆

# प्रवासाचा शेवट

रस्त्याच्या कडेला, दूरवर... मेलनीला एक छोटासा काळा ठिपका दिसला. हळुहळू तो ठिपका मोठा मोठा होऊ लागला. आपल्या गाडीच्या विण्डशील्ड-मधून तिनं जेव्हा रोखून पाहण्याचा प्रयत्न केला तेव्हा तिच्या ध्यानी आलं की तो ठिपका म्हणजे काळ्या कपड्यांतला एक नाविक आहे.

मेलनीनं मनात आणलं तर आज ती त्या नाविकाला आपल्या गाडीत लिफ्ट देऊ शकत होती; लिफ्टच काय ती आज स्वतःला रुचेल ते सर्व करू शकत होती! तिला अडवणारं आता कोणीही नव्हतं. हळुहळू तिनं गाडीची गती मंदावली व ती त्या नाविकाच्या जरासं पुढे जाऊन रस्त्याच्या कडेला थांबली. तिच्याजवळ पोचण्यासाठी त्याला थोडं चालत यावं लागलं.

मेलनीनं पॅसेंजरच्या बाजूच्या खिडकीची काच वाकून खाली केली. तोवर पळत पळत येऊन तो नाविक तिथवर पोचला होता. मेलनीनं त्याच्याकडे रोखून पाहिलं व आपण काय करत आहोत ते लक्षात येण्यापूर्वीच तिनं त्याला विचारलं, 'तुला लिफ्ट हवी आहे का?' तिला स्वतःचा आवाज जरा विचित्र व कापरा वाटला. मान डोलावून त्यानं तिच्या प्रश्नाला होकार दिला व तो तिने उघडलेल्या दरवाज्यातून गाडीत तिच्या शेजारी स्थानापन्न झाला. हातातली डफल बॅग

मागच्या सीटवर फेकत त्यानं तिला विचारलं, "तू या हायवेवर कोणत्या ठिकाणापर्यंत जाणार आहेस?" तिला प्रश्न विचारत असताना त्यानं आपल्या डोक्यावरची हॅट काढून आपल्या हाती घेतली.

गाडी शोल्डरवरून परत हायवेवर आणता आणता मेलनीनं उत्तर दिलं, "नक्की ठिकाण मला ठाऊक नाही, पण फार लांबचा पल्ला मला गाठायचा आहे एवढंच मी जाणते."

"अस्सं!" जणू काही त्या प्रश्नात उत्तराची केवळ अपेक्षा नाही तर मागणी होती.

हायवे बराच दूरवर पसरलेला दिसत होता. तिथं नजर लावत मेलनीनं जबाब दिला, "हा हायवे मैलोन् मैल लांब पसरलेला आहे आणि मला शेवटच्या टोकाला जायचे आहे."

"एकटंच?"

"हो. त्यात काय बिघडलं?"

त्यानं गालातल्या गालात हसत, तिच्याकडे पाहत मिस्किलपणे प्रश्न केला, "हा हायवे जर कॅलिफोर्नियापर्यंत जात असेल तर?"

"तर मी कॅलिफोर्नियापर्यंत जाईन."

गाडीपुढचा रस्ता लांब किरणांनी उजळत ढळून गेलेल्या दुपारचा सूर्य आता त्यांच्या गाडीच्या मागे आला होता. नाविकानं एक दीर्घ जांभई देत आपले दोन्ही हात लांबवून सीटच्या डोक्यावर टेकवले. मेलनीकडे वळत तो म्हणाला,"रस्ता कोठेही जाईना का, पण तो कॅलिफोर्नियामध्ये नक्कीच संपणार नाही, कारण आपण पूर्वेच्या दिशेनं जात आहोत, पश्चिमेच्या नाही."

मेलनीनं त्याच्या चेहऱ्याकडे क्षणभर नजर फेकली व ती कुतूहलानं स्वतःशी विचार करू लागली. तो वयानं फार मोठा वाटत नव्हता. वयस्क, सुरकुतलेला किंवा मध्यमवयीन, टकल्याही दिसत नव्हता; नुकतीच मिसरूड फुटलेला पोरगेलासाही वाटत नव्हता.

"नौदलामध्ये आम्हाला दिशा ओळखायला व दाखवायला शिकवतात," तो म्हणाला, "नेव्हिगेशन म्हणतात त्याला. फार छान शिक्षण आहे. सर्वांनाच शिकवायला पाहिजे. कुणी-कधी-कुठे जंगलात दिशा चुकला तर पुन्हा योग्य मार्ग सापडण्यासाठी मदत होते त्याची."

"मी मुळी कधी दिशा चुकलेच नाही," ती पुटपुटली. तिचे डोळे चमचमणाऱ्या

हायवेच्या दुसऱ्या टोकाच्या दिशेनं भिरभिरत होते. अचानक त्या क्षणी, खरंच, आपली जंगलात दिशा चुकावी असा विचार तिच्या मनांत आला. एकटीनं रस्ता चुकावा असं तिला क्षणभर वाटलं. घनघोर जंगलात पायदळी पानं तुडवत असताना, ओलसर हिरवळीचा वास घेताना एकाएकी तिच्या नाविकानं येऊन म्हणावं, 'मी तुला योग्य मार्ग दाखवतो, ताऱ्यांच्या साहाय्यानं'. ती त्याच्यासोबत थंडगार हवेत दूरवरचा प्रवास करावा अशी स्वप्नं पाहू लागली.

"ही गाडी तुझी स्वतःची आहे?"

"हो", तिनं ठासून सांगितलं, "मी काही कोणाची तरी गाडी पळवलेली नाही."

"छान आहे गाडी; तू स्वतः विकत घेतलीस?"

"अंहं, वडिलांनी माझ्या सतराव्या वाढदिवशी मी शाळेतून ग्रॅज्यूएट झाल्याबद्दल मला बक्षीस दिली."

"ओह! म्हणजे आता तू स्वतःला हवं तिथं जाऊ शकतेस, अगदी हायवेच्या शेवटापर्यंतसुद्धा!'

"हो, हायवेच्या शेवटापर्यंतसुद्धा."

त्या नाविकानं हात व पाय लांब करून आळस दिला.

"रस्त्याच्या टोकाला पोचल्यावर पुढे काय? घरी जाण्यासाठी परत फिरणार का तू?"

ती मंदपणे हसली. चेहऱ्यावर मितहास्य ठेवून, बाजी जिंकल्याचा आव आणून त्याच्याकडे पाहत ती म्हणाली, "नाही, मी घरी परत जाण्यासाठी घर सोडलेलं नाही. वेळ आली तर गाडी विकून पैसे जमवीन, हायवेच्या शेवटाला जाऊन राहीन. कारण माझ्याकडचे सर्व पैसे जवळजवळ संपुष्टात आले आहेत."

"याचा अर्थ, तू घरातून पळून जात आहेस."

"तसंच समजा. आता त्यात काही रहस्य नाही."

तो काही क्षण स्तब्ध बसून राहिला. अनोळखी गाव, नवीन अपार्टमेंट व नोकरी हे त्याच्यापासून लपवण्यासाठी तिला काहीतरी बोलावंसं वाटलं.

"का ते मात्र विचारू नका? कारण काय ते मलाही ठाऊक नाही. त्यामुळे मी काही स्पष्टीकरण देऊ शकणार नाही. मी जे करते आहे ते मला केलंच पाहिजे. कदाचित, तुम्ही ते समजू शकणार नाही. त्यापासून मला परावृत्त करण्याचा प्रयत्नही करू नका. आजवर नेहमीच सर्वांनी तसा प्रयत्न केला आहे. यावेळी मात्र मी माझ्याच मार्गानं जाण्याचं ठरवलंय."

त्यानं वळून तिच्या चेहऱ्यावर नजर स्थिरावली व तिच्याकडे रोखून पाहिलं. ती जे काही बोलणार होती ते ती बोलण्यापूर्वीच त्याला समजलं आहे असं ती नजर सुचवत होती.

"तुम्ही काही बोलत का नाही?" ती उतावीळपणे म्हणाली, "तुम्ही गप्प बसून माझ्याकडे पाहत का आहात? मी घरी परत जावं असं कदाचित तुम्हाला मनापासून वाटत असेल किंवा मी मला हवं ते नक्की करू शकीन असाही विचार क्षणभर तुमच्या मनात डोकावला असेल. ही गाडी माझी आहे व मी तिचं मला पाहिजे ते करू शकते."

"ठीक, ठीक." तो हात उंचावून म्हणाला, "मी एक शब्दही उच्चारलेला नाही. मी फक्त ऐकत होतो. तू जरा गाडीचे दिवे लाव. अंधार पडत आहे."

आपल्या पाठीमागे लाल रंगाचा पट्टा टेकड्यांच्या वर ठेवून सूर्य या वेळपर्यंत क्षितिजाखाली पोचला होता.

हात लांब करून मेलनीनं गाडीचे दिवे लावले. काही क्षण ती त्याला विसरण्याचा प्रयत्न करत होती. पण छे! तो अजून तिथंच होता. तिचा श्वासोच्छ्वास जोरात सुरू झाला. हा येण्यापूर्वी सारं कसं अगदी व्यवस्थित, सुरळीत होतं. फक्त ती आणि तिची गाडी.

नाविकानं त्याच्या बाजूच्या खिडकीची काच जरा खाली केली. संध्याकाळची थंड हवेची झुळूक अंगावर व चेहऱ्यावर आल्याबर ती शहारली.

तो अजून तिच्या शेजारी होता. एक पुरुष; काळ्या युनिफॉर्ममधील एक पुरुष, पण ते एक सत्य होतं व ते सत्य तिच्या स्वप्नात व्यत्यय आणत होतं.

"नाव काय तुमचं?" तिनं एकदम त्याला विचारलं. त्या स्तब्धतेत तिला स्वतःचा आवाज फार मोठा असल्याचं जाणवलं. "मी नौदलामध्ये ९३७४५१९ म्हणून ओळखला जातो," तो संथपणे म्हणाला. "पण नागरिक या नात्यानं माझं नाव ऑर्थर ब्रिजपोर्ट आहे. तुमचं नाव काय?"

"तुझ्यासारखा मला नंबर नाही. मेलनी मिलर या नावानं मी ओळखली जाते."

"छान आहे नाव. तुला कुठं जायचं आहे हे तू मला अद्याप सांगितलं नाहीस."

"प्रथम, तुम्ही कोणत्या गावाला निघाला आहात ते तरी कळू द्या."

"बर्नम नावाच्या छोट्या गावाला जातोय." त्यानं आपले केस मागे सारत म्हटलं, "तू आपल्या घरातून पळून जात आहेस व मी आपल्या घरी जायला निघालो आहे. आता आपण एकाच गाडीत बसलो आहोत, हा खरंच विरोधाभास आहे."

ती गप्प बसली. जणू, तो आता काय बोलणार ते तिला अगोदरच समजलं होतं.

"मागे एकदा मलासुद्धा असंच काहीतरी करावंसं वाटलं होतं. घरातून पळून जाऊन नौदलात भरती होणं जरुरीचं वाटलं त्यावेळी."

तिला वाटलं, की तो आता आपल्याला सुनावणार. काही बोलण्यासाठी तो तोंड उघडण्यापूर्वी ती म्हणाली, "मला कोणाकडून लेक्चरची मुळीच गरज नाही."

"छे, छे. मी लेक्चर देणार नाही. तू काळजी करू नकोस. कुणाच्याही लेक्चरबाजीशिवाय तू शिकशील, धडा घेशील. माझी खात्री आहे त्याबद्दल."

"हे तुमचं बोलणं म्हणजे भाषणाची सुरुवात असल्यासारखं वाटतं आहे."

"अंहं," तो म्हणाला, "मी कुठे जात आहे हे तू मला विचारलंस. तू कुठून आलीस हे मी तुला विचारावं असं मला वाटतं आहे."

"डॅनवे. ते कुठे आहे ते तुला माहीतही नसेल."

"डॅनवे? हां, काल मी डॅनवेला पोचलो होतो. एका ट्रक ड्रायव्हरनं मला थोड्या वेळापुरती राईड दिली होती."

"तू आता कायमचा घरी जाण्यास निघाला आहेस का? नौदलाचं शिक्षण संपलं?"

"नाही, अजून दहा महिने शिल्लक आहेत. मला नऊ दिवसांच्या सुटीचा पास मिळाला आहे."

नाविकाचे डोळे आपल्यावर रोखले आहेत असं मेलनीला वाटलं. आणखी किती मैल बाकी आहेत नव्या गावाला, नव्या नोकरीला, नव्या अपार्टमेंटला?

"बर्नम किती दूर आहे?" तिनं वळून विचारलं. तिच्या आवाजात कंप असल्याचं तिलाच जाणवलं.

"जवळजवळ सत्तर ते पंच्याहत्तर मैल असेल."

"सत्तर ते पंच्याहत्तर?" ती स्वतःशी पुटपुटली. तिनं समोरच्या काळोखाकडे पाहिलं. जणू त्या काळोखानं व नाविकानं तिला कैद केलं होतं.

तिच्या मनात आलं, गाडी रस्त्याच्या कडेला उभी करून त्याला म्हणावं, तू इथेच उतर. मी तुला यापुढे नेऊ शकत नाही.

गाडी थांबव, गाडी थांबव... ती स्वतःला बजावू लागली. रस्ता तिला पांढरी पट्टी असलेल्या, कधीही न थांबणाऱ्या ट्रेड मिलसारखा भासू लागला. ऑर्थरनं सीटवर आपली पोझिशन बदलली. त्याचा हात तिच्या सीटवर तिच्या

खांद्याच्या अगदी जवळ असल्याचं तिला जाणवलं. पुरुषाचा हात.... गुबगुबीत हात, छोटी - चौकोनी नखं असलेला पुरुषी हात. हा नाविक पोरगेलासा मुळीच नव्हता, जवळजवळ तीस-बत्तीस वर्षांचा पुरुष असावा.

हायवे अजूनही ट्रेड मिलसारखा पळत होता. ती त्याला ओळखतही नव्हती. 'हे पाहा मिस्टर, आता खूप उशीर झाला आहे आणि मी थकले आहे. मी परत जाण्यासाठी वळणार आहे. तेव्हा तुम्ही उतरा आता,' बोल, सांग त्याला–तिचं मन आक्रंदत होतं.

"मिस्टर ऑर्थर, किती वाजले?"

त्यानं हाताची बाही बाजूला सारली व आपल्या केसाळ हातावरील घड्याळाकडे पाहत म्हटलं, "नाइण्टीन हंड्रेड. म्हणजे तुमच्या भाषेत सात वाजले."

सात म्हणजे जेवणाची वेळ, घरी तिच्याबद्दल चर्चा चालू असेल या वेळी. आपण का घर सोडलं, त्यांना आपलं मन कधी समजणार नाही, कधीच नाही.

ऑर्थर समोरच्या अंधाराकडे निरखून पाहत होता. "ते पाहा समोर दिवे आहेत, निऑनचे दिवे."

तिला आशा वाटली. संपलं. हा बहुधा हायवेचा शेवट असेल.

"काय पाट्या आहेत?"

"मोटेल. स्प्रिंग व्हॅली मोटेल."

"ओह!" तिच्या घशातल्या नसा आवळून आल्या.

'स्वीमिंग पूल, टीव्ही, व्हेकन्सी, रेस्टोराँ. सर्व सोयी आपण इथं थांबू या का? काहीतरी जेवायला मिळेल...' त्यानं प्रश्नार्थक दृष्टीनं तिच्याकडे पाहिलं जणू काही त्याच्या नजरेतल्या जरबेनं गाडीची गती मंदावली.

"उशीर होतोय आणि मला साडेपाच वाजता जेवायची सवय आहे. आपण इथं थांबू या का?"

तिच्या पोटात गोळा उभा राहिला.... नाही, नाही, आता नाही. मला पुढं जायचंय. प्रत्यक्षात ती म्हणाली,

"ठीक आहे. तुमची इच्छा असेल तर थांबू इथं."

रेस्टोराँजवळ आल्यावर तिनं गाडी वळवली व ती रिकाम्या पार्किंग लॉटवर होणारा टायरचा आवाज ऐकू लागली.

मेलनीनं आपली पर्स घट्ट पकडली. जेवणाच्या वासानं मोहून जाऊन

एकदोनदा तिला झोकेही दिले. गुलाबी निळ्या निऑन साईन्स विशिष्टपणे ओरडत होत्या–स्टेक्स! चॉप्स! सी फूड!... ऑर्थर तिच्या शेजारी उभा होता. त्याचा हात तिच्या कोपराला स्पर्श करत होता व रेस्टोरॉंच्या दिशेनं चालताना खडीच्या सडकेवर त्यांचे पाय एका सुरात आवाज करत होते.

रेस्टोरॉंचं दार उघडताच अंगावर आलेल्या आतल्या उबदार हवेमुळे त्यांना खूप बरं वाटलं व आतमध्ये पसरलेल्या जेवणाच्या वासामुळे त्यांची भूक वाढली.

वेट्रेसनं दाखवलेल्या टेबलापाशी बसल्यावर ऑर्थरनं मेनू कार्ड हाती घेऊन वाचायला सुरुवात केली. तो सारखा, न थांबता बोलत होता. का कोण जाणे, पण तिला त्याच्या घोगऱ्या आवाजाची भीती वाटू लागली. आपल्या पायांशी खुर्चीच्या पायांजवळ आपली पर्स हलकेच ठेवून तिनं एक दीर्घ श्वास घेतला. रेस्टोरॉं जवळजवळ रिकामं होतं. भिंतीवर जिथंतिथं खाण्याची पोस्टर्स लावली होती. पोस्टर्स नव्हती ती जागा म्युरल्संनी पटकावली होती.

ती एकाएकी उठून उभी राहिली तेव्हा तिच्या चेहऱ्यावर अस्फुट हास्य होतं. त्याच्याकडे पाहत, तोंडातल्या तोंडात 'एक्स्क्युज मी' असं पुटपुटत ती टेबलापासून दूर झाली. त्यांच्या रोखानं येणाऱ्या वेट्रेसकडे दुर्लक्ष करून ती 'रेस्टरूम-टेलिफोन' लिहिलेल्या कमानीखालून 'लेडीज' पाटी असलेल्या रेस्टरूममध्ये शिरली.

दरवाज्याला पाठमोरी होऊन मेलनीनं दीर्घ निःश्वास सोडला. या जागी फ्रेंच फ्राईजचा व हॅम्बर्गरचा वास जाऊन त्याची जागा डिसइन्फेक्टंटच्या उग्र वासानं घेतली होती. तिला इथं सुरक्षित वाटलं. आरशात आपल्या प्रतिबिंबाकडे पाहत तिनं चेहऱ्यावर गार पाण्याचा शिडकावा मारला व पेपर टॉवेलनं हळुवारपणे आपला चेहरा पुसला.

इथं मी निर्धास्तपणे व सुसंगत विचार करू शकत होते, यापुढचे बेत पक्के करू शकत होते. तिनं क्षणभर डोळे मिटून घेतले, तशी तिला कल्पना सुचली. ती पुन्हा पळून जाणार होती, त्या नाविकापासून पळणार होती. तो ज्यावेळी रेस्टरूमला जाईल त्यावेळी ती गुपचूप गाडीतून निघून जाणार होती, म्हणजे त्याच्यापासून तिची सुटका झाली असती. ती डोळे बंद ठेवून स्वतःशी हसली. पुन्हा आरशातल्या आपल्या प्रतिबिंबाकडे पाहत मेलनीनं मंद स्मित केलं व दरवाज्यापाशी येऊन त्याची वापरून खिळखिळी झालेली मूठ फिरवली.

टेबलाच्या जवळ आल्यावर तिथल्या खुर्चीत नाविक नजरेस पडला नाही, तेव्हा क्षणभर ती चक्रावली. मेलनीनं वळून परत जाण्याचा पवित्रा घेतला, तोच तिची दृष्टी पंचवीस सेंट्सच्या नाण्याखाली ठेवलेल्या टेबलावरच्या एका चिठ्ठीवर गेली. काही क्षण तिच्या हृदयाचा ठोका चुकला. पेपर नॅपकिनवर मोठ्या अक्षरात खरडलेले काही शब्द तिच्या नजरेस पडले.

'मेलनी,

पुढील आठवड्यात परत जाताना डॅनवेला पोचीन तेव्हा तुझी गाडी तुला परत देईन. टेबलावरचं पंचवीस सेंट्सचं नाणं तुला फोन करण्यासाठी उपयोगी पडेल अशी आशा आहे. तू केलेल्या मदतीबद्दल तुझे मनःपूर्वक आभार.

ऑर्थर ब्रिजपोर्ट'

मेलनी संथपणे खुर्चीत कोसळली आणि टेबलावरचं नाणं व चिठ्ठी यांच्याकडे रोखून पाहू लागली. तिनं खिडकीकडे नजर वळवली व त्यातून दिसणाऱ्या पार्किंग लॉटवर लावली. तिनं गाडी पार्क केलेली जागा आता मोकळी होती. काही वेळापूर्वी जोरात धडधडणारं तिचं हृदय शांत होऊ लागलं होतं.

ती तशीच शांतपणे बसलेली असताना हॅम्बर्गर व मिल्कशेक घेऊन वेट्रेस तिच्या टेबलापाशी आली व तिच्या पुढ्यात ठेवत म्हणाली, "तुमच्या सोबत आलेल्या त्या सद्गृहस्थांनी जाण्यापूर्वी तुमच्यासाठी एक निरोप ठेवला आहे. जाण्याची फार घाई असल्यामुळे आपण थांबू शकत नाही असं त्यांनी सांगितलं आहे. तुमच्यासाठी ह्या जेवणाचे पैसे त्यांनी दिले आहेत व तुम्हाला नेण्यासाठी लवकरच कुणीतरी येईल असा निरोप तुम्हाला देण्यास सांगितलं आहे."

मेलनीनं नाण्याकडे व हॅम्बर्गरकडे आलटून पालटून पाहिलं व घाईघाईनं नाणं उचलून ती टेलिफोनच्या रोखानं धावली. मशीनमध्ये नाणं टाकून तिनं नंबर फिरवला. पलीकडे बेल वाजू लागताच तिनं बाकाला पाठ टेकवली व डोळे मिटून घेतले. एक उबदार थंडाई तिच्या पोटात शिरली.

पलीकडील बाजूला कोणीतरी फोन उचलल्याचा आवाज आला.

"हॅलो, हॅलो, डॅडी-", क्षीण व थकलेल्या स्वरात ती म्हणाली, "मी मेलनी बोलते आहे...."

◆◆◆

# विरलेलं स्वप्न

माझ्या दृष्टीपुढून स्वप्नाळू जेमी हलत नव्हता. त्यानं आपल्या भावी आयुष्याची केलेली आखणी, रचलेले अनेक मनसुबे-आडाखे भूतकाळानं निर्माण केलेल्या भुतानं गाडले होते, चकवले होते. जसं काही, त्यानं केलेला प्रत्येक मनसुबा कोणीतरी ठरवून ठेवल्याप्रमाणे हमखास चुकणार होता किंवा तो चुकण्यासाठी सर्व मनसुबे रचत होता. एकतर त्याचा नाइलाज तरी होता किंवा त्याला योग्य इलाज, उपाय मिळत नव्हता. तो अंधारात एकटा, नुसता चाचपडत होता. आपल्या परीनं या चिखलातून बाहेर येण्यासाठी प्रयत्नांची जमेल तशी पराकाष्ठा करत होता. त्याला गरज होती कोणाच्या तरी जिव्हाळ्याची, ओलाव्याची, मायेची; आणि सर्व गोष्टी यशाच्या तराजूत मोजून-मापून-तोलून पाहणारा समाज त्याची नेमकी हीच गरज भागवू शकत नव्हता. कुटुंबव्यवस्था व समाजव्यवस्था ह्यांची शिकार झालेला जेमी आतल्या आत भरडला गेला होता.

रिमांड होमच्या सर्व मुलांत जेमी नेहमी माझ्या आठवणीत असे. मी तिथं असताना आणि नसतानाही. तसं, कोणाच्या मनात वास्तव्य करून राहण्याजोगं, जगावेगळं असं काही त्याच्यात नव्हतं. किरकोळ शरीरयष्टी, उजळ पण उन्हानं रापलेला रंग, मान ताठ करून चालण्याची

ढब यांत वेगळं असं काही नव्हतं. फक्त एक गोष्ट मनावर ठसा उमटवून जाई – त्याचे भेदक पण करुण डोळे. कोणाचंही मन वश करण्याची, मत बदलायला लावण्याची त्यात एक प्रकारची शक्ती होती. तसा तो थोडा विक्षिप्त, एककल्ली होता. त्याला कोणी जवळचा मित्र वा नातेवाईक असल्याची कोणाला माहिति नव्हती. तो सर्वांमध्ये मिसळूनही सर्वांपासून अलिप्त होता. खेड्यामध्ये बालपण घालवलेल्या मुलाच्या अंगात आता शहरी रक्त सळसळत होतं. याची जाणीव त्याच्या सहवासात येणाऱ्या प्रत्येक माणसाला झाल्याखेरीज राहत नसे.

गेलं वर्ष-दीड वर्षं त्याला स्वतःच्या मुलासारखं वागवणाऱ्या त्याच्या कलेच्या शिक्षकांनासुद्धा त्याच्यापर्यंत कधी पोचता आलं नव्हतं. पण असं असूनही सर्व मुलांत तो प्रिय होता आणि त्याला कारण तसंच होतं. तो चित्र सुरेख काढत असे. एवढंच नव्हे, तर बास्केटबॉलही उत्तमरीत्या खेळत असे. कोर्टावर लवचीकपणे इतर खेळाडूंना चुकवत पळणारी त्याची आकृती डोळ्यांत ठरत नसे. त्याच्यामुळे आमच्या संस्थेनं बऱ्याच ट्रॉफी मिळवल्या होत्या. माझ्या ऑफिसच्या बाहेर बैठकीच्या खोलीत शोकेसमध्ये झळकणाऱ्या बऱ्याच ट्रॉफी जेमीनं मिळवून दिलेल्या होत्या.

संस्थेमध्ये दोन मुख्य इमारती होत्या. एकीच्या खिडक्या–दरवाज्यांना नेहमी कुलूप असतं, तर दुसरी इमारत खुली होती. रिमांड होमची शाळा या दुसऱ्या इमारतीत होती. आपल्या वागणुकीत योग्य तो बदल घडवून आणलेल्या मुलांचा ह्या खुल्या इमारतीत समावेश होई. या मुलांना बरंच स्वातंत्र्य दिलं जात असे. बंद इमारतीत नवीन आलेल्या व पळून जायचा प्रयत्न करणाऱ्या मुलांचा मुक्काम असे.

स्वातंत्र्य असलेल्या बिल्डिंगमधलीही काही मुलं पळून जाण्याचा प्रयत्न करत. शंभरातल्या तिघांनी लगेच पळ काढला होता. थोड्याशा उरलेल्या सदसद्विवेकबुद्धीचा वापर करून काहींनी सहाव्या-सातव्या फेरीत पळ काढला होता. पोलिसात खबर दिल्यावर पुढे केव्हातरी या मुलांना परत पाठवलं जाई व त्यांची बऱ्याच दिवसांसाठी बंद इमारतीत रवानगी होई. जेमी त्यातलाच एक होता. एके दिवशी, संध्याकाळच्या जेवणाच्या पंक्तीत तो नजरेस पडला नाही.

दोन-अडीच महिन्यांनंतर रिमांड होममधल्या एका मुलाला ॲपेंडिसायटिसचा ॲटॅक आल्यामुळे ऑपरेशनसाठी शहरातल्या सरकारी रुग्णालयामध्ये न्यावं लागलं. त्याला भेटायला गेलं असता पोलिसांच्या पहाऱ्यात असलेल्या एका

रुग्णावर माझी नजर गेली. माझा माझ्यावर विश्वास बसेना. तो बँडेजेस्‌मध्ये जखडलेला जेमी होता. पोलिसाला माझी ओळख देऊन मी जेमीशी बोलण्याची परवानगी मागितली. त्यानं माझ्याकडे पाहून केविलवाणं, क्षीण हास्य करून हात पुढे केला. त्याचा हात हातात घेऊन, थोडं थोपटून मी त्याच्याकडे प्रश्नार्थक नजरेनं पाहिलं. अपराधी चेहऱ्यानं त्यानं बोलायला सुरुवात केली, "मला पोलिसांची गोळी लागली."

"हूं."

"मी चोरी करण्यासाठी एका घरात कुलूप तोडून घुसण्याच्या प्रयत्नात होतो."

जेमीला प्रामाणिकपणा–नेकी कोणी–कधी शिकवली नव्हती. तो ज्या समाजात वाढला तिथं प्रामाणिकपणाचं वेगळं शिक्षण घ्यावं लागतं. अप्रामाणिकपणा, असत्य हा त्या समाजाचा दृश्य स्थायिभाव आहे. त्यात वाढणाऱ्या प्रत्येक घटकाच्या रक्तात तो भिनलेला असतो.

प्रकृती सुधारल्यावर मॅजिस्ट्रेटनी त्याला रिमांड होममध्ये परत पाठवलं तेव्हा जेमीची रवानगी बंद इमारतीत झाली व तो स्वातंत्र्याला मुकला. तो एक चांगला कलावंत होता व त्याच्या चित्रकलेचा विकास व्हावा म्हणून आर्टच्या वर्गांना हजर राहण्याची त्याला खास परवानगी देण्यात आली. परत आल्यावर थोड्याच दिवसांनी त्यानं मला भेटण्याची परवानगी मागितली व आपल्या आर्ट शिक्षकाबरोबर तो माझ्या खोलीत मला भेटायला आला. माझ्याकडे अपराधीपणे पाहत विनवणीच्या सुरात तो म्हणाला,

"बाई, एक फार विलक्षण घटना घडली."

मी मान उंचावून उत्तराच्या अपेक्षेनं त्याच्याकडे पाहिलं.

"हॉस्पिटलमध्ये मी एक आवाज ऐकला होता. तोच आवाज मला काल पुन्हा ऐकू आला."

"आवाज? कोणाचा? कसला आवाज?"

"ईश्वराचा आवाज, बाई."

"काय म्हणाला आवाज?"

"तो आवाज म्हणाला, जेमी, तुझ्या हातून तुझं कार्य पुरं झाल्याखेरीज तुला मरण येणार नाही."

"तू काय उत्तर दिलंस?"

"मी विचारलं, कोणतं कर्तव्य?"

"हूं."

त्या आवाजानं मला शिक्षक होण्याची आज्ञा केली.

त्याचा चेहरा न्याहाळत मी म्हटलं, "हे तुझ्या दृष्टीनं अगदी नव्या प्रकारचं काम आहे."

माझ्या आवाजातल्या कडवटपणाकडे दुर्लक्ष करत त्यानं उत्तर दिलं, "मला ठाऊक आहे."

"तुझं शिक्षण कुठपर्यंत झालं आहे, जेमी?"

"नववीपर्यंत."

"शिक्षक होण्यासाठी बऱ्याच शिक्षणाची जरुरी आहे."

"त्याला माझी तयारी आहे."

"तू पुन्हा शाळेत दाखल व्हायची परवानगी मागतो आहेस?"

"हो."

"मग, उद्यापासून तुझं शालेय शिक्षण पुन्हा सुरू होईल."

दुसऱ्या दिवशी जेमी दहावीच्या वर्गात दाखल झाला. तरी प्रयत्नांची शिकस्त करून व बरीच मेहनत घेऊन पुढील काही दिवसांत त्यानं शिक्षणात बरीच प्रगती केली. शिक्षण घेत असता शब्दांचा, व्याकरणाचा, गणिताचा अर्थ वा स्थान त्याला कळत होतं की नाही हे सांगता येणं कठीण होतं. पण पुढे उभ्या असलेल्या जीवनाशी, महत्त्वाकांक्षेशी त्याचं निकटचं नातं आहे हे मात्र तो नक्की जाणत होता आणि म्हणून, या साऱ्याचा अर्थ जाणून घेण्याची आपल्या परीनं पराकाष्ठा करत होता.

एके दिवशी, तो पुन्हा माझ्या खोलीत दाखल झाला.

"आता आणखी काय हवं, जेमी?"

"मला बंधनं कमी असलेल्या हॉस्टेलमध्ये जायची परवानगी हवी आहे, बाई."

"पळून जाणाऱ्यांना खुल्या बिल्डिंगमध्ये पाठवत नाहीत."

"ते मला ठाऊक आहे. पण मी राहतो त्या बिल्डिंगमधल्या आवाजामुळे, इतरांच्या भांडणामुळे माझ्या अभ्यासात व प्रार्थनेत बराच व्यत्यय येतो."

जेमी चित्रकलेखेरीज बराच वेळ अभ्यास व प्रार्थना यांत घालवत असे हे मला माहीत होतं. मी त्याला विचारलं, "तू हे मनापासून सांगतो आहेस का?"

"हो बाई, मी शिक्षक व्हायचा निर्धार केला आहे व त्यासाठी मला तुमच्या मदतीची गरज आहे."

माझी परवानगी मिळताच तो फिकट हसला. यापूर्वी त्याच्या चेहऱ्यावर स्मित पाहिल्याचं माझ्या आठवणीत नाही. खळखळून हसण्यात वाहून जाण्याच्या कोवळ्या वयात त्याचं हसणं कुठे लुप्त झालं होतं कोण जाणे! की तो कधी हसायला शिकलाच नाही? कुटुंब, समाज मुलांना बऱ्याच गोष्टी शिकवतात व त्याबद्दल त्यांच्याकडून बऱ्याच अपेक्षाही करतात. असं असताना जेमीसारख्या मुलाला हसावं कसं हे कोणी का शिकवू शकलं नाही? किंवा त्याला जगाचा एवढा राग आहे का की या जगासाठी आपण हसावं अशी त्याची लायकी नाही असं त्याला वाटावं?

जेमी लवकरच खुल्या हॉस्टेलमध्ये राहायला गेला. त्याच्यात झालेली सुधारणा व त्याच्या विचारसरणीत झालेला बदल पाहून मी त्याच्या बाबतीत घेतलेल्या निर्णयाबद्दल मला समाधान वाटत होतं. आपल्या शांत, आज्ञाधारक व समजूतदार स्वभावानं तो सर्वांना आपलंसं करण्यात यशस्वी झाला होता. तो दिवसातला बराच वेळ अभ्यासात, अभ्यासाव्यतिरिक्त वाचनात व चित्रकलेत घालवत होता. त्याच्यातला दृश्य बदल त्याच्या स्वच्छ राहणीत आढळून येत होता. तो सुदृढ तर दिसत होताच, पण त्याचा चेहरा एका वेगळ्या तेजानं तळपत होता. मर्यादित वाटणाऱ्या बुद्धीच्या मानानं त्यानं शिक्षणात बरीच प्रगती केली होती. एवढंच नव्हे, तर त्याच्यापेक्षा खालच्या वर्गात असलेल्या व शिक्षणात फारशी प्रगती न करणाऱ्या मुलांना शिकवण्याची परवानगी तो मागत होता. तो कोणत्याही बाबतीत संयमाचं उल्लंघन न करता सर्व काही शांतपणे करत होता. स्वतःचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून उशीर होण्यापूर्वी सुधारणा करण्याबाबत इतर मुलांना विनवत होता, हे सर्व चालू ठेवून आपली चित्रकलाही उत्तमरीत्या जोपासत होता. त्यान रंगवलेली चित्रं फक्त माझ्या ऑफिसमध्ये नव्हे, तर रिमांड होमच्या इतर बऱ्याच भिंतींवर झळकत होती. बरेच महिने उलटले तरी त्याचा हा उत्साह यत्किंचितही कमी झाला नाही. उलट, त्याच्यात अगदी खोलवर बदल झाल्याची सर्वांची खात्री पटली होती. त्याला ही संधी देऊन त्याच्यातल्या सुप्त गुणांना वाव दिल्याबद्दल सर्वजण माझी स्तुती करत होते. त्यामुळे मीही स्वतःला धन्य समजत होते. कॉलेजमध्ये मिळालेलं मानसशास्त्राचं शिक्षण अगदी वाया गेलेलं नव्हतं! आपल्याला मनुष्यस्वभावाची ओळख प्रथमदर्शनी पटते ह्याबद्दल मला स्वतःबद्दल वाटणारा

विश्वास दृढ झाला होता.

भविष्यातली बरीच वर्षं मेहनत व शिक्षण यांत गुंतली जाणार हे जाणूनही जेमी शिक्षक होण्याचं एकमेव ध्येय डोळ्यांसमोर ठेवून तपस्या करत होता. दीड-एक वर्ष उलटलं असेल. जेमीच्या तपश्चर्येत खंड पडला नव्हता आणि एके दिवशी अचानक संध्याकाळच्या असेंब्लीत जेमीची अनुपस्थिती जाणवली. त्याला काय झालं असेल? आजारी तर नसेल? अशा अनेक कुशंका सर्वांच्या मनात डोकावल्या. जेमी त्याच्या खोलीतही नजरेस पडला नाही. रात्रीच्या जेवणानंतर त्याचा काऊन्सेलर त्याला घेऊन माझ्या खोलीत आला. मी फक्त मान वर करून त्याच्याकडे पाहिलं.

"माझी चूक झाली. पण मी काही करू शकलो नाही. मला पुन्हा आवाज ऐकू आला," जेमी.

"यावेळी आवाजानं काय सांगितलं?"

"मला आपल्या मागून यायला सांगितलं."

"कुठं?"

"मागच्या झुडपापाशी."

"शिक्षकालाही नियम पाळावे लागतात."

"मला त्याची जाणीव आहे, बाई."

"यापुढे जेव्हा तुझा आवाज तुला हुकूम देईल तेव्हा काऊन्सेलरची परवानगी घे."

"ठीक, तसंच करीन."

पुढचे काही महिने काही न घडता जेमी नेहमीप्रमाणे अभ्यासात, चित्रकलेत, वाचनात व शिकवण्यात मग्न राहिला. पुन्हा एक दिवस तो संध्याकाळच्या असेंब्लीत नजरेस पडला नाही. मागच्या जवळ वा आवारात कुठेही जेमी सापडला नाही. "तो अधुनमधून गांजा ओढत असेल किंवा 'ड्रग ॲब्यूज' करत असेल असा विचार तुमच्या मनात कधी आला आहे का, बाई?" त्याच्या काऊन्सेलरच्या या प्रश्नानं मी विचारात पडले. गांजा, ड्रग्ज हे सर्व जरी गावात राजरोसपणे चालत असले तरी आमच्या रिमांड होमचे ते शत्रू होते. काऊन्सेलरच्या रोखठोक सवालानं मी हादरले!

"तुला शंका का आली?" मी त्याला विचारलं.

"जेमीचं वागणं विक्षिप्त होऊ लागलं आहे, अलिकडे".

हो! आता हळुहळू माझ्या डोक्यात प्रकाश पडत होता. गांज्याचे जेमीवर होणारे परिणाम व त्याच्या वागण्यात होऊ लागलेला सूक्ष्म बदल माझ्या ध्यानात येऊ लागला. दुसऱ्या दिवशी जेमीला घेऊन काऊन्सेलर माझ्याकडे आला.

"यावेळी तुझ्याकडे काय उत्तर आहे, जेमी?"

"बाई..."

"काल कुठं होतास तू संध्याकाळी?"

"मागच्या झुडपाजवळ."

"आम्ही शोधलं तुला तिथं."

आम्ही नीट शोध घेतला नाही किंवा आपण दुसऱ्या कुठल्या जागी होतो हे सांगायचा प्रयत्न त्यानं केला नाही. तो माझा चेहरा शांतपणे पण काळजीपूर्वक निरखत होता.

"माझ्याशी खोटं बोलशील?"

"नाही बाई, कधीही नाही," त्यानं ओशाळत, खोल आवाजात उत्तर दिलं.

"तू गांजा ओढतोस? ड्रग्ज घेतोस? क्रॅक ओढतोस?" तो चमकला. माझ्या रोखठोक प्रश्नानं गांगरला. माझ्या नजरेला नजर भिडवायचं टाळत त्यानं नजर जमिनीवर खिळवली.

"मला उत्तर हवंय, जेमी." आता माझ्या आवाजात जरब होती.

"हो." त्याच्या कबुलीनं मला धक्का बसला आहे हे जाणवू देण्यासाठी मी काही क्षण स्तब्धतेत घालवले.

"तुला शिक्षक व्हायचंय?"

"हो."

"तुला गांजा ओढायचा आहे, ड्रग्ज घ्यायचीत आणि शिक्षक व्हायचंय?" माझ्या आवाजातली तीव्रता जाणवून त्यानं मान पलीकडे वळवली.

"तुला शिक्षक होणं कदापि शक्य नाही." माझ्या या वाक्यावर त्यानं माझ्याकडे केविलवाण्या नजरेनं पाहिलं.

"तू तुझं स्वातंत्र्य गमावलं आहेस. तुझी बदली बंद इमारतीत करण्याशिवाय माझ्यापुढे दुसरा मार्ग नाही. तूच मला तसं करायला भाग पाडलं आहेस." माझ्या मनातील अपराधी भावनेमुळे माझा आवाज जड झाला व खांद्यावरचं वजन वाढल्यासारखं वाटलं.

"नका, तेवढं नका करू." तो कळवळला व दुसऱ्या क्षणी त्यानं स्वतःला माझ्या पायांवर झोकून दिलं. तो माझे पाय पकडत उद्गारला, "मी यापुढे

गांजा किंवा ड्रग्ज ह्यांना स्पर्श करणार नाही.''

''तुला आणखी किती वेळा अशी संधी हवी आहे?''

''फक्त ही एक शेवटची संधी द्या, बाई. माझ्याकडून पुन्हा असं घडणार नाही.''

''ठीक आहे.'' मी पाघळले. माणसाच्या चांगुलपणावरचा माझा विश्वास अद्याप कमी झाला नव्हता. ॲडिक्शन काऊन्सेलिंगच्या ग्रुपमध्ये त्याला सामील करून त्याच्यावर खुल्या बिल्डिंगमध्येही सक्त नजर ठेवण्यात आली.

ड्रग्ज, गांजा, क्रॅक हे रिमांड होमचे मोठे दुश्मन होते. त्यांनी कित्येकदा या मुलांना चोऱ्या करायला, पळून जायला प्रवृत्त केलं होतं. ह्या गोष्टींनी त्यांच्या सदसद्‌विवेकबुद्धीवर आघात केला होता. आपलं ध्येय काय, आपण कुठे जात आहोत याचा विचार करण्याची सारासारबुद्धी त्यांच्याजवळ राहत नसे. क्षणिक सुखासाठी हाती येणारं भविष्य आपण गमावून बसू हे ध्यानात यायची कुवत त्यांच्यात शिल्लक राहत नसे. जेमीनंही त्याचा आधार घेतला होता. ड्रग्जला लागणारे पैसे मिळवण्यासाठी त्यानं त्याच्या काऊन्सेलरचा कोट आतल्या पाकिटासह पळवला व विकला. त्यावेळी त्यानं केलेल्या गुन्ह्याच्या तीव्रतेची जाणीव करून देण्यासाठी त्याला रिमांड होमच्या छोट्या कोर्टापुढे उभं करण्यात आलं. मी, मुख्याधिकारी, प्रिन्सिपल, असिस्टंट प्रिन्सिपल, काऊन्सेलिंग डिरेक्टर या सर्वांसमोर त्यानं आपला गुन्हा कबूल केल्यामुळे तो शाबीत करण्याची गरज भासली नाही. पण त्याच्या बाबतीत काय निर्णय घ्यायचा व त्याची रवानगी कुठं करायची एवढंच ठरवायचं बाकी होतं. त्याबाबत सर्वांशी चर्चा करून मी त्याच्याकडे वळले.

''तू शिक्षक होण्याबद्दल आमचं काही म्हणणं नाही, पण आता तुझी रवानगी बंद इमारतीत होईल व तुझं स्वातंत्र्य व शाळा हे दोन्ही तुझ्यापासून हिरावून घेतली जातील. मात्र तू जरी स्वातंत्र्य गमावलंस तरी तुझी चित्रकला चालू ठेवण्यात येईल. तुझी अजूनही शिक्षक व्हायची महत्त्वाकांक्षा असेल तर काही महिन्यांनंतर तुझी वागणूक पाहून खुल्या हॉस्टेलमध्ये तुझी बदली करण्याबाबत शिफारसं केली जाईल. त्यानंतर तुझी शाळा परत सुरू होण्याची शक्यता आहे. तोवर तुला शिकवण्यासाठी ट्यूटर काही तास तुझ्या खोलीवर येतील.''

जेमीनं आम्हा सर्वांवरून हळुहळू नजर फिरवली. जणू काही त्याच्या दृष्टीनं या एवढ्याशा गुन्ह्यासाठी या एवढ्या मोठ्या शिक्षेला तो पात्र नसावा.

तो निःशब्द झाला, त्याच्याकडे पाहणंही मला असह्य वाटू लागलं.

"तुम्ही माझं स्वातंत्र्य, माझी चित्रकला व इतर काही घ्या, पण माझी शाळा तेवढी चालू ठेवा," तो कळवळत गयावया करू लागला.

त्याचं बोलणं ऐकताना मला वेदना होत होत्या. मी इतरांकडे आशेनं पाहिलं. परंतु सर्वांचे चेहरे न्यायाधिशाप्रमाणे तटस्थ, निर्विकार होते. जणू काही, ही शिक्षा त्याला यापूर्वीच द्यायला हवी होती. या वेळीसुद्धा जर निर्णय घेणं माझ्या एकटीच्या हाती असतं तर मी त्याला आणखी एक संधी नक्की दिली असती. पण यावेळी मी इतरांना बोलावलं असल्यामुळे काहीच करू शकत नव्हते. मी डिरेक्टर असल्यामुळे इतर लोकही काही बोलत नव्हते. त्यांना बहुधा त्याला याहून जास्त कडक शिक्षा द्यायला हवी असं वाटत असावं असा निष्कर्ष मी त्यांच्या चेहऱ्यांवरून काढला. आता घेतलेला निर्णय बदलण्याची शक्यता नव्हती.

जेमीला बंद इमारतीत हलवण्यात आलं. चोराला जरूर ती शिक्षा मिळाली, पण त्याच्यातला शिक्षक मात्र हरला याची जाणीव मला त्या क्षणी झाली. जेमीचं असं खोल पाण्यात बुडणं हा माझ्या दृष्टीनं एक अपघात होता. पोहायला न शिकलेला, सतत बुडत असलेला जेमी गटांगळ्या खात पोहण्याची, वर येण्याची शिकस्त करत होता. बाहेर येण्यासाठी त्याला मदतीच्या हाताची गरज होती, अधिक वेळेची गरज होती आणि आम्ही नेमकं तेच नाकारत त्याला पुन्हा पाण्यात लोटत होतो.

फार दिवस शाळा बुडत असल्याचं दुःख व्यक्त करत जेमी आपली सर्व कामं पूर्ववत करत होता. पण त्याच्या मनातला कोलाहल, घालमेल त्याच्या चेहऱ्यावर व्यक्त होत होती, त्याच्या चित्रकलेतून डोकावत होती. निराशेचा हा जहरी प्याला तो कसाबसा पचवत होता हे उघड होतं. पुढे जायचा मार्ग खुंटला की इच्छा नसतानाही माणसाला मागे वळावं लागतं. माझ्या मते, जेमीच्या बाबतीत नेमकं तसं झालं. दार उघडत असलेल्या आर्ट शिक्षकांना ढकलून, त्यांच्या चाव्या घेऊन जेमी बंद इमारतीतून पळाला. थोड्या दिवसांनी गावातल्या एका दुकानात चोरी करताना तो पकडला गेला. यावेळी मात्र त्याला रिमांड होमची सवलत न देता तुरुंगात पाठवण्यात आलं.

त्याच्याकडून नुकतं आलेलं पश्चात्तापदग्ध पत्र माझ्या हातात होतं. आपली शिक्षक व्हायची महत्त्वाकांक्षा न सोडता अधिक बळकट झाल्याचं व त्यासाठी

तुरुंगात अभ्यासाला सुरुवात केल्याचं त्यानं लिहिलं होतं. पत्र कळकळीनं लिहिल्याची जाणीव प्रत्येक शब्दातून होत होती. माझी क्षमा मागून घडलेल्या अपराधांबद्दल त्यानं पश्चात्ताप व्यक्त केला होता. आपलं आयुष्य वळणावर आणण्याची उत्कट इच्छा व्यक्त करून माझ्या मैत्रीची याचना केली होती. त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल मला शंका नव्हती. माझ्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या. त्याच्या शिक्षक होण्याच्या इराद्याबद्दल व त्यासाठी कराव्या लागणाऱ्या धडपडीबद्दल मला अजूनही खात्री वाटत होती. त्यासाठी त्याला उत्तेजित करणारं पत्र पाठवून तुरुंगातून सुटका झाल्यावर रिमांड होममध्ये परतण्याची त्याची इच्छा असल्यास त्याच्यासाठी दरवाजा नेहमी उघडा राहील असं मी त्याला कळवलं.

लहान वयात आईवडिलांच्या प्रेमाच्या उबेची, त्यांच्या आधाराची, आदर्शाची गरज असते. अशा कोवळ्या वयात जेमी या साऱ्याला पारखा झाला होता. त्याच्या जन्मानंतर वर्षाच्या आत त्याच्या वडिलांनी घर सोडलं होतं. आईचा जीव मोलमजुरी करून दोन मुलांचं पोट भरताना मेटाकुटीला आला होता. पैशांची टंचाई जाणवत असताना जेव्हा छोट्या-मोठ्या चोऱ्या करून जेमी पैसे घरात आणत असे तेव्हा त्याचं कौतुक होई.

पुढे पुढे तर, तिच्याबरोबर घरी येणाऱ्या पुरुषांनी त्याच्या कोवळ्या शरीरावर नजर ठेवून, त्याची विक्री करून त्याच्या आईला त्याबद्दल पैसे देण्यास सुरुवात केली. त्याला दारूचं, गांज्याचं व क्रॅकचं व्यसनही लावलं होतं. भाऊ घर सोडून गेला होता. तो जिवंत आहे की नाही याचीही कोणाला पर्वा नव्हती. एक दिवस चोरी करत असताना तो पकडला गेल्यावर त्याला जेव्हा रिमांड होममध्ये पाठवण्यात आलं तेव्हा जेमीनं सुटकेचा निःश्वास सोडला.

मला हे सर्व माहीत होतं. याहीपेक्षा जास्त, जे त्याच्या फाईलमध्ये नव्हतं ते जेमीकडून कळलं होतं. जेमी पोरका होता ते केवळ आईबाप नाहीत म्हणून नव्हे, ते असतानाही तो पोरकाच होता. त्याची व्यथा कोणाला कळली नाही किंवा कोणी समजून घ्यायचा प्रयत्न केला नाही. सर्वांच्या सहवासात तो एकटा वाढला होता व आयुष्याच्या न ठरवलेल्या, नको असलेल्या दिशेकडे वळला होता, वाढवला गेला होता.

कुटुंबानं, समाजानं, मदतीसाठी पुढे आलेल्या स्पेशल वर्कर्सनी कळत-नकळत त्याचं बालपण हिसकावून घेतलं होतं. बालपणीच त्याला प्रौढ बनवून

सर्वांनी त्याच्यावर जबाबदाऱ्या टाकल्या होत्या व त्या निभावून नेण्याची अपेक्षा प्रत्येकजण त्याच्याकडून करत होता. समाजाच्या नियमाप्रमाणे वागण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींची शिकवण मात्र त्याला कोणी दिली नव्हती. समाज फक्त अपेक्षा करतो, पण या अपेक्षापूर्तीसाठी लागणाऱ्या शिक्षणाची जबाबदारी घ्यायला किंवा परिवर्तन होण्यासाठी लागणारी सवड द्यायला मात्र या समाजाकडे वेळ नसतो, पैसा नसतो किंवा तयारी नसते. जेमी या सर्वांचं सावज बनला होता.

सुशिक्षित, संस्कारक्षम व प्रामाणिक समजली जाणारी समाजाच्या वरच्या थरातील माणसं जेव्हा पदोपदी छोट्या-मोठ्या कारणांसाठी, स्वार्थापोटी अप्रत्यक्षपणे कायदेभंग, अप्रामाणिकपणा करतात, टॅक्स चुकवतात, लाच घेतात, काळा बाजार करतात, अफरातफर करतात व करू देतात तेव्हा त्यांच्यावरचे संस्कार कुठे जातात? समाज हे सर्व मुकाट्यानं मानतो, सहन करतो. मग जेमीनं जे काही केलं, चुकून पुन्हा केलं, त्याला अपघात का म्हणू नये?

अन्न, वस्त्र, निवारा यांखेरीज माणसाच्या आणखी गरजा नाहीत का? हे सर्व जेमीला रिमांड होममध्ये मिळत होतं. पण व्यसनं, तीही शरीराची एक गरज बनत नाही का? जीवनानं दिलेल्या दुःखातून काही क्षण का होईना सुटका कोणाला नको असते? शहाण्यांनीही या गरजेपायी मूर्खपणा, बेफामपणा केलेला आहे. तीच गरज माणसाला अधुनमधून अप्रामाणिक बनवते. जेमी अप्रामाणिक बनला नाही, बनवला गेला. त्याला हवी असलेली आणखी संधी द्यायला हा समाज का कुरकुरला? माझ्याजवळ या प्रश्नांना उत्तरं नव्हती. मात्र या चांगल्या-वाईटाच्या, प्रामाणिक-अप्रामाणिकपणाच्या समाजानं रचलेल्या धगीत जेमी जळत होता. इतक्या धडाडीनं शिक्षक बनण्याची आशा बाळगणारा, इतक्या तळमळीनं पत्र लिहिणारा हा मुलगा आयुष्यात लवकरच कायमचा पराभूत होणार होता. कटू अनुभवांची भेसूर भुतं आणि मेलेल्या आशांच्या कडवट आठवणी यांमध्ये त्याचं मन दुभंगलेलं होतं. ह्या त्याच्या मनानं जीवनासारखे सर्व हक्क तो समाजासारख्या शत्रूच्या हाती स्वाधीन करणार होता! पेटण्यापूर्वी त्याच्या आकांक्षांचा दिवा विझला होता.

◆◆◆

## प्रायश्चित्त

डिसेंबरची एक गारठलेली सायंकाळ... शुक्रवार असल्यामुळे ऑफिसमध्ये टेबल आवरून घरी जाण्याची तयारी मी करत होते. तेवढ्यात ऑफिसचं दार कोणीतरी ठोठावलं. 'मी घरी निघालेय' असं ओरडून सांगितलं तरी जेसिका दार ढकलून आत शिरली. मला वेळेवर पकडल्याचा आनंद तिच्या चेहऱ्यावर झळकत होता. नको त्या वेळी काहीतरी काम काढून येण्याची जेसिकाला सवय होती. मी नजर उचलून तिच्याकडे पाहिलं. तिच्यामागून ब्राऊन पँट व त्याच रंगाचा स्पोर्ट्स कोट घातलेले, पंचेचाळीसच्या आसपास वय असलेले एक भारतीय गृहस्थ व पिवळ्या रंगाचा सलवार-कमीज व त्यावर लाल ओढणी या पेहरावात कपाळावर कुंकू लावलेली चाळीस-बेचाळीस वर्षांची एक स्त्री यांनी माझ्या ऑफिसमध्ये प्रवेश केला. या सर्वांच्या मागून खाली मान घातलेला, मध्यम उंचीचा, बारीकसा, काळा-सावळा, सोळा-सतरा वर्षांचा मुलगा बॅगी जीन्स, काळा टी शर्ट व डोक्यावर उलटी कॅप अशा अवतारात हळुहळू आत शिरला. त्याचे काळेभोर डोळे बोलके होते. परंतु त्यात उदासीनता होती. नजर ओशाळवाणी व केविलवाणी वाटत होती. त्याच्या चालण्यात एक प्रकारचा नाजूकपणा होता.

'मीट मिस्टर ॲण्ड मिसेस अगरवाल ॲण्ड देअर सन जे. ॲण्ड धिस इज मिझ डी.' जेसिकानं ओळख करून दिली. 'मिझ डी तुम्हाला आमचा प्रोग्राम समजावून सांगील व तुमच्या शंकांचं निरसन करील. तिच्याजवळ सर्व प्रश्नांची उत्तरं आहेत' असं म्हणून, पुढची सर्व जबाबदारी माझ्यावर सोपवून जेसिकानं तिथून पळ काढला. आता, घरी जायला उशीर होणार! हे अटळ होतं. त्यामुळे मला मात्र मनातल्या मनात चडफडण्यापलीकडे काही करणं शक्य नव्हतं. अगरवाल दांपत्य माझ्याकडे निरखून पाहत असल्याचं माझ्या ध्यानी आलं. अगरवाल पतिपत्नींच्या चेहऱ्यावरील हावभावांवरून त्यांच्या मनावर एक प्रकारचं दडपण आलं असल्याचं जाणवत होतं व ते साहजिक होतं.

"आमचा मुलगा ड्रग ट्रीटमेंट सेंटरमध्ये आहे हे भारतीय समाजात कोणाला कळणार नाही ना?" जेसिकाची पाठ फिरताच सौ. अगरवालनी आपली भीतीयुक्त शंका व्यक्त केली. ती मी भारतीय असल्यामुळे आहे हे मी जाणून होते. मीही त्यांना व्यावसायिक नीतिमत्ता, गुप्ततेचा करार वगैरे सर्व समजावून सांगितलं. त्यांनी स्वतः सांगितल्याखेरीज या गोष्टींची माहिती इतर कोणालाही होणार नाही याबद्दल त्यांना आश्वासन दिलं. हे सर्व सांगूनही त्या दांपत्याचा चेहरा आशंकित राहिला. मी सवयीप्रमाणे त्यांना उपचारपद्धत समजावून सांगितली. पेरेंट्स हॅण्डबुक दिलं व त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून दिली.

'अगर इसे इंडिया भेज दे तो सब ठीक हो जाएगा' हा सौ. अगरवाल ह्यांचा शेरा ऐकून 'सब बीमारीपे एकही इलाज' करणाऱ्या चंपीवाल्याच्या आठवणीनं मी मनाशीच हसले. जयला ट्रीटमेंटची गरज किती आहे व केवळ भारतात पाठवल्यामुळे तो बरा होणार नाही हे त्यांना पटवण्याचा मी पुन्हा प्रयत्न केला. पुढच्या पाच-दहा मिनिटांत माझ्यासमोर अगरवाल ह्यांनी आतापर्यंत कोंडून ठेवलेली आग जयवर पाखडून घेतली. त्याची दुसरी दोन्ही भावंडं किती हुशार, गुणवान व आज्ञाधारक आहेत व हा एकटा कसा कपाळकरंटा निघाला हे मला पुन:पुन्हा सांगून आश्चर्य व्यक्त केलं. तोंडातून एक चकार शब्द न काढता त्यांचं हे वक्तव्य जय मुकाट्यानं ऐकून घेत होता. परंतु अधुनमधून वडिलांकडे तिरस्काराचे, तुच्छतेचे कटाक्ष टाकत होता, ते माझ्या नजरेतून सुटलं नाही.

जयला उपचारपद्धत पुरी करण्याची कोर्ट ऑर्डर असल्यामुळे अगरवाल

कुटुंबाचा नाइलाज झाला होता. तीस-पस्तीस दिवसांचे उपचार पुरे होईपर्यंत जयला आमच्या सेंटरमध्ये ठेवणं त्यांना भाग पडलं होतं. चार-पाच दिवसांनंतर जय सेंटरमध्ये बराच रुळला. भारतीय थेरपीस्टवर म्हणजे माझ्यावर विश्वास ठेवायला हरकत नाही असं त्याला वाटू लागलं व त्यानं तसं बोलूनही दाखवलं. आमची थेरपी सेशन्स सुरळीतपणे नियमित सुरू झाली. 'मी तुम्हाला सेशन्सच्या वेळी आण्टी म्हटलं तर चालेल का? या नात्यानं मी तुमच्याशी जास्त मोकळेपणाने बोलू शकेन' अशी परवानगी जयनं मागितली. मी थोड्याफार नाराजीनं ती दिली.

आतापर्यंतच्या सेशन्समध्ये जयकडून जी थोडीफार माहिती मिळाली ती अशी :

दिल्लीला असेपर्यंत जय शाळेत नेहमी पहिल्या पाचांत असे. तो हुशार होता, वक्तृत्वस्पर्धेत बक्षिसं मिळवत होता व त्याला अनेक मित्र होते. चार वर्षांपूर्वी त्याच्या आईवडिलांनी या देशात स्थलांतर करण्याचं ठरवलं. इथं आल्यावर तो शाळेत फार ओळखी करू शकला नाही. आपल्या बरोबरीच्या मुलांशी मैत्री करणं त्याला अवघड वाटू लागलं. आपण इतरांहून वेगळे आहोत, वेगळी भाषा बोलतो, वेगळे दिसतो ही गोष्ट त्याला टोचू लागली. आपलं वेगळेपण त्याला प्रकर्षानं जाणवू लागलं. अभ्यासात त्याचं लक्ष लागेना. तो अधिकाधिक हळवा व संवेदनाशील होऊ लागला. त्याला दिल्लीच्या मित्रांची वारंवार आठवण येऊ लागली. त्याला क्रिकेट सोडून बेसबॉल किंवा बास्केटबॉल खेळणं जमत नव्हतं. तो मुलींपासून चार हात दूर राहत होता. जय हळुहळू एकलकोंडा बनत चालला. आईवडील त्यालाच दोष देत होते. आपली व्यथा कोणाशी बोलून दाखवावी हे त्याला समजत नव्हतं.

अशा दोलायमान मनःस्थितीत असताना दीड वर्षांपूर्वी डेव्हिड त्याच्या आयुष्यात आला. तो जयपेक्षा थोडा मोठा होता. त्यानं मैत्रीचा हात पुढे केला व बुडत्याला काठीचा आधार समजून जयनं तो पकडला. डेव्हिडची एक छोटी गँग होती. त्याचा शाळेत वचक होता. डेव्हिड व त्याचे मित्र यांच्याबद्दल शाळेतील शिक्षकांचं मत तितकंसं चांगलं नव्हतं. परंतु जयला त्याची पर्वा नव्हती. त्याला ऐन गरजेच्या वेळी जवळ करणारे मित्र सापडले होते. त्यांनी त्याला ड्रग्जच्या राज्यात नेलं व जय त्यात पुरता अडकला होता.

एका आठवड्यापूर्वी सकाळी शाळेत जाताना जयनं चढवलेल्या फाटक्या

बॅगी जीन्स व ढगळ शर्ट ह्यावरून त्याचं व वडिलांचं भांडण झालं. त्यात भर पडली ती आदल्याच दिवशी त्यानं डेव्हिडकडून टोचून घेतलेल्या कानांमुळे व त्यात अडकावलेल्या रिंगांमुळे. आधीच पेटलेल्या आगीत तेल ओतलं गेलं. सवयीप्रमाणे वडिलांनी त्याच्यावर हात उगारला होता. अपमान सहन न होऊन, घराचा दरवाजा जोरात आपटून जय रागानं घराबाहेर पडला. आपल्या नशिबासकट त्याला सर्वांचाच राग आला होता.

आईनं तरी आपली बाजू घेऊन वडिलांना समज द्यावी असं त्याला वाटत असे. ती वडिलांसमोर काही बोलत नाही याची त्याला खंत होती. उलट, मुलांना चांगलं शिक्षण मिळावं, ती आरामात रहावीत यासाठी त्यांनी किती कष्ट घेतले आहेत व अजूनही किती कष्ट घेत आहेत याची उजळणी ती सतत मुलांसमोर करत असे. जयला आईचाही राग येई. आम्ही थोडंच सांगितलं होतं या देशात यायला? इतर भारतीय मुलांच्या आयांसारखी ती आपला वेश का बदलत नाही? तिच्या साडीवरून व कुंकवावरून मुलं किती चिडवतात आपल्याला! डॅडीसुद्धा किती विचित्र इंग्रजी बोलतात, डेव्हिडशी व त्याच्या मित्रांशी. सर्वजण त्यावरून आपली चेष्टा करतात. शी! लाज वाटते या सर्वांची. रागानं त्याचं मन सैरभैर झालं होतं. ते शांत करण्यासाठी त्याला डेव्हिडची मदत हवी होती. त्यानं डेव्हिडला गाठलं व क्रॅकची मागणी केली. फुकट क्रॅक देण्यास डेव्हिड तयार नव्हता. जयनं आईच्या चोरलेल्या सोन्याच्या बांगड्या त्याच्या हातात ठेवल्या. त्यानंतर त्याला जाग आली ती हॉस्पिटलच्या डिटॉक्स रूममध्ये. बांगड्या चोरल्याच्या आरोपाखाली वडिलांनी त्याच्याविरुद्ध पोलिसात तक्रार नोंदवली. डेव्हिडची रवानगी डिटेंशन सेंटरमध्ये करण्यात आली. कोर्टामार्फत जयला हॉस्पिटलमधून ट्रीटमेंटसाठी आमच्या सेंटरमध्ये पाठवण्यात आलं.

जयला मनापासून पश्चात्ताप झालेला दिसत होता. त्याला यापुढचं आयुष्य सुधारायचं होतं व तो त्या दृष्टीनं आपल्या परीनं प्रयत्न करत होता. अनेकदा तसं बोलूनही दाखवत होता. दोन आठवड्यांनंतर एका उपचार - सत्रामध्ये जयनं मला एक धक्कादायक बातमी दिली. त्यानं आपण समसंभोगी (गे) असल्याचं माझ्याजवळ कबूल केलं. आजवर त्यानं याबाबत कोणाजवळही उल्लेख केला नव्हता. मी त्याला बराच वेळ बोलू दिलं. या भावना गेल्या दीड-दोन वर्षांपासून जागृत झाल्या असल्याचा निर्वाळा त्यानं दिला. आता

त्याबद्दल खात्री पटल्याचं त्यानं जाहीर केलं. त्याला भीती वाटत होती, स्वतःची लाज वाटत होती. परंतु त्याचा नाइलाज होता. जयच्या बोलण्यात प्रामाणिकपणा होता, एक प्रकारची अगतिकता होती. मी त्याच्या अनेक शंकांचा खुलासा केला. त्याबद्दल अधिक माहिती मिळवण्यासाठी काही पुस्तिका दिल्या. आपल्या भावना पुन्हा एकदा तपासून पाहण्याचा सल्ला त्याला दिला.

आपण समसंभोगी असल्याचं जयच्या तोंडून ऐकल्यावर मात्र मी हादरून गेले. हा विषय यापूर्वी मी इतर पेशंट्सबरोबर इंडिव्हिज्युअल, ग्रुप थेरपी सेशन्समध्ये अनेकदा सहजपणे, यशस्वी रीतीनं हाताळला होता; फॅमिली थेरपीमध्ये बऱ्याच वेळा चर्चिला होता. परंतु भारतीय मुलाच्या तोंडून हा कबुलीजबाब ऐकण्याची माझी ही पहिली वेळ होती. या विषयाबद्दल माझ्या स्वतःच्या व्यवसायाबाहेरच्या भावना व विचार काय आहेत याचा पडताळा घेण्याची ही पहिली वेळ होती, पहिला प्रसंग होता. ही गोष्ट आपल्या आईवडिलांच्या कानांवर घालण्याची जबाबदारी जयनं अर्थात माझ्यावर सोपवली होती. ह्यासाठी आर्जवं केली. मी मात्र प्रथमच अंतर्मुख होऊन विचार करू लागले होते. हीच गोष्ट माझ्या मुलाच्या बाबतीत ऐकण्याचा प्रसंग माझ्यावर आला असता तर! ज्या सहजतेनं मी इतर पालकांना या विषयावर सल्ला देऊ शकते तितक्याच सहजतेनं मी हा घाव पचवू शकले असते का? ह्या सत्याचा स्वीकार करणं मला शक्य झालं असतं का? माझ्यातलं भारतीयत्व हे कबूल करणं शक्य नाही असं माझं मन मला टोचत होतं. तू जर हे सत्य स्वतःच्या बाबतीत पटवून घेऊ शकत नाहीस तर इतरांना ते पटवून देण्याचा तुला काय अधिकार आहे असा सवाल दुसरं मन पुनःपुन्हा करत होतं. आपण स्वतःला समजतो तेवढे सुधारक नक्की नाही या सत्याची जाणीव त्याला प्रथम झाली. यापुढची जयबरोबर 'फॅमिली थेरपी सेशन्स' माझ्या दृष्टीनं फार अवघड होती. माझं सर्व कौशल्य त्यात पणाला लावणं तर आवश्यक होतंच, पण त्यांत मी यशस्वी होईन याची मला खात्री वाटत नव्हती.

जयच्या काऊन्सेलरच्या मदतीनं मी त्याच्या आईवडिलांकडे त्याचं गुपित एका आठवड्यानंतर उघड केलं. ते ऐकताच त्याच्या आईनं चक्क गळा काढला व रडून गोंधळ घातला. वडील दरवाजा जोरात आपटून खोलीतून निघून गेले. ते जयला घरी न्यायला तयार होतील की नाही याबाबत शंका मला वाटू लागली. त्यापुढल्या सेशनमध्ये मात्र ती दोघं बरीच सावरलेली दिसत

होती. जयला डिस्चार्ज मिळण्याच्या दिवशी मी त्यांना त्यांच्या घराजवळच्या सपोर्ट ग्रुपची माहिती व फोन नंबर दिला आणि कधीही मदतीची गरज भासल्यास मला फोन करण्यास सांगितलं.

जाताना जय माझा निरोप घेण्यासाठी माझ्या खोलीत आला. त्याचा चेहरा कोमेजलेला होता. डोळ्यांत अश्रू होते. तो मला काकुळतीनं म्हणाला, "आण्टी, मला आजवर कुणीही तुमच्याइतकं समजून घेतलं नाही. माझे आईवडील मला फार परके वाटतात. यापुढे मी सुधारण्याचा, यशस्वी होण्याचा प्रयत्न जरूर करीन. मला मदतीची गरज भासेल तेव्हा तुम्हाला फोन केला तर चालेल ना?" मी माझं कार्ड त्याच्या हातात ठेवून मूक संमती दिली.

डिस्चार्ज मिळाल्यानंतर दोन-चार वेळा जयचा खुशालीचा फोन आला होता. त्या वर्षी तो उत्तम रीत्या उत्तीर्ण होऊन बारावीत गेल्याचं त्याच्याकडून समजलं. त्याच वर्षी त्याच्या वडिलांनी जवळच्या राज्यात बदली करून घेतल्याची बातमी कळली. तसंच, कुठल्याशा एका पार्टीबरोबर जय काही महिन्यांसाठी दिल्लीला, आजोळी गेल्याचं समजलं. तिथून परतल्यावर एक-दोन वेळा त्याचा मला फोन आला होता. भारतात गेल्यामुळे एक वर्ष वाया गेल्याची तक्रार तो करत होता. वर्षानंतर जयच्या हायस्कूल ग्रॅज्युएशनचं कार्ड हाती पडलं. तो ऑनर रोल मिळवून ग्रॅज्युएट झाला होता व प्रिन्स्टन युनिव्हर्सिटीत स्कॉलरशिपसह प्रवेश मिळाल्यामुळे तिथं जाण्यासाठी तो उत्सुक झाला होता. त्याला ग्रॅज्युएशनला जाणं शक्य नसल्यामुळे मी त्याला भेटकार्डाबरोबर छोटंसं अभिनंदनपर पत्र पाठवून दिलं.

त्यानंतर तीन-चार वर्षं तरी जयबद्दल किंवा जयकडून फारशी बातमी समजली नाही. तो ग्रॅज्युएट झाल्याचं व त्याचे आईवडील पुन्हा या भागात राहायला आल्याचं कळलं होतं, तेवढंच. त्याच वर्षी त्याच्या बहिणीच्या ग्रॅज्युएशन पार्टीच्या निमित्तानं जयची पुन्हा भेट घडली. बावीस-तेवीस वर्षांचा जय न्यू यॉर्कला वॉल स्ट्रीटवर नोकरी करत होता. महागड्या अपार्टमेंटमध्ये राहात होता व घर घेण्याचे मनोरे रचत होता. त्याच्या चेहऱ्यावर यशाचं तेज ओसंडत होतं. त्याच्या वागण्यात, हालचालीत आनंद, उत्साह भरला होता. त्याचे आईवडीलही त्याच्यावर बेहद्द खुष होते. मी समाधानानं घरी परतले.

वर्ष-सव्वा वर्ष सहज निघून गेलं असेल. जयचं मला हळुहळू विस्मरण

होत चाललं होतं. अचानक एके दिवशी संध्याकाळी जयचा माझ्या आन्सरिंग मशिनवर ठेवलेला निरोप मिळाला. 'आण्टी, एका महत्त्वाच्या कामासाठी तुम्हांला भेटायचंय. केव्हा येऊ सांग?' त्यानं आपला फोन नंबर ठेवला होता. मी त्याला फोन करण्यापूर्वीच त्याचा पुन्हा फोन आला. पुढील शनिवारी भेटण्याचं आश्वासन घेऊन त्यानं फोन ठेवला.

शनिवारी दुपारी जय आला, तो खाली मान घालून. त्याचा कोमेजलेला, भकास चेहरा पाहून माझ्या हृदयाचा ठोका क्षणभर चुकला. बहिणीच्या ग्रॅज्युएशनला भेटलेला उत्साही जय हाच का असा संभ्रम मला क्षणभर पडला. मी पुढे ठेवलेला चहा व पोहे त्यानं नाकारले. मान न उचलताच त्यानं खुलासा केला.

गेल्या ख्रिसमसला म्हणजे महिनाभर आधी त्याची आजी फार आजारी असल्यामुळे तिला भेटण्यासाठी त्याच्या आईवडिलांनी त्याला दिल्लीला नेलं होतं. आजीची नातसून पाहण्याची इच्छा पुरी करण्यासाठी त्याच्या विरोधाला न जुमानता लांबच्या नात्यातल्या एका मुलीशी त्याचा साखरपुडा उरकून टाकण्यात आला होता. त्यानं आपल्या न्यू यॉर्कमधल्या मेल रूममेटशी आपले वेगळे संबंध असल्याचं आईवडिलांना सांगून त्यांच्या विनवण्या केल्या. परंतु ते कशाला बधले नाहीत. 'शादीके बाद सब ठीक हो जाएगा-' असं सांगून त्याला चूप बसवण्यात आलं होतं. 'तुझ्या या विचित्र वागणुकीमुळे तुझ्या बहिणीचं लग्न होणं अशक्य होईल, म्हणून तुला हे लग्न करणं आवश्यक आहे. घराण्याची अब्रू घालवून बापजाद्यांच्या तोंडाला काळिमा फासू नकोस' अशी शपथ घालून आईनं त्याला तंबी दिली होती. हे लग्न न केल्यास आपला जीव देण्याची धमकी प्रकट करण्यासही तिनं कमी केलं नाही.

आपल्या आईवडिलांचं मन वळवून आपली सुटका करण्याचं वचन माझ्याकडून घेतलं तेव्हाच जय जाण्यास तयार झाला. 'मी सर्व ऐकून हतबुद्ध झाले. अगरवाल दांपत्याच्या 'इंडिया भेजनेसे सब ठीक हो जाएगा' या हुकमी एक्क्याची मला आठवण झाली. त्यानंतर एक-दोन दिवसांतच आनंदाची बातमी देण्यासाठी अगरवाल कुटुंबानं मला पुढील शनिवारी जेवणाचं आमंत्रण दिलं. जयबद्दल बोलण्यासाठी चांगली संधी चालून आल्यामुळे मी ते आमंत्रण स्वीकारलं.

फुलांचा गुच्छ घेऊन मी अगरवालांच्या घरी प्रवेश केला. माझे डोळे जयला शोधत चहुकडे भिरभिरत होते. मला पाहताच त्याला आनंद झाल्याचं

मला जाणवलं. जय सोडून इतर सर्वांच्या उत्साहाला उधाण आलं होतं. संधी साधून जय पुन:पुन्हा माझ्याजवळ येऊन मी आश्वासन दिल्याप्रमाणे त्याच्या आईवडिलांशी बोलावं याची आठवण करून देत होता. माझ्याबरोबर आणखी दोन-चार मित्रमंडळींना जेवणाचं आमंत्रण होतं. केव्हा आणि कसं बोलावं याची चिंता करतच मी सर्वांमध्ये मिसळून गेले.

जेवणाचा सोहळा मजेत पार पडला. मला अगोदर ठाऊक असलेली जयच्या साखरपुड्याची आनंदाची बातमी त्याच वेळी सर्वांना देण्यात आली. अगदी फोटोंसह. मुलगी सुरेख होती. जयला साजेशी होती. अकांऊटंट होऊन बँकेत नोकरीला होती. साखरपुड्याचा समारंभ लग्नाइतक्या धुमधडाक्यात पार पडला होता. मीही त्या सर्वांच्या आनंदात सहभागी होण्याचं नाटक सहजपणे करत होते. जयचा उदास चेहरा पाहून माझं काळीज गलबलून आलं. माझ्याकडे एक जळजळीत कटाक्ष टाकून तो आपल्या खोलीत निघून गेला. तो फोनवर कोणाशी तरी बोलत होता. आपल्या 'मंगेतर'ची याद असह्य होऊन तो तिलाच फोन करत असेल अशी आम्ही सर्वजण बाहेर चेष्टा करत होतो.

खाना उरकून केक, गुलाबजाम व कॉफी ह्यांची चव घेत, गप्पा चघळत आम्ही फॅमिली रूममधे जयच्या साखरपुड्याचा व्हीडिओ पाहण्यात दंग होऊन गेलो. तास-दीड तास सहज निघून गेला असावा. माझं घर दूर असल्यामुळे मी घरी जाण्यास उठले. पुन्हा कॉफीचा आग्रह झाला. घराजवळच्या इंडियन दुकानात विडे छान मिळतात ते खाऊनच जा असा आग्रह अगरवाल ह्यांनी केला व विडे आणण्यासाठी त्यानी जयला आवाज दिला. त्याच्याकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे ते स्वत: विडे आणण्यासाठी गराजमधून गाडी काढण्यासाठी निघाले.

गराजमधून आलेली किंकाळी ऐकून आमचं काळीज थरारलं. सर्वजण खाली गराजच्या दिशेनं धावले.

गराज बंद करून जयनं कार सुरू केली होती. कार्बन मोनॉक्साईड पॉयझनिंगमुळे प्राण जाऊन त्याची मान स्टिअरिंग व्हीलवर कलंडली होती.

घराण्याची अब्रू वाचवण्याचा हा एकच अंतिम मार्ग जयकडे उरला होता, आपल्या वेगळेपणाचं प्रायश्चित्त घेण्यासाठी..

◆◆◆

# उंच हवेत...

ज्युनियर हायस्कूलमध्ये असताना रॅण्डीला सिगारेटची व त्याबरोबर मेरुवानाची ओळख जॉशुआच्या मेहरबानीमुळे झाली. सीनियरच्या वर्गात पाऊल पडण्यापूर्वीच त्याचं व्यसनात रूपांतर झालं. रॅण्डी आपल्या आईवडिलांचा एकुलता एक मुलगा. तो सहा-सात वर्षांपूर्वी डेहराडूनहून फ्लॉरिडाला आला होता. तो एका वर्षाच्या आत रणधीरचा रॅण्डी झाला होता. डेहराडूनच्या काही पुसटशा आठवणी आता त्याच्यापाशी उरल्या होत्या. तो फ्लॉरिडाला आल्यापासून दोन वेळा डेहराडूनला जाऊन आला होता, ते केवळ आईवडिलांबरोबर जाणं भाग पडलं म्हणून. इतका तो इथं रमला होता! त्याला आता डेहराडूनची किंवा भारताची फारशी ओढ नव्हती. आजोबांच्या निधनानंतर आजी इथं आली होती आणि त्यानंतर आत्या व काकाही.

रॅण्डी सोळा वर्षांचा झाला. थोडा सावळा पण दिसायला चांगला असलेला रॅण्डी शरीरानं मात्र किरकोळ होता. आई डॉक्टर व वडील कम्प्युटर नेटवर्किंगमध्ये एका कंपनीत बऱ्याच वरच्या हुद्यावर होते. इतर भारतीय आईवडिलांप्रमाणे त्याचे आईवडीलही त्याला डॉक्टर करण्याच्या मागे लागले होते. त्यांच्या अनेक मित्रांची मुलं वेगवेगळ्या विद्यापिठांत वैद्यकीय शिक्षण घेत होती. रॅण्डीला मात्र त्यात

अजिबात रस नव्हता. त्याची रुग्णांच्या सहवासात जन्मभर काम करण्याची मुळीच इच्छा नव्हती. अर्थात त्याच्या आईवडिलांना ते पटण्याजोगं नव्हतं. त्यांचा मेडिकल स्कूलला जाण्यासाठी रॅण्डीवरचा दबाव वाढत होता. त्याची इतर भारतीय मुलांशी तुलना होत होती. या साऱ्याला रॅण्डी कंटाळून गेला होता. त्यामुळे भारतीय मुलांशी मैत्री टिकवणं त्याला अवघड जात होतं.

रॅण्डी अकरावीत असताना जॉशुआ त्याच्या आयुष्यात आला. त्यानं रॅण्डीचं मन लगेच जिंकलं. जॉशुआचा मनमोकळा, विनोदी स्वभाव व कोणतीही गोष्ट सहजपणे समजून घेण्याची वृत्ती यामुळे रॅण्डी त्याच्याकडे आकर्षिला गेला व त्याच्या मैत्रीत गुरफटला गेला. जॉशुआच्या आईवडिलांनी घटस्फोट घेतला होता व तो आईकडे राहत होता. वडिलांनी फारशी जवळीक केली नव्हती. आई दोन नोकऱ्या सांभाळत दोन मुलांचं पालनपोषण करत होती. या जॉशुआनं रॅण्डीला आपल्या ग्रुपमध्ये स्थान दिलं आणि त्याची सिगारेटशी व रीफरशी (मेरुवाना) ओळख करून दिली.

या ग्रुपचा हा कारभार एका पडक्या बिल्डिंगमध्ये बरेच महिने चालू होता. एके दिवशी, जॉशुआनं ॲण्टवॉनला ग्रुपमध्ये आणलं. त्यानं सर्वांची त्याच्याशी ओळख करून दिली व त्याच वेळी सर्वांच्या त्रासाला, समस्यांना सुरुवात झाली. ॲण्टवॉन शिडशिडीत बांध्याचा, सावळा, तरतरीत व धडपड्या तरुण होता. असेल अठरा-एकोणीस वर्षांचा. बोलताना तो हातवारे करत असे व त्याचा नेहमी घाईत असल्याचा बहाणा असे. कधी कधी त्याचे डोळे झोपेत पेंगल्याप्रमाणे स्वप्नील दिसत असत. अशा वेळी त्याचं बोलणंही विसंगत भासत असे. तो रोज संध्याकाळी येऊन ग्रुपबरोबर एक-दोन जॉईंटस ओढत असे.

एके दिवशी ॲण्टवॉननं सर्वांना उत्तमात उत्तम एका ड्रगची ओळख करून देणार असल्याचं जाहीर केलं.

"मॅन, फर हा बच्चे लोकांचा खेळ आहे. तुम्ही सर्वजण आयुष्यातला मौल्यवान वेळ वाया दवडत आहात," त्यानं मांडणी केली.

"अशी काय चीज आहे तुझ्याकडे की ती रीफरला बच्चे लोकांचा खेळ बनवू शकते?" मिगेलनं विचारलं.

ग्रुपमध्ये आल्यापासून सर्वजण ॲण्टवॉनचा मान राखत, त्याचं बोलणं लक्षपूर्वक ऐकत असत. तो जरी लहानखुरा असला तरी सर्वांवर त्याची जबरदस्त छाप होती.

"माझ्याकडे अशी काही चीज आहे, की ती तुम्हाला पतंगापेक्षाही उंच नेईल." ॲण्टवॉन.

"ती कोणती वस्तू आहे, ॲण्टवॉन?' व्हिनीनं विचारलं. व्हिनी एरवी कमी बोलत असे, पण मेरुवाना ओढल्यावर तो बोलू लागला की थांबणं कठीण.

कोटाच्या आतल्या खिशातून एक बंद पाकिट काढून ॲण्टवॉननं त्यातल्या गोळ्या मोठ्या अभिमानानं सर्वांपुढे धरल्या. "या गोळ्या तुम्हाला हवेत नेऊन पोचवतील-" असं म्हणत त्यानं आणखी एक पुडकं खिशातून बाहेर काढलं. "तुम्ही फार उंच गेलात तर या गोळ्या तुम्हाला पुन्हा जमिनीवर आणतील. तुम्ही सर्वजण माझे दोस्त असल्यामुळे मी यावेळी त्या तुम्हाला फुकट देईन."

"थँक्स ॲण्टवान, तू आमचा खरा जानी दोस्त आहेस," रॅण्डी म्हणाला. परंतु त्याचं बोलणं मनापासून नव्हतं. जेव्हा मेरुवानाचा सर्वात प्रथम झुरका घेतला होता त्यावेळी त्याच्या पोटात ढवळून आलं होतं व सारखं मळमळत होतं, याची आठवण त्याच्या मनातून जायला तयार नव्हती. गँगनं आपल्याला बच्चा समजू नये म्हणून तो जिवाचा आटापिटा करत असे. आपणही ग्रुपबरोबर आहोत असं भासवण्यासाठी त्यानं वरचं विधान केलं होतं. आपण नवीन ड्रग घेण्यास किती उत्सुक आहोत हे दाखवण्यासाठी ॲण्टवाननं पुढे केलेल्या दोन गोळ्या रॅण्डीनं तोंडात टाकल्या.

त्यानंतर त्या अंधाऱ्या जागेत मेरुवानाबरोबर गोळ्यांचा खुराक सुरू झाला.

ॲण्टवान दिवसा फारसा फिरकत नसे. तो फक्त संध्याकाळी चक्कर टाकत असे. दिवसा त्याची अनेक बिझनेस डिल्स असत. एका संध्याकाळी खुशीत येऊन तो म्हणाला, "तुम्ही सर्वजण माझे यार आहात, फार चांगली मुलं आहात तुम्ही. मी आज तुम्हाला एक रहस्य सांगणार आहे. प्रथम मला सांगा, की या ग्रुपमध्ये कोणी भित्री मंडळी आहेत का?"

मनातून जरी हादरला असला तरी रॅण्डी चूप बसला.

"मॅन, ही चीज तुम्हाला शोधून सापडणार नाही," ॲण्टवान पुढे म्हणाला. त्यानं खिशातून कसली तरी पूड बाहेर काढली व कशात तरी भरली. पुढल्या क्षणी ॲण्टवाननं आपल्या हातात सुई खुपसली. रॅण्डीच्या डोळ्यांसमोर काजवे फिरू लागले. तो पांढराफटक पडला. ॲण्टवानची नजर त्याच्याकडे वळली व तो मोठ्यानं हसला.

"चेहरा तर पाहा रॅण्डीचा. काय झालं रे तुला?"

"ती...ती सुई हातातून बाहेर काढ आधी"

"का? तुझ्या पोटात भीतीनं गोळा उठला का ?"

"नाही. तसं काही नाही"

"तुला सुई टोचून पाह्यची आहे का?" त्यानं ती सिरींज रॅण्डीच्या समोर धरली.

"नाही, नाही, आता नको, पुन्हा केव्हा तरी," रॅण्डी जवळजवळ ओरडलाच!

"का? घाबरलास ? दंडात घालून तर पाहा."

रॅण्डीचा पाठलाग करण्यासाठी ॲण्टवान त्याच्या मागे पळू लागला. सर्वजण हसत रॅण्डीला टोमणे मारू लागले. ॲण्टवानच्या जिंकण्याबाबत पैज लावू लागले. रॅण्डीची स्थिती केविलवाणी झाली होती.

शेवटी ॲण्टवानने रॅण्डीला पकडलं व त्याला आपल्या बाजूला वळवलं. इतर सर्वजण ओरडून त्याला प्रोत्साहन देऊ लागले. रॅण्डीच्या शर्टाची बाही उचलून ॲण्टवाननं त्याच्या शीरेमध्ये सुई खुपसली. रॅण्डीला भोवळ आली व काही समजण्यापूर्वीच तो जमिनीवर कोसळला. व्हिनी त्याला पंख्यानं वारा घालू लागला, तर बाकीचे सर्वजण त्याच्याकडे चिंतेनं पाहू लागले.

ॲण्टवानच्या चेहऱ्यावर विजयाचं हसू उमटलं होतं.

"काही काळजी करू नकोस, बच्चे" तो म्हणाला, "हायपो रिकामी होती. तुझ्यासारख्यांवर मी हे वाया घालवीन असं तुला वाटलंच कसं? ह्या चिजेला खूप पैसे पडतात."

"किती पैसे?" "रिकनं प्रश्न केला. मला एक शॉट घेऊन पाहायचाय"

"मॅन, तू खरा पुरुष आहेस या मुलांमध्ये."

"तो एकटा नाही काही", चार्ली म्हणाला. कोणतीही नवीन गोष्ट करून पाहण्यासाठी चार्ली नेहमी तयार असे. "मीसुद्धा थोडं घेऊन पाहायला तयार आहे."

"मीसुद्धा" आता व्हिनी पुढे झाला. लवकरच रॅण्डीखेरीज सर्वजण प्रथम टोचून घेण्यासाठी एकमेकांशी चढाओढ करू लागले. रॅण्डी मनातून घाबरला होता, पण तसं दाखवायची त्याची तयारी नव्हती. म्हणून तोही म्हणाला, "हा माल मला फारसा पेटवू शकत नाही. मी सावकाशीनं केव्हा तरी घेऊन जाईन." तो बच्चा आहे असं ठरवून त्याच्याकडे सर्वांनी दुर्लक्ष केलं.

"याला किती खर्च येईल?" रिकनं विचारलं

"तीन डॉलरच्या नॅगनं सुरुवात कर." ॲण्टवान म्हणाला, "काही दिवसांनी

मोठ्या डोसची गरज भासेल.''

आपण अजून यात मुरलेलो नाही, अद्याप बच्चा आहोत असं सर्वजण समजतात, याचा रॅण्डीला फार अपमान वाटला. काय म्हणावं, काय करावं हे त्याला सुचेना. विचार न करता त्यानं एकदम तोंड उघडलं, ''तुम्ही सर्वजण मिळून माझी गिटार विका व आपली पहिली बॅग विकत घ्या.'' त्याचं गिटारवर मनापासून प्रेम होतं. तो पुढेमागे म्युझिशियन होण्याची स्वप्नं बाळगून होता. पण एकदा तोंडातून शब्द बाहेर पडल्यावर तो मागे घेता येणं शक्य नव्हतं. आपण वेड्यासारखं काहीतरी बोलून गेलो याचा त्याला आता पश्चात्ताप होत होता.

''थँक्स रॅण्डी,'' चार्ली म्हणाला, ''ॲण्टवानला तुझी गिटार दाखवून त्याचे किती पैसे मिळतील ते विचार.''

''हे पाहा, मला किती पैसे मिळतील ह्यापेक्षा तुम्हाला या गिटारचे किती पैसे मिळतील हे जास्त महत्त्वाचं आहे. यापुढे पैसे जमवण्यासाठी तुम्ही तुमच्या वाटाघाटी करा. तुम्हाला जेव्हा इंजेक्शनची गरज भासेल तेव्हा पैशांची तजवीज करा. तुम्ही माझे दोस्त आहात. माझा विश्वास आहे तुमच्यावर. नाहीतर मी ही वस्तू दाखवलीही नसती. मला माझ्यामागे पोलिसांचा ससेमिरा नको.''

चार्लीनं गिटार विकण्याचा वायदा केला. त्याहून जास्त पैसे लागले तर इतर कुठून तरी जमवायचं ठरलं. सर्वानुमते, पैसे जमवल्यावर ॲण्टवानला बोलावायचं असं पक्कं झालं. पोलिसांच्या बाबतीत काही तापदायक गोष्टी घडल्यामुळे सध्या वातावरण गरम असल्यानं आपण काही दिवस येणार नाही असं सांगून ॲण्टवान तिथून निघून गेला.

काहीही प्रसंग न घडता एक-दोन आठवडे लोटले. परंतु त्यानंतर मात्र एकामागून एक सर्व वाईट घडामोडी होऊ लागल्या. सर्वप्रथम, व्हिनीसारखा शांत, सुस्वभावी मुलगा रेडिओ चोरत असताना पकडला गेला. व्हिनी असं काही करील अशी रॅण्डीनं कधी अपेक्षा केली नव्हती. परंतु ड्रगची तलफ आली की माणसाची विवेकबुध्दी नष्ट होते हे त्याला आता पटलं व तो स्वतःबद्दलही विचार करू लागला.

व्हिनी पकडला गेला. त्याची रवानगी काही दिवसांसाठी रिमांड होममध्ये करण्यात आली. त्यानंतर काही दिवसांनी घडलेल्या प्रसंगामुळे सर्वांच्या दुर्दैवाला सुरुवात झाली, नशिबाची घसरगुंडी सुरू झाली. ग्रुपमधल्या एका मुलीनं इंजेक्शनमधील द्रव्याचा ओव्हरडोस घेतला. सवय झाल्यामुळे तीन व पाच

डॉलरच्या बॅगनं मजा येईना, म्हणून तिनं दहा डॉलरची बॅग वापरली होती. चार-पास तास गेल्यानंतरही ती उठण्याचं चिन्ह दिसेना, ती जिवंत आहे की नाही तेही कळेना, श्वासोच्छ्वास चालू असल्यासारखा वाटत होता एवढंच.

रॅण्डीनं ते प्रथम ओळखलं. ग्रुपमधले काही लोक पैसे जमा करण्यासाठी गेले होते. ती मुलगी कित्येक तास जमिनीवर पडून होती. रॅण्डीनं तिला हलवून जागं करण्याचा प्रयत्न केला पण त्याचा काहीएक उपयोग झाला नाही. शेवटी, तो तिच्याशेजारी बसून राहिला.

"अरे, बॉनीकडे पाहा जरा. ती सबंध दिवसात हलली नाही. मी तिला उठवू शकलो नाही."

"तिला हलायचं तेव्हा ती हलेल. तू का काळजी करतोस?" चार्ली म्हणाला.

"चार्ली, मला वाटतं, ती फार आजारी आहे."

"तू काय तिची आई आहेस काळजी करायला?"

"तसं नाही रे, पण तिच्या आजाराचं स्वरूप गंभीर आहे असं मला वाटतं. आपण तिला हॉस्पिटलमध्ये न्यायला हवं असं नाही वाटत तुला?"

"वेडा आहेस की काय तू, रॅण्डी? आपण सगळेच शूट करत होतो, पण तिनं ओव्हरडोस घेतला. तिच्यामुळे आपण सर्वजण पकडले जाऊ."

"पण तिला इथं एकटं कसं सोडणार?"

"का नाही सोडायचं?"

"ती गेली तर?"

"घाबरू नकोस. ती काही मरत नाही."

"तिच्या जागी तू असतास तर मी असंच वागावं असं म्हणाला असतास तू? मला वाटतं, आपण सायनाय हॉस्पिटलला फोन करावा, नाव न देता. आपण इथून जाताना या रिकाम्या घराच्या खिडकीत डोकावलो तेव्हा तिला पाहिलं असं सांगू या."

रॅण्डीची सूचना कोणालाच आवडली नाही. त्यामुळे त्यांचं गुप्त स्थान कायमचं सोडून द्यावं लागणार होतं. त्यांची ह्याला तयारी नव्हती. रॅण्डीनं पुन:पुन्हा विनवणी करून तिच्या जागी आपण कोणीही असू शकलो असतो असं सांगितल्यावर सर्वांनी कंटाळून नाइलाजास्तव त्याच्या कल्पनेला होकार

दिला. रॅण्डीनं हॉस्पिटलला फोन केला.

"हे पाहा, या ठिकाणी आता मुळीच सुरक्षितता नाही. प्रत्येकानं आपापली सोय पाहावी, आपापल्या वाटेनं जावं. ते आपणा सर्वांच्या भल्यासाठी योग्य ठरेल." व्हिनीनं सुचवलं.

एकेक जण हळुहळू बाहेर पडून आपापल्या मार्गानं गेला. कोण कुठं जाणार ते कोणीच बोललं नाही. कदाचित, आणखी एखाद-दुसऱ्या ट्रिपसाठी अधिक पैसे गोळा करायला गेले असतील. काय करावं–कुठे जावं ते रॅण्डीला सुचेना, म्हणून हळुहळू तो पायी फिरायला निघाला. बाहेर थंड हवेत आल्यावर त्याला बरं वाटलं. काही वेळानं त्याला गोळ्यांची तलफ आली, अगदीच राहवेना.

जॉशुआ किंवा व्हिनी आता त्याच्यासाठी गोळ्या आणणार नव्हते. खिशातला जॉईण्ट काढून त्यानं गुंडाळला आणि पेटवून भराभर झुरके घेऊ लागला. त्याला कसंसं वाटू लागलं. उलटी येईल की काय ह्याची भीती वाटू लागली. तो थरथरू लागला. आपण आता मरणार असं भय त्याच्या मनात निर्माण झालं. चालता चालता परत त्या रिकाम्या घराकडे पाय कधी वळले, ते त्याला कळलंच नाही. त्याला विश्रांती हवी होती म्हणून तो त्या घराच्या भिंतीला टेकला आणि झोपेच्या अधीन केव्हा झाला, त्याचं त्याला कळलंच नाही.

एका बळकट हातानं खांदा हलवला तेव्हा त्याला जाग आली. तो हात पोलिसाचा होता. त्यानं आजुबाजूला नजर टाकली. त्या रिकाम्या घरात आता कोणी नव्हतं. बॉनीही हॉस्पिटलमध्ये पोचली असावी.

पुढचे सर्व सोपस्कार व्यवस्थितपणे पार पडले. त्याला प्रथम ठाण्यावर नेण्यात आलं व तिथून त्याच्या आईवडिलांना फोन गेले. आपण अजून जिवंत राहिल्याबद्दल रॅण्डीला नवल वाटलं. आईवडिलांना तोंड दाखवायचं धैर्य त्याच्यापाशी नव्हतं. पण प्रत्यक्ष आई आली तेव्हा आईला मिठी मारून तो ओक्साबोक्शी रडू लागला. कोर्टानं त्याची रवानगी परस्पर आमच्या ट्रीटमेंट सेंटरमध्ये केली.

रॅण्डीची व माझी ओळख प्रथम त्या दिवशी झाली!

◆◆◆

# धूसर झालेलं बालपण

एमिस्ट्स्बर्गला पहाटेचे चार वाजत होते. आपण वर येऊन लवकरच तुला नष्ट करणार अशी धमकी सूर्य अंधाराला देऊ लागला होता!

त्याला आता घाई करायला हवी होती.

नागासारखे वळसे घेत स्टेशनबाहेर पडणाऱ्या ट्रेनला न्याहाळत तो रॅम्पवर शिपमेंटसाठी धाडायच्या क्रेट्समध्ये लपून राहिला होता. येणाऱ्याजाणाऱ्या पॅसेंजर कार्सकडे तो टक लावून पाहत होता. त्याच्या हातात पैसे नव्हते. टिकटिकणाऱ्या प्रत्येक सेकंदाबरोबर चिंतेच्या गाठींनी त्याच्या पोटातली आतडी आवळली जात होती.

यानंतर आठ वाजेस्तोवर दुसरी कुठलीही गाडी नव्हती. शिवाय, त्याला उजेडात कोणी पाह्यला नको होतं. ही गाडी चुकवून भागणार नव्हतं. पहाटेच्या थंडीपासून बचाव करण्यासाठी जॅकेटची कॉलर त्यानं गळ्यापर्यंत ओढली. जॅकेट ठिकठिकाणी फाटलं होतं. त्याच्या डफलबॅगमध्ये आणखी एक जॅकेट होतं. पण हे जुनं जॅकेट त्याचं फार आवडतं होतं. त्याला ते एक-दोन वर्षांपूर्वी कोणीतरी भेट म्हणून दिलं होतं. कोणी ते, त्याला आता आठवत नव्हतं.

तो चपळ व चलाख होता. रॅम्प व गाडी यांच्या दरम्यान असलेली चार फूट जागा ओलांडणं आपल्याला जमणार नाही

हा विचारही त्याच्या मनाला शिवला नव्हता.

गाडी आता जवळ आली होती.

त्यानं अंतराचा व गाडीच्या वेगाचा अंदाज घेतला. नक्कीच पकडू आपण. मुळीच चुकणार नाही... त्याचा विश्वास वाढला.

नागमोडी वळणं घेत गाडी जवळ येऊ लागली. तिचे दरवाजे रुंद वाटू लागले. गाडीनं फार वेग घेतला नसला तरी गाडी अगदी संथही नव्हती. ती जवळजवळ वीस फुटांवर आल्यानंतर तयार होऊन तो पळू लागला. प्रथम त्यानं डफलबॅग आत टाकली. त्याच वेळी त्याचा थोडा तोल जाऊन तो डळमळला, पण त्यानं रॅम्पच्या कडेवरून उडी मारली. सर्व कामं फार काळजीपूर्वक करावी लागतील याची त्याला कल्पना होतीच.

त्याला फक्त काही क्षणांपुरतं त्याच्या पोटात एकदम रितेपण जाणवलं. त्याच्या ध्यानी आलं, की खाली पळणाऱ्या चाकांशिवाय दुसरं काही नाही. त्याच्या बरगडीत काहीतरी खुपसलं गेलं होतं. गाडीत चढत असताना त्याच्या डोळ्यांसमोर काजवे चमकले. त्याला हेही जाणवलं, की त्याच्यामागे कोणीतरी मोठ्यानं ओरडत होतं. त्यानंतर फक्त काळोख!

स्थूल देहाची, रूपेरी केसांची एक स्त्री आपल्या टेबलाखाली जमिनीवर बोटांचा ताल धरत नर्व्हसपणे बसली होती. तिनं नुकताच पोलिस हेडक्वार्टरचा नंबर फिरवून बातचीत केली होती. आता, त्यांच्याकडून उत्तराची अपेक्षा करत ती वाट पाहत होती.

फोन वाजला तेव्हा तिनं तो आतुरतेनं घाईघाईत उचलला.

"आमचा एक मुलगा बेपत्ता आहे," ती म्हणाली. "शेवटच्या 'बेडचेक'च्या वेळी तो नसल्याचं आमच्या ध्यानात आलं. त्यानं बिछान्यावर चादर नीटपणे पसरली होती. त्याच्या काही वस्तू गायब आहेत व तो पळाला आहे. तुम्ही त्याला शोधून काढलं पाहिजे, नाहीतर मिसेस ओबर्ली फार रागावेल."

"आम्ही आमच्या परीनं सर्व प्रयत्न करू." पलीकडच्या माणसाचा आवाज थकल्यासारखा वाटत होता. घोगऱ्या आवाजात त्यानं विचारलं, "नाव?"

"ओह! ऑफ कोर्स, ऑफिसर. मॅट निकल्स."

"वर्णन."

"तो पंधरा वर्षांचा आहे. जवळजवळ सहा फूट उंच, डार्क, ब्लॉंड केस, हलक्या निळ्या रंगाचे डोळे, उंचीच्या मानानं तो फार बारीक आहे."

"थँक यू मॅम. आपलं नाव प्लीज."

"मिस गार्डनर. मिस सुझन गार्डनर. ओक व्ह्यू चिल्ड्रेन होम."

पलीकडून पोलिस ऑफिसरनं फोन खाली ठेवल्याचा आवाज आला तेव्हा मिस गार्डनरनी फोन रिसीव्हरवर ठेवला. तिच्या गुबगुबीत चेहऱ्यावरचे बारीक डोळे भराभर उघडझाप करू लागले. तिच्या लालबुंद चेहऱ्यावरून ती फार घाबरली असल्याचं जाणवत होतं. तिनं काहीतरी पक्का निर्णय करून एक दीर्घ श्वास घेतला व फोनचा नंबर फिरवला.

"मिसेस ओबर्ली?" मी मिस गार्डनर बोलते आहे. "मॅट पुन्हा पळून गेला आहे हे तुम्हाला कळवण्यासाठी फोन केला."

बॉक्स कारच्या धुळीनं माखलेल्या जमिनीवर आपल्या बरगड्या तुटल्या तर नाहीत ना हे अजमावण्यासाठी त्यावरून हात फिरवत तो पडून राहिला होता. त्यानं जरा जोरात दाबल्यावर त्याच्या बरगड्यांतून वेदनेची असह्य कळ उमटली.

त्यानं हळुहळू आपले डोळे उघडले, तेव्हा सर्वप्रथम दरवाज्याची लोखंडी सळी, खांब त्याच्या नजरेस पडले. तो उडी मारताना त्यांवरच आदळला होता. तो गाडी पकडण्यात जवळजवळ अयशस्वी झाला होता, परंतु दाराचा खांब आपटूनही तो कसाबसा गाडीबरोबर राहिला होता.

रिफॉर्म होममधून पळून जाण्यात त्यानं यश मिळवलं होतं.

वेग घेतल्यामुळे गाडी जरा हलू लागली होती. धुळीचा गडद, पोकळ वास त्याच्या नाकपुड्यांना गुदगुल्या करू लागला. गाडीच्या खालून येणारा लोखंडी चाकांचा आवाज तो लक्ष देऊन ऐकू लागला. ती संवेदना सुखद होती, आवाज मधुर वाटत होता व स्वातंत्र्याचा वासही त्याला आवडू लागला होता. त्याला वाटलं, आपण बाजी मारली!

त्यानं आपला उजवा हात जरा हलवला. कोणतंही हाड मोडलं नव्हतं. फक्त ठेचलेला भाग काळानिळा झाला होता. जॅकेटची झिपर खोलून त्यानं शर्टाचं टोक बाहेर काढलं. तो बरगड्यांचा भाग काळानिळा झाला होता व तिथं दुखतही होतं. त्यात काय मोठं! यापूर्वीही जखमी झालो होतो की आपण!

त्याला कोणाचा तरी आवाज ऐकू आल्याचा भास झाला. मिस् गार्डनरचा तर नाही? एक थंड शिरशिरी त्याच्या शरीरातून उठली. त्यानं पुन्हा गाडीतून

नजर फिरवली व बाहेर काळोखात पाहिलं. छे! कोणीच नाही.

चाकांचा आवाज मोठा होत गेला—इतर आवाज नाहीसे करत व त्याबरोबर त्याच्या मनातले थंड, वेडेपणाचे विचार नष्ट करत.

गाडीत त्याच्याशिवाय आणखी कोणीतरी नक्की होतं. त्याला खात्रीनं तसं वाटत होतं. त्या काळोखात त्याला कोणाचे तरी डोळे व त्यामागची व्यक्ती अंधुकशी दिसू लागली.

शहर जसजसं मागे पडू लागलं तसा तो हळुहळू उठून बसला. गाडीच्या चाकांचा आवाज ऐकू येऊ नये म्हणून प्रयत्न करू लागला. त्यामुळे स्वतःच्या छातीची धडधड त्याला फार मोठी वाटू लागली. त्या डब्याच्या चार कोपऱ्यांत कोठेतरी—कोणीतरी आवाज न करता त्याच्याकडे टक लावून पाहण्याचा प्रयत्न करत होतं, स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव होऊ न देता.

"कोण आहे इथे?" त्यानं आवाज चढवून विचारलं. स्वतःचा आवाज त्याला स्थिर वाटला. मनातलं भय निदान आवाजात तरी उतरल्यासारखं वाटत नव्हतं.

काही उत्तर आलं नाही.

इथे कोणीतरी आहे हे नक्की. आवाज का देत नाही?

काही काळ शांततेत गेला. त्यामुळे स्वतःच्या अंतर्ज्ञानावरचा त्याचा विश्वास डळमळू लागला. त्याच्या अंतर्ज्ञानानं यापूर्वी कधीही त्याला दगा दिला नव्हता. एवढ्यात, त्याच्या डाव्या बाजूला काहीतरी हलल्यासारखं त्याला वाटलं. त्याबरोबर डब्याच्या लाकडी जमिनीवर कोणाचा तरी बूट आपटल्याचा आवाज आला.

डाव्या कोपऱ्यात छोट्या बांध्याची, जवळजवळ पाच फूट उंचीची एक व्यक्ती त्याच्या नजरेस पडली. त्या व्यक्तीचे डोळे उघडे होते. ते निळे होते. अंगावरचे कपडे मलीन, फाटके व विस्कटलेले होते. त्याच्या शरीराला निदान दीड-दोन आठवडे तरी पाण्याचा स्पर्श झाला नसावा इतका तो कळकट होता.

"तू कुणापासून - कशासाठी लपला आहेस, बाबा? एकाच डब्यातून प्रवास करण्याची वेळ आज आपल्यावर आलेली आहे, तेव्हा, आपण एक-दुसऱ्यांशी बोललेलं बरं."

तो माणूस आता आपले विस्कळीत दात दाखवत हसत होता. त्याची हनुवटी पिवळसर दाढीनं व्यापली होती व डोक्यावरचे ब्लॉंड केस उठून दिसत

होते. त्याचं हास्य मॅटला काही क्षण फसवून गेलं. त्याची नजर त्या माणसाच्या हातातल्या चाकूवर पडली व तो ताडकन् उठून उभा राहिला आणि उघड्या दरवाज्यापासून दूर झाला. आयुष्यात एवढी भीती त्याला कधी वाटली नव्हती! मॅटनं गाडीच्या डब्यात आयुष्य गुजरणाऱ्या अशा माणसांची वर्णनं यापूर्वी अनेक वेळा ऐकली होती. ही माणसं क्रूर असतात, त्यांना तसं होणं जरुरीचं असतं हे त्यानं ऐकलं होतं. परंतु मॅटला ही माणसं कुठेतरी दूर देशात, पुस्तकांच्या जगात राहत असावीत असं वाटत होतं.

आता मात्र त्याला ते जग खरं असल्याची खात्री पटली. कारण तो स्वतः त्या जगातल्या एका व्यक्तीच्या समोर उभा होता. त्या माणसाला काय हवं असेल याचा मॅट विचार करू लागला. आपले बूट, कपडे की पैसे?

त्या माणसाचा हात उंचावला गेला तेव्हा त्यातला चाकू चकाकला. त्याची बोटं चाकूच्या दांड्याभोवती आवळली होती. चाकू धरलेल्या हाताचं कोपर त्यानं स्वतःच्या बरगडीवर टेकवलं आणि हात व चाकू केव्हाही वापरता येईल अशा तयारीत तो राहिला. त्याचे गुडघे वाकलेले होते.

भीतीची एक लाट मॅटच्या सर्वांगावर शिरशिरी उठवून गेली. तो एकदम सावध झाला. दोघंही एकमेकांच्या पावलांची हालचाल पाहत एकमेकांमागून वर्तुळाकार पळू लागले. दुरून पाहणाऱ्याला वाटावं, की ती दोघं नाचत आहेत. त्यांच्याकडे पाहून कोणालाही हसू फुटलं असतं. पण ती दोघं हसत नव्हती. त्या माणसाच्या हातातला चाकू मागेपुढे होत होता. तो छोटासा माणूस मॅटपुढे एक समस्या बनून राहिला होता.

एकाएकी तो माणूस मॅटच्या अगदी जवळ आला; कसा व कधी ते त्याला कळलंही नाही. तो माणूस जवळ आला तसा मॅट एकदम मागे सरला. तेव्हा आपल्या जॅकेटची बाही फाटल्याचं त्याच्या ध्यानी आलं.

हाताच्या तळव्याचा घाम जीनला पुसत तो त्या माणसाकडे वळला.

"मी तुला कधीच हरवू शकणार नाही. तुला काय हवंय ते सांग. मी ते तुला देतो."

मॅटला वाटलं, आपण भित्रे आहोत. म्हणून काय झालं!

त्या माणसाचा चाकू धरलेला हात जरा खाली आला व त्याच्या चेहऱ्यावरचं हास्य थोडं ओसरलं.

"फक्त एक लक्षात ठेव. माझ्याजवळ पैसे मुळीच नाहीत." त्या माणसाचा

हात पुन्हा उंचावला.

"थांब जरा, माझ्याजवळ पैसे नसले तरी एक नवीन जॅकेट आहे. तुला उपयोगी पडेल."

आपण काही ऐकलं नाही अशा थाटात तो माणूस मॅटकडे पाहू लागला. मॅटला वाटलं, आता हा आपल्याला मुळी जिवंत सोडणार नाही.

"काहीतरी बोल, बाबा. एखाद्याला वाटेल तू मुका आहेस."

तो माणूस पुन्हा चालू लागला. पण त्याची चाल लडखडत होती. तो सरळ जाऊन समोरच्या भिंतीवर आदळला. मॅटनं ही संधी सोडली नाही. आपल्या बुटाच्या लाथेनं त्यानं त्या माणसाला खाली पाडलं व तो त्याच्या पोटावर बसला. मॅटनं त्याला बडवायला सुरुवात केली, त्याची हालचाल जवळजवळ थंड होईपर्यंत.

युनिफॉर्ममधल्या ऑफिसरनं ॲश ट्रेमधली सिगारेट विझवली व तो मिसेस ओबर्ली व मिस गार्डनर ह्यांच्याकडे वळला.

"कामगारांनी एक उंच, ब्लॉंड मुलगा आज पहाटे मालगाडीत उडी मारताना पाहिला आहे. गाडी नऊ वाजता सिल्व्हरस्प्रिंगला पोचेल तेव्हा त्याला तिथं पकडण्यासाठी जावं असं मी कॅ. टेलर ह्यांना कळवतो. मी इथून एवढंच करू शकतो."

"मग तसंच करा," मिस गार्डनर उतावीळपणे म्हणाली. तिच्या आवाजात भय होतं. ती काळजीत असल्याची खूण होती.

ऑफिसरनं मान हलवून पुन्हा फोन उचलला.

धुळीनं माखलेल्या जमिनीवरून मॅटनं चाकू उचलला व हातात घट्ट धरून ठेवला. तो माणूस वेदनांनी कळवळत होता, तरी हालचाल करू पाहत होता. मॅट गाडीच्या डब्याच्या दुसऱ्या टोकाला जाऊन भिंतीला टेकून बसला.

त्या माणसानं कोटाच्या बाहीनं रक्त पुसत मॅटवर नजर रोखली. रक्त त्याच्या चेहऱ्यावर पसरलं होतं व त्याची पिवळी दाढी लाल झाली होती.

"स्वस्थ पडून राहा." मॅटनं शांतपणे हुकूम केला. आताच घडलेल्या प्रसंगामुळे तो आतून हादरला होता. त्याने त्या माणसाचा जवळजवळ खून केला होता.

“तुला बोलणं शक्य आहे का?”

त्या माणसानं चेहरा पलीकडे वळवला.

“या बाजूला वळ, म्हणजे मला तुझा चेहरा दिसू शकेल.”

तो माणूस वळला व डोळे मोठे करून, काही न बोलता मॅटकडे पाहू लागला.

“तू बोलू शकशील?”

त्या माणसानं मान डोलावली.

“तू माझ्यावर हल्ला का करू पाहत होतास? तू मला ठार मारलं असतंस. तुझी अवस्था अशी झालेली पाहूनही मला तुझ्याबद्दल मुळीच सहानुभूती वाटत नाही.”

त्या माणसानं पुन्हा मान हलवली.

मॅट बोलायचा थांबला. दोघं चुपचाप बसून एकमेकांकडे पाहू लागले. दरवाज्यातून सूर्यप्रकाश हळुहळू आत येऊ लागला होता. आता ते शहराच्या बाहेर आल्यामुळे आजुबाजूला इमारती दिसत नव्हत्या. रिमांड होम्स नव्हती. पळून जाण्याबाबत मॅटला शंका वाटत होती, पण तशी ती त्याला नेहमीच वाटे.

मॅटला काही वेळ त्या माणसाचं विस्मरण झालं. विसरू लागलेल्या अतीतातील धूसर स्मृतींखेरीज इतर सर्वांचं, वर्तमानाचं त्याला या क्षणी विस्मरण झालं. भूतकाळातल्या आठवणी, माणसं, घर, वस्तू स्पष्टपणे आठवण्याचा प्रयत्न त्यानं यापूर्वी अनेकदा केला होता. आपल्याला आपलं बालपण आठवत नाही याबद्दल त्याला खंत होती. तिसऱ्या वाढदिवसानंतर कधी न पाहिलेलं आपलं घर आपल्याला आठवू नये ह्याबद्दल त्याच्या मनाला नेहमी टोचणी असे.

“कुठली जागा कधी सोडून गेला आहेस का?” हा प्रश्न जरी त्या माणसाला निर्देशित असला तरी मॅट फक्त स्वतःचा विचार करत होता.

त्या माणसानं नजर वळवून मॅटकडे नुसतं पाहिलं, की पाहिल्यासारखं केलं?

“अशी जागा, जी तुझ्यासाठी योग्य असली तरी तुला मात्र मनापासून आवडत नाही.”

त्या व्यक्तीनं डोळे मोठे करून, न हसता मॅटच्या सर्वांगावरून नजर फिरवली, पण त्या डोळ्यांनी काही पाहिल्यासारखं वाटत नव्हतं.

“ज्याची स्मृती जवळजवळ नाहीशी झाली आहे त्याची याद करून कधी रात्र न् रात्र तळमळत काढलीय का? घरासमोरच्या झाडांवरच्या फुलांचा बहर

कधी आठवायचा प्रयत्न केलाय का? किंवा काही आवाज? आपल्या वडिलांचा आवाज कसा होता ते आज तुला आठवतं का?''

त्या माणसानं नजर वळवली नाही की उत्तर देण्याचा प्रयत्न केला नाही.

''घरातल्या फायरप्लेसच्या डाव्या कोपऱ्यातला कुत्रा आठवतो तुला? त्याचा रंगही आता लक्षात नाही आणि मॅण्टलवरचे फॅमिलीचे फोटो? ते खरंच तिथं होते का असा संशय तुझ्या मनात आला आहे कधी? केव्हा केव्हा या आठवणी इतक्या उचंबळून येतात, दाटून येतात की मनापासून हुंदके देत रडावंसं वाटू लागतं. असं कधी झालं आहे तुझं?''

त्या माणसानं नक्की मान डोलावली आहे याची मॅटला खात्री पटली. त्याला वाटलं, आता आपल्याला खूप बरं वाटू लागलं आहे. मनातले विचार उघडपणे बोलून दाखवल्यावर त्याला मोकळं वाटू लागलं.

मॅटनं चाकूवरून नजर फिरवली. तो चाकू काढून घेतल्यावर या माणसाची सर्व शक्ती संपुष्टात आली असावी असं त्याला वाटलं. झटक्यासरशी त्यानं तो चाकू दरवाज्यातून बाहेर फेकला व तो उठून त्या माणसापाशी गेला. गुडघे टेकून त्याच्या शेजारी बसत त्यानं विचारलं, ''तू मला सांगशील सर्व? तुझं घर छोटं होतं की मोठं? कोणत्या रंगाचं होतं?''

मॅट प्रश्न विचारत सुटला.

त्या माणसानं मॅटकडे थोड्या रागानं, थोड्या तुच्छतेनं पाहिलं.

''बोलणं कठीण असेल तर खुणेनं सांग. सांग, तुझं घर कोणत्या रंगाचं होतं? ग्रे, निळं, पांढरं की पिवळं?''

''तपकिरी छपराचं मोठं, सफेद घर होतं. सभोवती खूप झाडं होती व त्यावर लावलेल्या बर्ड फीडरवर नेहमी पक्षी बसलेले असत. वडील उंच, धिप्पाड होते. आपल्या धर्मानं झपाटलेले ते एक पाद्री होते. माणूस सज्जन असला तरी शिस्तीचा कडक व फार अभिमानी होता. त्यांना तीन चांगले सुदृढ मुलगे होते. त्यानंतर सर्वात छोट्याचा जन्म झाला - सतत आजारी व फिक्कट असलेला मुलगा. हळुहळू या मुलाला दृष्टी नसल्याचं सर्वांच्या ध्यानी आलं. त्याची आई इतर मुलांपेक्षा त्याच्यावर जास्त माया करत असे. वडिलांनी मात्र त्याच्यावर कधी प्रेम केलं नाही. ते आजारी मूल व्यभिचारातून - पत्नीच्या लग्नबाह्य संबंधातून - जन्मलेलं बेवारशी मूल असल्याचा त्याचा दावा होता. हा त्याचा दावा पूर्णांशानं खोटा असला तरी ते तसं मानायला मुळी तयार

नव्हते. एका अपंग, आंधळ्या मुलाला आपण जन्म दिला या सत्याचा स्वीकार करण्याची त्यांच्या मनाची तयारी नव्हती. आईला व्यभिचाराबद्दल देवानं शिक्षा केली असं ते म्हणत असत. परंतु त्यांनी तिला घटस्फोट मात्र दिला नाही. जरा मोठा होऊन, थोडीफार समज आल्यावर या मुलाला त्यांनी घराबाहेर काढलं व त्याच्या आईचं उर्वरित आयुष्य नरकातल्या जीवनापेक्षाही असह्य केलं. तरीसुद्धा कधीतरी आपला मुलगा, आंधळा मुलगा आपल्याला भेटेल ह्या आशेवर ती पाच-सहा वर्षं जगली.''

त्या माणसानं आपले डोळे टिपले.

''त्या घराची अजूनही आठवण येते. चुकल्यासारखं वाटतं. का ते मात्र समजत नाही?''

मॅटला ते समजण्याची गरज नव्हती. घर हे घर आहे. ते सोडल्यानं वा सुटल्यानं सर्वांना पश्चात्ताप होतो. तो ज्या घरातून आता पळून जात होता ते घर नव्हतं, तो तुरुंगही नव्हता, तरी तसा भासत होता. त्याला त्याच्या घरातल्या फायरप्लेसवरच्या मँटलवरचे फोटो पाह्यचे होते, कोपऱ्यातला कुत्रा पाह्यचा होता, घराभोवतालची झाडं पुन्हा पाह्यची होती. आणखी बऱ्याच गोष्टी करायच्या होत्या आणि हो, वडिलांचा तो कानी पडणारा अस्पष्ट आवाज ऐकायचा होता.

कॅप्टन टेलर ह्यांनी आपली स्क्वाड कार स्टेशनपासून थोडी दूर पार्क केली. ते नऊ वाजता एमिस्ट्स्बर्गहून येणाऱ्या गाडीची वाट पाहण्यासाठी जवळच्या पिवळ्या इमारतीत शिरले. त्यांनी मनगटावरच्या घड्याळावरून नजर फिरवली. आठ चाळीस. ते सिगारेट शिलगावून खुर्चीला पाठ टेकून बसत झुरके मारू लागले. त्यांच्या मनात विचार आला, ही मुलं असं का बरं करतात? हजारो रोज घरातून पळून जातात. त्यातली फक्त सहा किंवा सात, फार तर यशस्वी होत असतील. तरीसुद्धा ही वेडी मुलं पळून जाण्याच्या प्रयत्नात असतात. पोरानं पळून जाण्यामागे नक्की काहीतरी कारण असणार. पण त्यानं असं करायला नको होतं. असं पळून जाणं कधी यशस्वी होत नाही हे समजायला हवं होतं त्याला.

त्या माणसाचं हास्य चेहऱ्यावर पुन्हा परतलं. ते पाहून मॅटला फार बरं वाटलं. तो आपल्याकडे पाहत आहे असं त्याला वाटलं. त्याच्या अंध डोळ्यांत

एक प्रकारची चमक होती. आपल्या अंगातलं जॅकेट काढून मॅटनं ते त्या माणसाकडे भिरकावलं. त्याच्यापेक्षा त्या आंधळ्याला त्या जॅकेटची जास्त जरूर होती. मॅटच्या नॅपसॅकमध्ये एक नवीन जॅकेट होतं.

मॅट आता थकला होता व त्याला विश्रांतीची गरज होती. त्यानं भिंतीला पाठ टेकवली व कळण्यापूर्वी तो झोपेच्या अधीन झाला. त्याला अनेक गोष्टी करायच्या होत्या. कुत्रा, फोटो...

"ठीक बेटा, उठ आता."

दरवाज्यातून येणाऱ्या सूर्यकिरणांमुळे काही क्षण मॅटला काही दिसेना, म्हणून त्यानं डोळे बंद केले. त्याच वेळी एका ताकदवान हातानं त्याचा दंड पकडला व त्याला उठवून उभं केलं.

"तुझं नाव मॅट आहे ना?"

संपलं सारं. मॅट निराश झाला. इतका भांबावला, की क्षणभर त्याला वाटलं की आपल्याला उलटी येईल.

"चल मॅट, निघ इथून." आवाज थंड, पण हुकमी होता. पराभवाच्या या वैफल्यामुळे मॅटच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. ते अश्रू या क्षणी जगातली कोणतीही शक्ती थांबवू शकली नसती. पण तो रडण्याइतका लहानही राहिला नव्हता. त्यानं त्या माणसाकडे नजर वळवली. त्याचा चेहरा निर्विकार होता. तो आपले अश्रू पाहू शकत नाही हे जाणून मॅटला बरं वाटलं. या वेळच्या पळण्याच्या प्रयत्नात तो बरंच काही शिकून गेला.

त्याच्या दंडावरच्या हाताची पकड सौम्य, हळुवार पण बळकट होती. त्या पकडलेल्या हाताकडे मॅटनं खाली वळून पाहिलं. त्यावर सिगारेटच्या तंबाखूचे पिवळसर डाग होते. त्याला स्वतःच्या बालपणातल्या आणखी एका पुरुषाचे तसे तंबाखूमुळे डागाळलेले हात आठवले.

मॅट आता हुंदके देऊन रडू लागला.

त्याच्या हातावरची पकड घट्ट झाली.

"कुत्रा नक्की पांढरा होता." मॅट स्वतःशी पुटपुटला. त्याच्या आवाजात कंप होता. "मी तो पांढरा समजीन. जर कुत्रा होता तर तो पांढराच असणार."

त्याच्या खांद्यावरची पकड थोडी ढिली झाली व त्याला त्या हातानं दाराकडे वळवलं.

◆◆◆

# उपरा

दिल्लीच्या बंगाली मार्केटमधील उन्हाळ्यातली एक ढळती संध्याकाळ. मी व राजन आमच्या घरासमोरच्या रस्त्यावर क्रिकेट खेळत असताना तो अचानक प्रगटला. तो आमच्या गल्लीतला मुलगा दिसत नव्हता किंवा आमच्या कॉलनीतला असावा असंही वाटत नव्हतं. आमच्या घरासमोर असलेल्या लॅबर्नमच्या मोठ्या बुंध्याला टेकून तो उभा होता. विस्कटलेले केस थोडे डोळ्यांवर आलेले, हात खिशात. गबाळा व कृश असलेला तो आमच्याकडे आशाळभूतपणे पाहत गुपचूप उभा होता. त्याच्या चेहऱ्यावर उत्सुकता, तर डोळ्यांत कुतूहल व किंचित हेवा डोकावत होता.

तो बसण्याच्या तयारीत असताना राजननं वेडावाकडा फेकलेला बॉल त्याच्याजवळ जाऊन पडला. सर्व मुलं फेकतात त्याप्रमाणे तो बॉल परत आमच्याकडे फेकेल म्हणून आम्ही अपेक्षेनं त्याच्याकडे पाहत उभे राहिलो. परंतु त्यानं तो बॉल उचलला व रस्ता ओलांडून तो आमच्या बाजूला आला. त्यानं हळुवारपणे, काळजीपूर्वक तो बॉल आमच्यासमोर जमिनीवर ठेवला. आम्ही खेळाला पुन्हा सुरुवात करणार, एवढ्यात राजनच्या आईनं बाल्कनीतून डोकावून जेवण तयार असल्याची वर्दी दिली. जेवण झाल्यावर

सायकलवरून रपेट करण्यासाठी परत येण्याचं आश्वासन देऊन राजन निघून गेला. मी माझ्या घरात शिरलो तरी व्हरांड्याच्या जाळीतून तो माझ्या नजरेस पडत होता. त्याच्या नजरेत चिमणीचा बुजरेपणा होता. तो लॅबर्नमच्या बुंध्याला टेकून बराच वेळ उभा होता. त्याच्या चेहऱ्यावर निर्विकारता व बुजरेपणा ह्यांचं मिश्रण होतं.

उन्हाळ्याची सुट्टी असल्यामुळे राजन व मी रोज काही ना काही निमित्तानं भेटत असू. आम्ही सिनेमा, क्रिकेट, फुटबॉल, हॉकी, शाळेचं पुढचं वर्ष अशा अनेक विषयांवर तासन्तास गप्पा मारत असू. कधी कधी आम्ही ठिकठिकाणी गोळा केलेले क्रिकेट व फुटबॉल ह्यांच्या टीमचे फोटो अल्बममध्ये लावत घराच्या पायरीवर किंवा व्हरांड्यात बसत असू. शाळेतल्या बऱ्याच मुलांना असे फोटो जमवण्याचं वेड होतं. मला व राजनलाही हा छंद होता. सहजपणे न मिळणारे दुर्मिळ असे फोटो आम्ही विकत घेत असू.

एक-दोन दिवसांतच संध्याकाळी राजन त्याचा ऑस्ट्रेलियन क्रिकेट टीमच्या फोटोंचा नवीन संग्रह घेऊन माझ्या घरी आला. त्याच्याबद्दल वाटणारा हेवा लपवणं मला कठीण जात होतं. आम्ही घराच्या पायरीवर बसून फोटो बघण्यात दंग झालो होतो. आम्ही इतके मोहून गेलो होतो, की रस्त्यावरून आमच्याकडे कोणीतरी कुतूहलानं पाहत आहे याची आम्हाला दखलच नव्हती! दोन दिवसांपूर्वी आमचा बॉल परत करणारा तो मुलगा आमच्याकडे निरखून पाहत होता.

"माझ्याजवळ अशी अनेक चित्रं व फोटो आहेत" तो जरा पुढे येण्याचं धैर्य करत म्हणाला. "तुम्हाला हवे असल्यास मी ते तुम्हाला देईन. आता असे फोटो गोळा करण्याची हौस मला फारशी उरलेली नाही."

आमच्यातला लोभ जागृत करण्यात तो यशस्वी झाला होता. आम्ही त्याला लगेच आत बोलावलं. परंतु तो दुकानातून काही सामान आणण्यासाठी निघालेला असल्यामुळे त्यावेळी आत आला नाही. तो अर्ध्या तासानं परतण्याचं आश्वासन देऊन निघून गेला. जाण्यापूर्वी त्याला आमच्यात खेळायला घेण्याचं आश्वासन पक्कं करून गेला. सांगितल्याप्रमाणे तो अर्ध्या तासानंतर फोटोंसह परत आला. "माझं नाव आनंद आहे" त्यानं ओळख करून दिली. "मी त्या रेल्वे लाईनच्या पलीकडच्या वस्तीत राहतो."

त्याची वस्ती आमच्या घरापासून फार दूर नव्हती. आमच्या बाजूचे सिमेंटचे रस्ते तिथं पोचल्यावर नाहीसे झाले होते. रेल्वेचे रूळ ओलांडताच एक वेगळं

जग नजरेस पडत होतं. वस्ती झोपडपट्टीच्या जरा वरच्या दर्ज्याची, परंतु जवळजवळ तशी. लाकडी किंवा चुना थापलेल्या मातीच्या भिंती असलेली घरं, मोकळी असलेली जागा कचऱ्यानं भरलेली, आजुबाजूला पायात चपला नसलेली मळकट कपड्यांतली मुलं. आम्ही क्वचित त्या बाजूला जात होतो. रेल्वे लाइन ही आमच्या विटांच्या आधुनिक घरांची व अठरा विश्वे दारिद्र्य असलेल्या त्या वेगळ्या वातावरणाची सीमारेषा होती. पलीकडचं वातावरण आम्हाला नेहमी उदास, करुण व शत्रुत्वाचं वाटे.

आनंदनं दिलेल्या फोटोंची वाटणी आम्ही त्याच्यावरच सोपवली, भांडणं टाळण्यासाठी.

त्या दिवसापासून आनंद आमच्या खेळात शक्य होईल त्याप्रमाणे सामील होत गेला. तो नेहमी हरत असे. हरवलेला किंवा दूर गेलेला बॉल शोधून आणत असे. झाडावर अडकलेला पतंगही काढत असे. तो आम्हाला आवडू लागला होता. परंतु त्याचा गबाळा अवतार बदलणं आमच्या दृष्टीनं महत्त्वाचं होतं. राजनची आत्याही हीच तक्रार करत असे, ती गॅलरीत बसून सतत विणकाम व भरतकाम करत असे. त्याच्या ठिगळं लावलेल्या पँटला व विस्कटलेल्या केसांना ती नावं ठेवत असे. तोही आत्याबाईंच्या टोमण्यांना कंटाळला. आम्ही त्याला आमच्या दोन-चार पँट्स व शर्ट्स दिले, कंगवा दिला; आमच्या चपलाही दिल्या. काही दिवसांनी त्याला दिलेल्या पँटवरही, ती न धुतल्यामुळे डाग दिसू लागले. पण आम्ही त्याची मैत्री सोडायला तयार नव्हतो. त्याच्या फोटोंसह, गबाळेपणासह तो आम्हाला प्रिय होता. एकदा राजनला वाढदिवसाला भेट मिळालेलं पेन हरवलं. ते शोधून काढायला त्यानं आम्हाला मदत केली होती. माझ्या सायकलचा पंप चोरीला गेला, तेव्हा आमच्याइतकंच त्यालाही दुःख झालं होतं.

आजवर मिळाले तसे दुर्मिळ फोटो व बिल्ले यापुढे मिळणं शक्य नाही असं आनंदनं एक दिवस मोठ्या दुःखानं आम्हाला कळवलं. कारण ते देणारे गृहस्थ एका अपघातात मृत्यू पावले! त्याचे लाल, सुजलेले डोळे व उतरलेला चेहरा पाहून ते गृहस्थ त्याचे कोणी नातेवाईक होते का असा प्रश्न आम्ही त्याला विचारला. तो म्हणाला, "नाही, आमच्या वस्तीत थोड्या अंतरावर त्यांचा वर्तमानपत्रं, पुस्तकं व मासिकं यांचा स्टॅण्ड होता. मी नियमित शाळेत जात असल्यानं ते माझं कौतुक करत. अधूनमधून मला फोटो, बिल्ले व चॉकलेट

देत. कधी पैसेही देत. मी शिकून डॉक्टर व्हावं अशी त्यांची इच्छा होती. मलाही डॉक्टर व्हायचं आहे. आमच्या वस्तीमधल्या लोकांना मदत करायची आहे.'' एका दमात तो हे सारं बोलून गेला.

''ट्रेनखाली त्यांना मृत्यू आला,'' त्यानं त्यासंबंधीही बरीच महिती ऐकवली. रडण्याचा आवेग असह्य होऊन तो जमिनीवर पडून लोळत राहिला. तो जणू काही शरीर व मन थंड करण्याचा आपल्या परीनं प्रयत्न करत होता. त्यावेळी आम्हाला त्याच्या पाठीवरचे निळे व लाल डाग दिसले.

त्यानंतर त्यानं फोटो देणाऱ्या गृहस्थांचा विषय कधी काढला नाही. आम्ही त्याच्या पाठीवरच्या डागांबद्दल विचारताच त्यानं त्या जन्मखुणा असल्याचं सांगून विषय बदलला. त्यानंतर आनंदनं आम्हाला फोटो दिले नाहीत. पण त्याच्या मैत्रीपुरताही आम्हाला तो प्रिय होता. तो नकला सुरेख करी, काही पक्ष्यांचे व प्राण्यांचे आवाज हुबेहूब काढत असे. एकदा कुत्रा भुंकत असल्याचा आवाज काढून त्यानं राजनच्या आत्याला घाबरून पळायला लावलं होतं. पिंपासारखी जाडजूड आत्या पळताना पाहून आमची चांगली करमणूक झाली होती. त्या दिवसापासून आत्याबाई मात्र आनंदवर राग धरून होती.

राजननं एके दिवशी संध्याकाळी आम्हाला आपल्या घरी खेळायला बोलावलं होतं. त्याची आत्या व आईवडील बाहेर गेले होते. आत्याबाईंच्या फुलझाडांचा बगीचा व्हरांड्यात असल्यामुळे तिथं खेळायला आम्हाला परवानगी नव्हती. घरापुढच्या बागेत फुलझाडं असल्यानं तिथंही खेळास बंदी असे. घरातच खेळणं भाग होतं. प्रथम राजननं आपले स्पोर्ट-आल्बम व बिल्ले दाखवले. नंतर आत्याबाईंच्या मोठ्या गॉगल्सचं प्रदर्शन झालं. गॉगल घालून आम्ही आळीपाळीनं वेगवेगळे चेहरे केले. व्हरांड्यात बसून आईस्क्रिम खाल्लं. आनंद अजूनपर्यंत गॉगल घालून बसला होता. त्याला अचानक नकला करण्याची कल्पना सुचली. आपल्या पाठून न येण्याची सूचना देऊन तो जवळच असलेल्या आत्याबाईंच्या खोलीत शिरला व त्यानं दरवाजा बंद केला. थोड्या वेळात तो आत्याबाईंची साडी गुंडाळून, मेकप करून आत्याबाईंच्या रूपात बाहेर आला. राजनची व माझी हसून पुरेवाट झाली. त्यांच्या आवाजात त्यानं राजनवर रागावायला सुरुवात केली. आम्ही खुष होऊन त्याला आणखी नकला करण्याचा आग्रह केला. पण उशीर झाल्याचं कारण सांगून तो उठला. सर्व वस्तू जागेवर ठेवून तो परत गेला.

थोड्याच वेळात राजनचे आईवडील व आत्याबाई परतले. मी आत्याबाईंना नमस्कार केला, पण त्याकडे दुर्लक्ष करून त्या आपल्या खोलीत घुसल्या. कदाचित, त्यांना उन्हाळा बाधला असावा. थोड्याच वेळात त्या किंचाळत बाहेर आल्या, "कोण गेलं होतं माझ्या खोलीत?"

त्यांनी घुश्यात राजनला फैलावर घेण्यास सुरुवात केली. नजर मात्र माझ्याकडे होती. खरंतर, एवढा आरडाओरडा करायची जरूर नव्हती. मी घाबरून राजनकडे पाहिलं.

"माझं घड्याळ मी ड्रेसिंग टेबलावर विसरून गेले होते, ते गायब झालं आहे. माझं इंपोर्टेड, महाग घड्याळ नाहीसं झालंय." आत्याबाई ओरडतच पायऱ्या उतरून बगिच्यात आल्या. घड्याळ चोरीस गेल्याचा घोष तोंडानं चालू होता. आत्याबाईंना ओरडताना ऐकून शेजाऱ्यांच्या मोलकरणीनं रेल्वे लाइनपलीकडे राहणारा मुलगा घरातून नुकताच गेल्याची बातमी तिला पुरवली. "कोण आनंद? तरी मी सांगतच होते, त्याची संगत बरी नाही, धरू नका. पण माझं कोण ऐकतं इथं?" असं म्हणत ती मला व राजनला आपल्याबरोबर फरफटत नेऊ लागली. आम्ही गुपचूप तिच्याबरोबर चालू लागलो. तिनं केलेल्या आरोपाबद्दल नाही, तरी तिच्या धैर्याबद्दल व उत्साहाबद्दल आश्चर्य वाटलं. आपल्या हार्टबद्दल व त्यामुळे येणाऱ्या थकव्याबद्दल व कमजोरीबद्दल सतत तक्रार करणाऱ्या आत्याबाईंमध्ये एकाएकी एवढा जोम कुठून आला हे आम्हाला उलगडत नव्हतं.

रेल्वे लाइन ओलांडून आम्ही पलीकडच्या वस्तीत आलो. तिथं सुतारकाम चालू असलेल्या एका शेडजवळ आनंदचं झोपडीवजा घर होतं. मातीनं लिंपलेल्या भिंती, पत्र्याचं छप्पर व ते वाऱ्यानं उडू नये म्हणून त्यावर निळ्या रंगाचं प्लास्टिक लावून त्यावर विटा व दगड यांचं वजन ठेवण्यात आलं होतं. घराजवळ एक फाटक्या, ठिगळ लावलेल्या साडीतली बाई काहीतरी निवडत बसली होती. जवळच सहा-सात वर्षांची दोन शेंबडी मुलं एकमेकांवर ओरडत कशाशी तरी झोंबाझोंबी करत होती. आमच्याकडे नजर वळताच ती एकदम गप्प झाली. न उठता त्या स्त्रीनं नजर उचलून आमच्याकडे प्रश्नार्थक दृष्टीनं पाहिलं.

"तूच आनंदची आई का?" आत्याबाईंचा खडा सवाल.

"नाही. पण तो इथंच राहतो. त्यानं काही गडबड केली का?" त्या स्त्रीनं निर्विकार चेहऱ्यानं दिलेलं उत्तर.

"ते मी नंतर सांगीन. आधी मला आनंदशी बोलायचंय."

त्या बाईनं बेफिकिरीनं खांदे उडवले व अंधाऱ्या घराच्या दिशेकडे नजर वळवली.

"आनंद," तिनं हाक दिली, "तुला भेटायला काही मंडळी आली आहेत. झोपेचं सोंग घेऊ नकोस." त्या स्त्रीचा आवाज तुच्छतेनं भरला होता.

काही क्षणांतच डोळे चोळत आनंद बाहेर आला. जणू काही तो झोपेत चालत होता. त्याच्या चेहऱ्यावर नाराजी स्पष्ट दिसत होती.

"ओह! हे काय चाललंय?' तो भांबावल्यासारखा दिसत होता.

"माझ्या खोलीतून गायब झालेलं माझं घड्याळ मी तुझ्याकडे परत मागायला आले आहे." आपल्या येण्याचा उद्देश आत्याबाईंनी स्पष्ट केला.

आतापर्यंत आमच्या येण्याबद्दल काहीही कुतूहल न दाखवणारी ती स्त्री हातातलं ताट खाली ठेवून उभी राहिली. आनंदचे केस पकडून तिनं त्याला गर्रकन आपल्याकडे वळवलं व त्याच्या गालावर दोन थपडा ठेवून दिल्या. तिच्या रापट बोटांचे ठसे त्याच्या कोवळ्या गालांवर उमटले.

"तू त्यांचं घड्याळ कुठे लपवलं आहेस ते सांग." ती किंचाळत म्हणाली.

"मला घड्याळाबद्दल काहीच माहीत नाही. कुठलं घड्याळ? कोणाचं घड्याळ?" त्याचा चेहरा निष्पाप, निरपराधी वाटत होता. तो गयावया करू लागला, "देवाशपथ, माझ्याजवळ कुणाचंही घड्याळ नाही."

त्याच्या गालावर आणखी एक चपराक बसली. "खोट्या शपथा घेऊ नकोस," ती स्त्री पुन्हा ओरडली. त्या स्त्रीची प्रतिक्रिया इतकी अचानक घडली की राजन व मी अवाक् झालो. काय करावं सुचेना. माझे पाय लटपटू लागले. राजननं आपला चेहरा हातामागे लपवला; जणू काही फटके त्यालाच बसत होते! हा अनुभव आम्हाला नवखा होता.

आनंदला मारण्याचा सपाटा त्या स्त्रीनं चालू ठेवला.

"सांग कुठेय घड्याळ? परवा कुणाचे तरी फोटो आणि बिल्ले चोरलेस, पैसे चोरलेस. त्या दिवशी पट्ट्यानं तुझी पाठ फोडली तशी पुन्हा फोडीन. सांग, कुठे ठेवलंस घड्याळ?"

आनंद मार सोसत होता. आपल्या निरपराधीपणाची पुन:पुन्हा ग्वाही देण्याचा प्रयत्न करत होता. शेवटी, आत्याबाईंनीच मधे पडून त्या बाईला मार थांबवण्याची विनंती केली. तिचा हात थांबताच आत्याबाईच आनंदला म्हणाल्या, "घड्याळ तू चोरलंस याची मला खात्री आहे. आता कबूल करणार नसशील

तरी उद्या घेऊन ये.'' मग आमच्याकडे वळून म्हणाल्या, ''चला, आता घरी. यापुढे मात्र मित्रांची निवड जरा काळजीपूर्वक करा.''

मी जाण्यापूर्वी आनंदकडे पाहिलं. त्याच्या चेहऱ्यावरची काकुळतीची जागा आता रागानं, तुच्छतेनं घेतली होती. डोळ्यांत अंगार पेटला होता. आमच्या नजरेनं त्याला काही सांगण्याचा प्रयत्न व्यर्थ गेला. उत्तरादाखल तो आमच्याकडे पाहून तुच्छतेनं जमिनीवर थुंकला. मैत्रीची जागा आता शत्रुत्वानं घेतल्याचं जाणवलं.

आम्ही झपाझप चालत आत्याबाईंच्या आधी घरी परतलो. मी राजनच्या आग्रहापायी दहा-पंधरा मिनिटं व्हरांड्यात बसलो. कुणीच बोलत नव्हतं. आम्ही चांगलेच हादरलो होतो. राजनला घरात जाण्याची इच्छाच नव्हती.

पाच मिनिटांतच आत्याबाई परतल्या. डोकेदुखीसाठी नाक्यावरच्या फार्मसीतून औषध आणण्यासाठी आम्हाला सांगून, पैसे देण्यासाठी त्या आपली पर्स उघडू लागल्या. त्याचवेळी पाणी पिण्यासाठी घरात जाण्यास उठलेल्या राजनचा धक्का लागून त्यांची उघडलेली पर्स जमिनीवर पडली. रागानं राजनचा उद्धार करत आत्याबाई पर्स उचलण्यासाठी वाकल्या, तेव्हा आम्हा तिघांची नजर पर्समधून त्यांच्या पायाशी, जमिनीवर पडलेल्या त्यांच्या रिस्टवॉचवर खिळली.

आनंद, त्याचं कौतुक करणारे दिवंगत स्नेही, त्याला मारणारी तऱ्हेवाईक स्त्री, आनंदच्या पाठीवरचे वण, स्टेथास्कोप गळ्यात घालून मिरवणारा आनंद माझ्याभोवती गरगर फिरू लागले...

◆◆◆

# एका मातेचं ऋण

वातावरण कुंद झालं होतं, अगदी ओल्या फडक्यातल्या चक्क्याप्रमाणे. सूर्य काळ्या ढगांनी झाकला गेला होता. केव्हा एकदा पाऊस सुरू होऊन काही क्षण तरी या उन्हाळ्यातून सुटका करील असं वाटत होतं. वादळाची चिन्हं दिसत होती. कोणत्याही क्षणी वादळी वारे सुटून मुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता होती. पावसाचे एक-दोन थेंब चेहऱ्यावर उडाल्यामुळे डॉ. मर्चंट ह्यांनी गाडीच्या खिडकीची काच वर केली व गाडीतला एअरकंडिशनर सुरू केला.

बाहेर होणाऱ्या वादळाहून अधिक जोरदार तुफान डॉ. मर्चंट यांच्या मनात थैमान घालत होतं. अतिशय तल्लख असलेल्या त्यांच्या बुद्धीला आज ग्रहण लागल्यासारखं वाटत होतं. कालच्या डाकेनं त्यांच्या नावे आलेल्या एका पत्रानं त्यांचं मन चलबिचल झालं होतं, गोंधळून गेलं होतं. खुनाचा गुन्हा शाबित झालेल्या एका तरुण डॉक्टरची मानसिक तपासणी करून तो वेडा आहे किंवा नाही हे ठरवण्यासाठी कोर्टामार्फत डॉ. मर्चंट यांची नेमणूक करण्यात आली होती. ते शहरातील एक नामवंत मनोविकारतज्ज्ञ होते. त्यांनी केलेल्या शिफारशीवर त्या डॉक्टरची देहान्ताची सजा अवलंबून होती. आज ते त्या तरुण डॉक्टरला

भेटून त्याची मुलाखत घेण्यासाठी तुरुंगात जाणार होते. परंतु त्यांना आपला बेत बदलावा लागला तो त्यांना त्या तरुणाच्या - नीलच्या आईच्या अचानक आलेल्या पत्रामुळे. तिनं नीलला भेटण्यापूर्वी स्वतःला भेटण्याची कळकळीची विनंती आपल्या पत्रातून डॉक्टरांना केली होती.

"नीलच्या आईला भेटण्याआधी नीलची मुलाखत घेतलीत तर तुम्ही नीलला पूर्णपणे जाणून घेऊ शकणार नाही. आईइतकं आपल्या मुलाला ओळखणारं दुसरं कुणी असतं का?" असा त्या पत्राचा मजकूर वाचून डॉ. मर्चंट ह्यांनी नीलच्या आधी त्याच्या आईला भेटण्याचा निर्णय घेतला व त्यासाठीच ते आज तिनं पाठवलेल्या पत्त्यावर तिला भेटण्यासाठी निघाले होते.

डॉ. मर्चंट नीलच्या आईच्या घरासमोर उभे राहिले तेव्हा दुपारच्या जेवणाची वेळ होत आली होती. दरवाज्याची घंटी वाजवताच एका कृश, चिंताग्रस्त व थकलेल्या चेहऱ्याच्या मध्यमवयीन स्त्रीनं दार किलकिलं करून बाहेर कोण आलं आहे याचा अंदाज घेतला. डॉक्टरांनी आपली ओळख करून देताच चेहऱ्यावर उसनं हसू आणत तिनं दरवाजा उघडला. तिच्या चेहऱ्यावर नजर जाताच तिचे केस अकाली पिकल्याचं डॉक्टरांच्या ध्यानी आलं. ही स्त्री ऐन तारुण्यात अत्यंत सुंदर दिसत असावी असा त्यांनी कयास बांधला. ती नीलची आई असावी असा अंदाज करून डॉक्टरांनी तिला स्वतःची औपचारिक रीत्या ओळख करून दिली.

या वेळपर्यंत पावसाची रिपरिप मंदावली होती. डॉक्टरांनी आपले ओले पाय पायपुसण्याला पुसले व छत्री तिच्या हाती दिली. डॉक्टरांच्या जाणकार नजरेनं अनेक गोष्टी टिपल्या. घर छोटंसं, दोन-तीन खणांचं होतं; पण स्वच्छता व टापटीप नजरेत भरण्याजोगी होती. घराची सजावट जरी मध्यमवर्गाला साजेशी असली तरी घरच्या गृहिणीच्या उच्च अभिरुचीची जाणीव जागोजागी करून देत होती. डॉक्टरांना सोफ्यावर बसायला सांगून नीलची आई स्वयंपाकघरात त्यांच्यासाठी चहा करण्याकरता गेली. डॉक्टरांनी आपली अनुभवी नजर सबंध खोलीभर व बसल्या जागेहून दिसणाऱ्या बेडरूमवर फिरवली. समोरची बेडरूम बहुधा नीलची असावी असा कयास डॉक्टरांनी केला. दरवाजा किंचित उघडा होता व खोलीत अंधार दिसत होता. खोलीच्या खिडक्या बहुधा बंद असाव्यात व खिडक्यांना पडदे ओढले असावेत असं डॉक्टरांना वाटलं. चहाचा ट्रे घेऊन आलेल्या नीलच्या आईनं डॉक्टरांच्या समाधीचा भंग केला.

"मी येथील मिडलस्कूलमध्ये शिक्षिका आहे," तिनं आपला परिचय करून दिला, "तुम्ही येणार म्हणून मी आज घरी राहिले. नीलची धाकटी बहीण, माझी मुलगी शीला संध्याकाळी कॉलेजमधून परत येईल. तोवर आपल्याला मोकळेपणी बोलता येईल."

"तुम्ही मला नीलसंबंधी अशी काय माहिती देऊ शकता की ज्यामुळे माझं मत त्याच्याबद्दल बदलू शकेल?"

"अवघ्या तेराव्या वर्षी नील पितृछत्राला मुकला. स्ट्रोक आल्यानंतर त्याचे वडील जवळजवळ वर्षभर घरी बिछान्यावर पडून होते. हेल्थ इन्शुरन्स किंवा पुरेसे पैसे पदरी नसल्यामुळे त्यांना हॉस्पिटलमध्ये अगर नर्सिंग होममध्ये ठेवणं आम्हाला परवडण्याजोगं नव्हतं. सरकारी नोकर असूनही या आजारापायी ह्यांची नोकरी गेली. ह्यांच्या आजारीपणात नाइलाजास्तव नील त्यांची थोडीफार सेवा करत असे. परंतु बराचसा सेवेचा भार मी व शीला आम्ही उचलला होता. वडिलांबद्दल नील जरी कधी उघडपणे तक्रार करत नसे किंवा त्यांचा द्वेष करत नसे तरी, तो मनानं वडिलांच्या जवळ फारसा कधीच येऊ शकला नव्हता. वडिलांनी त्याच्याजवळ जाण्याचा कितीही प्रयत्न केला तरी तो त्यांच्यापासून शक्यतो दूर राहण्याच्या प्रयत्नांत असे मनाने व शरीरानंही. शक्य तेवढा वेळ तो घराबाहेर काढत असे. वडिलांची नोकरी गेल्यापासून तो जवळजवळ एकलकोंडा बनला होता. उघडपणे, वडिलांना नोकरीवरून बडतर्फ केल्याबद्दल तो सरकारवर राग व्यक्त करत होता. त्याने कधी कोणाशी मैत्री केली नाही. नेहमी एकटा वाचनात रमत असे. चुकला नील वाचनालयात सापडत असे. वाचनाबरोबर त्याला आणखी एक छंद होता; जवळजवळ व्यसनच होतं. आगळं वेगळं. दिव्यांच्या उजेडात अगर उन्हाच्या कवडशांत हातांच्या साहाय्यानं भिंतींवर जनावरांच्या, पक्ष्यांच्या छाया निर्माण करत तासन् तास त्यांच्याशी संवाद करत बसण्याचं त्याला वेड होतं."

नीलची आई एका दमात बोलून गेली. तिनं थकल्यासारखं वाटल्यामुळे पाण्याचा ग्लास तोंडाला लावला व कपाळावरचा घाम टिपला.

"हा मुलगा सुरुवातीपासून इतरांहून वेगळा आहे," तिनं पुन्हा बोलायला सुरुवात केली. डॉक्टरांना खुणेनं आपल्याबरोबर येण्याची विनंती करत ती उठली व समोरच्या बेडरूमकडे वळली. खोलीत शिरताच दिवा लावत म्हणाली, "ही

नीलची खोली. इथं त्यानं खिडक्यांना काळा रंग फासून, लाकूड ठोकून त्या कायमच्या बंद करून टाकल्या आहेत. अशा बंद करण्याचं कारण काय तर त्या पश्चिम दिशेच्या खिडक्या आहेत. 'सूर्य पश्चिमेला बुडतो व बुडणारी कोणतीही गोष्ट मला मुळीच आवडत नाही. पश्चिम दिशा मला मुळीच पसंत नाही' असं त्याचं सतत पालुपद असे. याच खोलीत बसून तो काही ना काही लिहीत किंवा वाचत बसे, नाहीतर दिव्याच्या उजेडात भिंतीवर हातानं छाया निर्माण करून त्यांच्याशी बोलत तरी बसे. वयाच्या सातव्या वर्षापासून त्यानं कोणतंही काम कुणाच्या आज्ञेवरून वा त्यांच्या मर्जीखातर केलं नाही. नेहमी म्हणे,'अभिलाषा, आज्ञा, मर्जी ह्यांचा अर्थ काय? कुणाचा तरी स्वीकार करणं, त्यांना दया दाखवणं किंवा त्यांच्याकडे दयेची भीक मागणं. एक दिवस देवाला आपली मर्जी, अभिलाषा मला सांगावी लागेल. मग त्याचा परिणाम काहीही होवो.' ''

नीलच्या आईनं पुन्हा आपला घामानं डवरलेला चेहरा पुसला. फार बोलल्यामुळे ती दमल्यासारखी वाटत होती. तिनं पुढे बोलण्यास सुरुवात केली,

''नीलला कविता, गीतं, गाणं - काहीही पसंत नव्हतं. शीलानं किंवा मी कधी चुकून गुणगुणण्याचा प्रयत्न केला तरी त्याला ते सहन होत नसे. कानांवर हात ठेवून किंवा भिंतीवरच्या छाया निर्माण करून तो म्हणत असे,'सर्व पक्षी कसे उदास, केविलवाणे वाटतात, जनावरं कशी दुःखी वाटतात! कधी ऐकलं आहे त्यांना आनंदानं गाताना?' ''

नीलच्या आईनं उठून पाण्याचा पेला भरून आणला. एक-दोन घोट घेऊन हळुहळू ती पुढे बोलू लागली. ''पतीच्या पश्चात मी शिक्षिकेची नोकरी पत्करून मुलांचं संगोपन व पालनपोषण केलं. मुलांना शिकवण्याची मला मनापासून आवड आहे. मी शिकवण्यात रंगून जाते. स्वतःच्या मुलांनाही शिकवण्याचा मी प्रयत्न केला. शीलानं आनंदानं माझी शिकवणी स्वीकारली. नीलला मात्र माझा शिक्षिकेचा पेशा पसंत नव्हता. त्याबद्दल त्याच्या मनात एक प्रकारची अढी असल्याचं जाणवत होतं. त्याची कारणंही जगावेगळी होती. त्याच्या मते, मुलांना रागावणं, त्यांना दम भरणं, त्यांना कमी लेखणं हेच शिक्षकाचं काम. तो म्हणत असे, 'वडील कारकून होते म्हणून स्ट्रोकनं वारले. सर्व कारकुनांचा शेवट असाच होतो. सर्व शिक्षक कॅन्सरनं मरतात. आईचं तेच होईल.' अशा वेळी मीसुद्धा रागानं त्याला शिक्षा म्हणून घरातून बाहेर काढून कधी भर उन्हाळ्यात तर कधी थोड्याफार थंडीत बाहेर अंगणात झोपायला

लावत असे. इतकं त्याचं बोलणं बोचरं असे."

नीलच्या आईला थकवा आल्याचं जाणवू लागलं. डॉ. मर्चंट ह्यांनी त्यांना थांबण्याची सूचना केली; पुढील हकीगत ऐकण्यास पुन्हा येण्याचं आश्वासन दिलं. नीलच्या आईला त्यांच्या परत येण्याबद्दल भरवसा वाटला नसावा. ती म्हणाली, "तुम्ही परत याल याबद्दल माझी खात्री असली तरी मला नीलबद्दल जे काही सांगायचं आहे ते सांगितल्यावर माझ्या मनावरचा ताण बराच कमी होईल. मी कॉफी करते व ती पिता पिता आपण पुढे बोलू."

कॉफीचे दोन कप घेऊन नीलची आई परत आली तिनं एक कप डॉ. मर्चंट ह्यांच्या हाती देऊन स्वत: कॉफीचा मोठा घोट घेतला व घसा खाकरून पुढे बोलण्यास सुरुवात केली,

"संथपणे अगर शांतपणे चालू असलेली कोणतीही गोष्ट नीलला सुरुवातीपासून पसंत नव्हती. काही ना काही भांडण मुद्दाम उकरून काढण्यात तो पटाईत होता. जीवनात नेहमी काहीतरी खळबळ असावी अशी इच्छा तो सतत व्यक्त करत असे. संथ पाण्यात सर्व शक्ती एकवटून, दगड फेकून तरंग उठवणं हा त्याचा आवडता छंद होता."

"मुलांवर सभोवतालच्या वातावरणाचा फार परिणाम होतो" कॉफीचा घोट घेत, वातावरणाची तुलना निसर्गाशी करत ती पुढे बोलू लागली, "शेतीच्या जमिनीवर ज्याप्रमाणे ऋतूंचा, हवामानाचा परिणाम होतो तसाच. पाऊस हवा तसा पडल्यावर हिरवीगार दिसणारी जमीन पावसाच्या अभावानं सुकलेली, चिरा गेलेली, रखरखीत झालेली आढळते. मुलंसुद्धा अशीच वाढतात. कधी क्रोधाचं, आक्रमकतेचं तीव्र ऊन तर कधी प्रेम, माया ह्यांची छाया. मुलांची घडण होण्यात घर, आजुबाजूचं वातावरण, सोबतचे लोक हे बऱ्याच अंशी कारणीभूत होतात. मीच पाठवलं ना त्याला तुरुंगात, जिथं तो आज खितपत पडला आहे! मीच कारणीभूत आहे त्यानं केलेल्या या गुन्ह्याला!"

नीलच्या आईला हुंदके आवरणं अवघड झालं. डॉक्टरांनी थोडा वेळ जाऊ दिला. ते उठून खिडकीजवळ आले व आजुबाजूच्या वस्तीचं निरीक्षण करू लागले. थोडंफार सावरताच तिनं डॉक्टरांना प्रश्न केला, "डॉक्टर, खरं खरं सांगा, काय लिहिलं आहे माझ्या मुलाच्या नशिबात?"

"मी अजून भेटलो नाही त्याला. त्याला भेटून त्याच्याशी बोलल्यावर सर्व

निर्णय घेतले जातील'' एवढं बोलून डॉक्टर उठले आणि उशीर झाल्यामुळे दुसऱ्या दिवशी परतण्याचं आश्वासन देऊन घरी जाण्यास निघाले.

गाडी चालवत असताना बाहेरच्या वादळी हवेहूनही एक मोठं तुफान डॉक्टरांच्या मनात उठलं होतं. त्यांची मती गुंग झाली होती. नील खरंच का खुनी, गुन्हेगार होता? की, लहानपणापासून, गरज असूनही इलाज न केलेला एक मनोरूग्ण होता? डॉक्टर विचारात गढून गेले.

डॉ. मर्चंट दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून नीलच्या आईच्या घराच्या रोखानं निघाले. नीलच्या बहिणीची, शीलाची मुलाखत घेण्यास ते आज उत्सुक होते. मनाशी काही कयास बांधून आज ते तयारीनं निघाले होते. तिची मुलाखत संपल्यावर दुपारी उशिरा नीलला भेटण्याची आवश्यकता होती. त्याच्या भेटीची त्यांना आतुरता होती.

नीलची बहीण शीला आज कॉलेजमध्ये न जाता त्यांच्या भेटीसाठी घरी राहिली होती. ते येताच पुढे होत, हसून तिनं डॉक्टरांचं स्वागत केलं. तिच्या बोलण्यात, दिसण्यात, वागण्यात तिच्या आईचा बराचसा भास होत आहे असं डॉक्टरांना वाटलं. डॉक्टर सोफ्यावर स्थानापन्न होताच तिनं त्यांना कॉफीचा आग्रह केला,''कॉफी व थोडाफार ब्रेकफास्ट करण्यास शिकवलं आहे आईनं मला, बाकी काही स्वयंपाक येत नाही मला,'' शीलानं किचनमध्ये जाता जाता हसून म्हटलं.

डॉक्टरांनी टेपरेकॉर्डर सुरू करताच शीलानं बोलण्यास सुरुवात केली. ''माझं नाव शीला. माझ्या भावाचं नाव नील. आमच्या वडिलांनी आवडीनं नावं ठेवली होती. वडिलांच्या थोड्या तुटक स्वभावापायी आम्ही दोघंही भावंडं मनानं त्यांच्या फार जवळ कधी पोचू शकलो नाही. आईनं जिवाभावाची मैत्रीण समजून मला वाढवलं. नील मात्र तिच्याही जवळ कधी पोचू शकला नाही. तो जवळजवळ एकाकी, एकलकोंडा होता. आमच्या वडिलांप्रमाणे तोही तुटक, घुमा होता; परंतु अतिशय हुशार होता. तो आपल्या अभ्यासात नेहमी पुढे असे. वडलांची फक्त एक आठवण आहे माझ्या स्मृतीत. ती म्हणजे त्यांचा आजार. त्यांची वाचा बंद झाली होती. स्वतःच्या अवयवांचा त्यांना काहीही उपयोग करता येत नव्हता. त्यांच्या बिछान्यासमोर बसून दिव्यांच्या उजेडात नील पक्ष्यांच्या, जनावरांच्या छाया भिंतीवर पाडण्यात मग्न होऊन जात असे. चिंता करणं, काळजीनं व्याकुळ होणं, दुःख व्यक्त करणं, आपलं मन मोकळं

करणं किंवा मनातले विचार – भावना उघडपणे बोलून दाखवणं या गोष्टी त्याला करताच येत नव्हत्या. त्याला आतून काहीतरी त्यापासून परावृत्त करत असावं.'' शीलानं आवंढा गिळून डोळ्यांत तरळणारे अश्रू हाताच्या बाहीनं पुसले. वडिलांच्या व भावाच्या आठवणीनं ती भावनावश झाली होती.

काही क्षण स्तब्धपणे बसून राहिल्यावर एक दीर्घ श्वास घेत तिनं बोलायला पुन्हा सुरुवात केली. ''नीलनं वैद्यकीय शिक्षणास जरा उशिरा सुरुवात केली. दर सुटीत तो घरी येण्याचा प्रयत्न करत असे. एकदा दारावर थाप बसली व दाराच्या आत एक लिफाफा टाकला गेला. दार उघडून पाहते तो दाराबाहेर नील उभा व पत्र कोरं होतं, न कळवता आला होता. असाच, कधी कधी अचानक हजर होत असे.

''त्या सुटीत तो फार खुशीत असल्यासारखं वागत होता. त्यापूर्वी त्याला कधी शीळ घालताना ऐकल्याचं माझ्यातरी आठवणीत नाही. त्याच्याकडून कित्येक दिवसांत पत्र न आल्याबद्दल मी त्याच्याकडे तक्रार केली. त्यावर त्यानं आपण परदेशात गेलो असल्यामुळे पत्र पाठवू शकलो नाही असं उत्तर दिलं. ही बातमी आम्हाला नवीन होती. आईनं आश्चर्य व्यक्त करत त्याला विचारलं,'परदेशात का जावं लागलं एकाएकी? कोणत्या देशात जाऊन आलास? पैसे कुठून आणलेस एवढे?' या प्रश्नांना त्याच्याकडून मिळालेलं उत्तर केवळ विस्मयजनक, विक्षिप्त नाही तर धक्कादायक होतं. ''मी जर्मनीतल्या वायमर या गावी जाऊन आलो. का कोण जाणे, पण एडगर ॲलन पो या कवीच्या काव्यामुळे माझ्या मनात कबरींविषयी सतत उत्सुकता व ओढ होती. वायमर या गावी एकोणिसाव्या शतकातल्या खून झालेल्या लोकांच्या व बाख, गटे यांसारख्या प्रसिद्ध लोकांच्या कबरी आहेत. त्या पाहून आल्यानंतर माझ्या मनाचं समाधान झालं, शांतता मिळाली'.''

'अरे, पण तुझ्याकडे एवढे पैसे आले तरी कुठून? तू तर शिष्यवृत्तीवर शिकतो आहेस ना? मीसुद्धा तुला एवढे पैसे पुरवू शकले नसते.' आईनं शंका व्यक्त केली.

'हे पाहा आई, तुझ्या पैशांची आता गरज भासणार नाही मला. माझ्या मर्जीनुसार मी केव्हाही, कुठेही जाऊ शकतो. डोळे बंद केले की माझी इच्छा असेल त्या सर्व ठिकाणांना भेटी देऊन येतो मी. माझ्या इच्छेनुसार सर्व काही घडवून आणण्याची इच्छाशक्ती आहे माझ्यापाशी.' काय बोलावं ते न सुचल्यामुळे आई व मी अवाक् होऊन त्याच्याकडे अविश्वासानं पाहात राहिलो.

"त्या दिवशी दुपारी त्याच्या खोलीतून ठोकण्याचे आवाज येऊ लागले, म्हणून मी त्याच्या खोलीत गेले. नील पश्चिमेच्या खिडक्यांना फळ्या ठोकण्यात मग्न झालेला दिसला. तो मेडिकल स्कूलला गेल्यानंतर आईनं खिडक्यांच्या फळ्या काढून तिथं पडदे लावले होते."

बराच वेळ बोलून दमल्यामुळे शीला बोलायची थांबली. डॉक्टरांनी टेपरेकॉर्डर बंद केला. तिच्याशी झालेल्या संभाषणातून व तिनं भावाविषयी पुरवलेल्या आठवणींतून त्यांना नीलच्या विचारशक्तीविषयी, त्याच्या मनाच्या घडणीविषयी एक आडाखा बांधणं शक्य झालं होतं. त्यांच्या मनाचं झालेलं समाधान त्यांच्या चेहऱ्यावर उमटलं होतं. शीलाचे व तिच्या आईचे आभार मानून व त्यांना फोन करण्याचं आश्वासन देऊन डॉक्टर परत जायला निघाले.

नीलला भेटण्याचा विचार बदलून त्याला भेटण्यापूर्वी त्याच्या मेडिकल कॉलेजातल्या वर्गबंधूंना, शिक्षकांना, त्याच्या मित्रांना व त्याच्या मैत्रिणींना भेटून त्यांचे नीलबद्दलचे विचार जाणून घेण्याचं डॉक्टरांनी ठरवलं व त्यांच्याशी प्रत्येकाशी भेटण्याची वेळ ठरवली.

नीलला अगदी जवळचे वाटतील असे कोणी मित्र नव्हते. त्यानं स्वतःभोवती एक अनोखी, मजबूत भिंत उभी केली होती. तिला भेदून त्याच्या मनात डोकावण्याचं धाडस कोणी करू शकलं नव्हतं, त्याची एकुलती एक मैत्रीणसुद्धा! एखाद्यानं त्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला तर तो त्याच्याशी संबंध तोडून टाकत असे. तो सर्वांपासून काही अंतर बाळगून राहत असे. त्याच्या वर्गबंधूंचा त्याच्याविषयी बोलण्याचा रोख असा होता.

नील हा एक अतिशय हुशार विद्यार्थी असल्याबद्दल सर्वांचं एकमत होतं. परंतु त्याच्या हुशारीपेक्षा ठळकपणे नजरेत भरत असे तो त्याचा विक्षिप्तपणा. तो त्यांना नॉर्मल असा कधी वाटला नाही. त्याला फोटो काढून घेणं मुळीच पसंत नव्हतं. मग तो फोटो क्लास गॅदरिंगसाठी असो, इयरबुकसाठी असो वा पासपोर्टसाठी असो; फोटोसाठी उभं राह्यला तो कधी तयार होत नसे. त्याच्या खोलीत रडत असताना त्याला अनेकांनी पाहिलं होतं, परंतु त्याचं सांत्वन करायला कोणी धजलं नव्हतं. त्याच्या एका मैत्रिणीनं मात्र त्याला जवळजवळ वाहून घेतलं होतं.

"तुम्हा सर्वांच्या मते, त्यानं हा खून का केला असावा?" डॉ. मर्चंट.

"त्याला स्वप्नात जर तसा आदेश मिळाला नसता तर त्यानं हा खून केलाही नसता कदाचित, त्याच्या हातून कुणाचा खून घडू शकेल हे कुणाला खरंच वाटलं नसतं."

"हा खून होण्यापूर्वी बराच वेळ त्यानं तुमच्यासोबत काही प्रोजेक्ट्सवर घालवला होता. त्यावेळी तुमच्यापैकी कुणाला असं काही घडेल याबद्दल शंका आली होती का?" डॉ. मर्चंट.

"मुळीच नाही. तो अगदी शांतपणे, नेहमीसारख्या निर्विकार चेहऱ्यानं सर्व कामं करत होता. गेली दीड-दोन वर्षं मोनिका त्याच्याशी मैत्री जोडून आहे. तिला त्याच्याबद्दल थोडीफार अधिक माहिती असण्याची शक्यता आहे."

डॉ. मर्चंट मोनिकाच्या घरी पोचले तेव्हा दिवेलागणीची वेळ झाली होती. ती त्यांची वाट पाहत होती. खांद्यावर रुळणारे केस, शिडशिडीत बांधा, चारचौघींत उठून दिसेल असं रूप असलेल्या मोनिकाचा चेहरा निराशा, दुःख, थकवा, वैफल्य व थोड्या फार प्रमाणात राग अशा भावनांच्या मिश्रणानं झाकोळला होता.

मेडिकल कॉलेजमध्ये नील मोनिकाच्या वर्गात होता, तिला तो मनापासून आवडत होता. तो चारचौघांसारखा नसून थोडा वेगळा होता हे ती जाणून होती, तरीही ती आपल्या परीने त्याच्यावर प्रेम करत होती; त्याला जाणून घेण्याचा प्रयत्न करत होती. एका ठरावीक मर्यादेपलीकडे नील मात्र तिला जवळ येऊ देत नव्हता. तिच्या आईवडिलांना नील कधीच आवडला नाही. त्यांनी तिला त्याच्या मैत्रीपासून, प्रेमापासून परावृत्त करण्याचा बराच अयशस्वी प्रयत्न करून पाहिला, परंतु तीही हट्टाला पेटल्याप्रमाणे त्याच्याशी अधिकाधिक संबंध वाढवण्याचा प्रयत्न करत होती.

"नीलचा सरकारवर, सरकारी कारभारावर राग होता. सरकारी ब्युरोक्रसीची त्याला मनापासून चीड होती," मोनिका सांगू लागली, "सरकार किंवा सरकारी नोकर कधी कुणाच्या उपयोगी पडत नाहीत असं तो म्हणत असे. एका मोठ्या व शेवटच्या दरवाज्यावर थाप मारण्यासाठी जायचं असं तो अलिकडे वारंवार म्हणत असे. मी त्याचा अर्थ विचारला तर, वेळ येताच तुला जरूर कळेल असं बोलून तो मला गप्प करत असे."

"नील खुनी नव्हता. हा खून कुणीतरी करणार होतं. ते काम नीलनं केलं, एवढंच."

"तुझ्या या वाक्याचा अर्थ उलगडून सांगशील का?" डॉ. मर्चंट ह्यांनी प्रश्न केला.

"खून व्हायच्या आदल्या दिवशी नीलनं मला पार्कमध्ये भेटीसाठी बोलावलं होतं. बराच वेळ गेला तरी तो आला नाही, तेव्हा मी तिथून जायला निघाले. त्यावेळी अचानक कुठून तरी येऊन तो माझ्या पुढ्यात उभा ठाकला. त्यानं मला रागानं विचारलं, 'का परत जात होतीस? मी येईन यावर विश्वास नव्हता?' त्याच्या चेहऱ्यावर वैफल्य होतं. तो निराश, हताश वाटत होता. मी काहीच उत्तर दिलं नाही. दुसऱ्या दिवशी मेडिकल पोझिशनसाठी त्याचा इंटरव्ह्यू होता. तो म्हणाला, "मला ठाऊक आहे, हे लोक मला ही संधी मुळीच देणार नाहीत, कारण माझे वडील साधे कारकून होते व तेही स्ट्रोकनं गेले. मी अनाथ आहे. माझी आई काय करते ते कुणीच विचारणार नाही. मी माझ्या आईचं स्वप्न आहे. मी सर्वांना माझ्यासारखं करायचं ठरवलं आहे."

"म्हणजे कसं?" मी प्रश्न केला.

"सर्वजण माझ्यासारखे अनाथ झाले तर लोक, मुलं आपल्या आईवरून ओळखली जातील. उद्या माझा इंटरव्ह्यू नाही, त्यांचा आहे. तू बघशीलच. मीच जिंकेन उद्या. नाहीतर त्यांच्यापैकी कुणीतरी आपलं आयुष्य गमावून बसेल."

तो भराभर बोलत होता, परंतु काय बोलत होता याचा बोध होणं माझ्या आवाक्याबाहेर होतं. दुसऱ्या दिवशी खुनाची बातमी ऐकून थोडाफार उलगडा झाला. तो माणसांच्या विचार-मनोवृत्तींना खून करून बदलणार होता. त्याच्या दृष्टीनं कुणीतरी हे काम करणारच होतं; ते त्यानं केलं."

दोन्ही तळव्यांत तोंड लपवून मोनिका हुंदके देऊ लागली. तिचं सांत्वन कसं करावं हे डॉक्टरांना उमगेना. ज्याच्यावर एवढं जीव तोडून प्रेम केलं तो खून करू शकतो, दुसऱ्याचा जीव घेऊ शकतो यावर तिचा अजून विश्वास बसत नव्हता. डॉ. मर्चंट अधिकाधिक बुचकळ्यात पडत होते.

शेवटचा व सर्वांत महत्त्वाचा इंटरव्ह्यू घेण्यासाठी डॉक्टरांना नीलला भेटण्यासाठी दुसऱ्या दिवशी तुरुंगामध्ये जायचं होतं. काळोख्या खोलीत नील त्यांची वाट पाहत होता. ते तुरुंगात पोचल्यावर नीलच्या समोरच्या खुर्चीत त्यांना बसवून गार्ड खोलीबाहेर जाऊन उभा राहिला.

"कुणाला भेटण्यासाठी आलात, डॉक्टर? खुनी माणसाला की नीलला?"

"मला नीलच्या सदसद्विवेकबुद्धीला भेटायचं आहे. ती ठिकाणावर आहे का?"

"ठीक आहे. जरा ध्यान देऊन ऐका, डॉक्टर. नवऱ्याच्या पश्चात एकल्या झालेल्या एका आईचं दुःख लक्षात घेऊन आपला रिपोर्ट पुरा करा. मुलं असूनदेखील एक आई जेव्हा जगात एकटी होते, एकली होते तेव्हा तिच्या मुलांना आणि तिला जिणं मुश्कील आणि असह्य होतं या दुनियेत. पण तिचा कुणी-कधी विचार करत नाही. तिच्या मुलांना तिची नाजूक मनःस्थिती ध्यानात घ्यावी लागते. तिच्या मनाला कोणत्याही प्रकारे दुःख पोचणार नाही याची दक्षता घ्यावी लागते. मी जे केलं ते का केलं हा प्रश्न तुमच्या मनाला नक्की भेडसावत असणार. त्यासाठी तुम्ही आज या तुरुंगात येण्याची तसदी घेतलीत. मी केलेल्या कृत्याचं कारण विचाराल तर त्याचं उत्तर एकच. मी ज्यासाठी इंटरव्ह्यू देणार होतो, ती वैद्यकीय अधिकारी बनण्याची संधी मला मिळाली नसती तर त्यापायी माझ्या आईला झालेलं दुःख मी सहन करू शकलो नसतो. मी माझ्या आईचं स्वप्न होतो. ते तिचं स्वप्नच राहणार होतं. ते सत्यात साकार होणार नव्हतं."

डॉ. मर्चंट जड अंतःकरणानं परतीच्या वाटेवर वळले. घरी पोचेपर्यंत ते नीलच्या बोलण्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करत होते व अधिकाधिक बुचकळ्यात पडत होते. आईला एका गोष्टीचं दुःख होऊ नये म्हणून अधिक दुःख देऊन या बुद्धिमान मुलानं काय साधलं? डॉक्टरांच्या आजवरच्या अनुभवात ते एक न उलगडणारं कोडंच राहिलं.

बऱ्याच विचारांती दोन दिवसांनंतर डॉ. मर्चंट ह्यांनी दोन लिफाफे तयार केले. एका लिफाफ्यात नीलचा रिपोर्ट होता. त्यात, नील मनोरूग्ण असल्यामुळे त्यानं केलेल्या कृत्याला तो जबाबदार ठरू शकत नाही अशी शिफारस केली होती. दुसऱ्या लिफाफ्यामध्ये त्यांनी आपला राजीनामा लिहिला होता. ते स्वतःशी हसले.

"कुणी विचारलं की तुम्ही नीलला वेडाचा खोटा दाखला का दिला तर सांगीन, की नीलच्या आईसाठी. सोबत राजिनामा का दिला असं कोणी विचारल्यास जरूर सांगीन आपल्या व नीलच्या सद्सद्विवेकबुध्दीसाठी."

हसत हसत, दिव्यांच्या प्रकाशात हातांच्या साहाय्यानं भिंतीवर पक्ष्यांची व जनावरांची छायाचित्रं काढण्यात डॉक्टर रंगून गेले!

◆◆◆

# परतीची वाट

पाच फूट आठ इंच उंचीची ती धिप्पाड स्त्री लांब लांब टांगा टाकत जवळजवळ पळत चालल्यासारखी निघाली होती. वेळ संध्याकाळची साडेनऊ-दहाची असेल. जवळ असलेल्या वसाहतीत एका रो हाऊसमध्ये तिचं घर होतं. शहरातल्या समाजकार्य खात्याच्या ऑफिसमध्ये ती सोशल वर्कर होती. एका बेवारशी मुलासाठी 'फॉस्टर होम' शोधून त्याला तिथं पोचवून येईपर्यंत तिला उशीर झाला होता व भूकही लागली होती. तिच्या खांद्यावर तिच्या भल्यामोठ्या वजनाशी स्पर्धा करणारी, लांब पट्टा असलेली एक मोठी पर्स लटकली होती. दिवसभरात लागणाऱ्या जरुरीच्या सर्व वस्तू बहुधा त्या पर्समध्ये असाव्यात.

चालता चालता अचानक त्या स्त्रीच्या खांद्याला झटका बसला. आपली पर्स कुणीतरी खेचल्याचं तिला जाणवलं. तिनं मागे वळून पाहिलं तर दहा-बारा वर्षांचा एक मुलगा पाय हवेत उंचावलेल्या स्थितीत जमिनीवर पडलेला तिच्या नजरेस पडला. चोरण्यासाठी तिची पर्स ओढण्याचा प्रयत्न त्यानं केला होता. परंतु त्या झटक्यामुळे व पर्सच्या वजनामुळे त्या पर्सचा पट्टा तुटला व त्या मुलाचा तोल जाऊन तो पर्ससहित दाणकन् जमिनीवर आपल्या पाठीवर आदळला. मोठ्या देहाची ती स्त्री

झटकन मागे वळली व आपल्या अणकुचीदार बुटांच्या टाचेनं तिनं त्या मुलाच्या पार्श्वभागावर जोरात लाथ हाणली. त्यासरशी तो मुलगा वेदनेनं कळवळला. तिनं खाली वाकून, त्याच्या बखोट्याला पकडून त्याला उभं केलं व एवढ्या जोरात गदागदा हलवलं की त्याचे दात एकमेकांवर आपटले.

त्याला तसाच धरून ठेवत हुकमी आवाजात ती म्हणाली, "माझी पर्स उचलून माझ्या हातात दे."

तिनं या वेळपर्यंत त्याला घट्ट पकडून ठेवलं होतं. त्याला पर्स उचलता येण्याइतपत ती वाकली. तो मुलगा उठून उभा राहिल्यावर त्याला न सोडता ती म्हणाली,"शरम नाही वाटत तुला?"

अडखळत, घाबरत तो मुलगा उत्तरला, "हो वाटते."

"मग कशासाठी करत होतास हे वाईट काम?"

"मनातून नव्हतं करायचं, पण हातांनी ऐकलं नाही."

"वर खोटं बोलतोस, तोंड वर करून?"

त्या दोघांमधला हा संवाद चालू असताना रस्त्यातले काही जण थांबून हा तमाशा पाहू लागले.

"मी सोडलं तर पळून जाशील?"

"अं.....हो."

"मग नाहीच सोडत तुला आता." त्या स्त्रीनं त्याला तसंच घट्ट पकडून ठेवलं.

"माझ्याकडून अशी मोठी चूक घडल्याबद्दल मला क्षमा करा, बाई. चूक झाली माझ्या हातून. मला मनापासून वाईट वाटतं त्याबद्दल." तो आवर्जून बोलला.

"हूं. तुझा चेहरा किती धुळीनं माखला आहे; काळवंडला आहे. हा तुझा कळकट चेहरा अगदी खसखसून घासून-पुसून काढावा असा मोह होतो आहे मला. चेहरा धू, स्वच्छ आंघोळ कर, धुतलेले कपडे घाल असं सांगणारं कुणी नाही का तुझ्या घरी?"

"नाही बाई."

"तर मग आज तुझा चेहरा नक्की धुतला जाईल." एवढं बोलून ती जाडजूड धिप्पाड बाई घरी जायला निघाली. सोबत, त्या भांबावलेल्या मुलाला पकडून नेण्यास विसरली नाही.

तो मुलगा अकरा-बारा वर्षांचा असावा. किरकोळ अंगयष्टी असलेल्या त्या मुलाचा चेहरा फिकट होता. तो कुपोषणाचा बळी असावा असं त्याच्याकडे पाहून वाटत होतं. फाटकी जीन व त्यावर एक कळकट टी-शर्ट असा त्याचा पेहराव होता. पायात कळकटलेले स्लीपर्स होते.

"तू माझा मुलगा असतास तर मी शिकवलं असतं तुला, काय बरोबर व काय चूक आहे ते. आता सापडलाच आहेस तर निदान तुझा चेहरा तरी स्वच्छ करून पाठवीन. भूक लागली असेल ना तुला?"

"न.....नाही बाई. मला फक्त सोडून द्या. मी पुन्हा नाही करणार चोरी. वचन देतो तुम्हाला."

"मी त्या कोपऱ्यावर वळले तेव्हा तुला काही त्रास दिला होता का? काही छेड काढली होती का मी तुझी? मग का खेचलीस पर्स माझी?"

"चूक झाली माझ्याकडून, कबूल करतो मी."

"पर्स खेचून तू माझी तुझ्याशी गाठ घालून दिलीस. आता, आपली ही भेट तुझ्या कायम लक्षात राहावी अशी इच्छा आहे माझी. आज मी तुझ्याबरोबर घालवलेला वेळ मिसेस लुसिया जॉन्सनची आठवण तुझ्या मनावर कायमचा ठसा उमटावून जाईल."

त्या मुलाचा चेहरा घामानं डवरला व तो तिच्या पकडीतून निसटण्याची धडपड करू लागला. मिसेस जॉन्सन क्षणभर थांबली व तिनं त्या मुलाला आपल्या पुढ्यात ओढलं. आपला हात त्याच्या गळ्याभोवती टाकून त्याला खेचत ती झपाझप चालू लागली. आपल्या रो-हाऊसजवळ पोचताच पर्समधली किल्ली एका हातानं काढून तिनं दार उघडलं. त्या मुलाला प्रथम आत ढकलून स्वतः घरात शिरताच तिनं दरवाजा धाडकन बंद केला. आपल्या मागे तुरुंगाचा दरवाजा बंद झाल्याचा भास त्या मुलाला झाला. एका मोठ्या अरुंद पॅसेजमधून ती त्याला घराच्या मागच्या बाजूस असलेल्या स्वयंपाकघरात घेऊन गेली. आत जाताच तिनं किचनचे दिवे लावले व मधला दरवाजा मात्र जाणुनबुजून उघडा ठेवला. वरच्या खोलीतून त्याला काही माणसांच्या बोलण्याचा आवाज ऐकू आला व त्याची खात्री पटली, की तो त्या घरात तिच्याबरोबर एकटा नव्हता. मिसेस जॉन्सननं त्याला अजून घट्ट धरून ठेवलं होतं.

"नाव काय तुझं?" तिनं विचारलं.

"क्लिफ्टन," तो उत्तरला.

"क्लिफ्टन, त्या बेसिनवर हात व चेहेरा स्वच्छ धुऊन ये", तिनं अखेर त्याची पकड सोडत म्हटलं. एकवार तिच्याकडे व नंतर दरवाज्याकडे नजर टाकून क्लिफ्टन धावत बेसिनजवळ पोचला.

"गरम पाणी येईस्तोवर नळ चालू राहू दे," जवळच्या खुंटीला स्वच्छ नॅपकिन लावत मिसेस जॉन्सन म्हणाली. तिच्या आवाजात जरब होती.

"पोलिसांना बोलावून तुम्ही मला तुरुंगात तर नाही ना पाठवणार?" बेसिनवर वाकता वाकता क्लिफ्टननं तिला चाचरत प्रश्न विचारला.

"हा मळकट चेहेरा घेऊन नक्कीच नाही पाठवणार. असला कळकट चेहेरा घेऊन मी तुला कुठेच जाऊ देणार नाही," मिसेस जॉन्सननं उत्तर दिलं व ती पुढे बोलू लागली.

"कामाचा लांबच लांब दिवस संपवून दमल्यावर मी घरी येऊन स्वतःसाठी स्वयंपाक करणार होते. पण रस्त्यात तू माझी पर्स खेचलीस. तूसुद्धा काही खाल्लं असशील असं तुझ्या चेहेऱ्याकडे पाहून तरी वाटत नाही."

"माझ्या घरी संध्याकाळी कुणीच नसतं, मला जेवण द्यायला."

"मग माझ्यासोबत जेव. तुला भूक लागली असेल ना! कदाचित त्यापायी तू माझी पर्स पळवायचा प्रयत्न केला असावास."

"त्यासाठी नाही, बाई. मला डिझाइनर्स लोगो असलेला एक टी-शर्ट हवा होता."

"त्यासाठी माझी पर्स ओढण्याची गरज नव्हती. मागून घ्यायचे होतेस पैसे माझ्याकडून."

"काय?" आश्चर्यानं डोळे विस्फारत क्लिफ्टन जवळजवळ ओरडला, "शेजारपाजारच्या व शाळेतल्या जवळजवळ सर्व मुलांकडे डिझाइनर्स लोगो असलेले टी-शर्ट होते. त्यानं तशा शर्टाची आईकडे मागणी केली होती. परंतु पांगळ्या भावाचा हॉस्पिटलचा व औषधांचा खर्च भागवण्यासाठी ती दोन नोकऱ्या करत असूनही पैसे अपुरे पडत असत. शाळेतल्या काही मुलांनी ड्रग डीलिंग करून पैसे कमावण्याचा दिलेला सल्ला त्यानं धुडकावून लावला होता. परंतु आज त्याच्या शेजारच्या मुलानं त्याच्या कपड्यांना नावं ठेवत त्याला 'जर्क' ही पदवी बहाल केली होती. त्यापायी चिडून, त्यानं पर्स खेचून पैसे मिळवण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता. गुन्ह्याची पहिली वेळ असल्यामुळे

त्याचा प्रयत्न सपशेल फसला होता.

चेहेऱ्यावर पाणी टपकत असताना क्लिफ्टननं तिच्याकडे वळून पाहिलं, काही न बोलता ती डोळे मिटून शांतपणे बसली होती. बराच वेळ स्तब्धतेत गेला. त्यानं चेहरा पुसला व त्यानंतर काय करावं हे न कळल्यामुळे पुनःपुन्हा पुसला. 'आता काय?' असा मनातल्या मनात विचार करत क्लिफ्टन मागे वळला. खोलीचा उघडा दरवाजा पाहून त्याच्या मनात पळण्याचे विचार पुन्हा घर करू लागले.

मिसेस जॉन्सन बाजूच्या एका खुर्चीवर बसली होती. काही क्षण तसेच स्तब्धतेत जाऊ दिल्यावर ती हळुवारपणे म्हणाली,''मीसुद्धा तुझ्याप्रमाणे लहान होते एके काळी आणि मलाही कधी न मिळू शकणाऱ्या वस्तू हव्याहव्याशा वाटत होत्या.'' एवढं बोलून ती पुन्हा थोडा वेळ गप्प बसली.

क्लिफ्टनच्या चेहेऱ्यावरचे भाव त्याच्या नकळत बदलून त्याच्या कपाळावर आठ्या उमटल्या.

त्याच्या चेहेऱ्यावर नजर स्थिर करत तिनं पुन्हा बोलायला सुरुवात केली,''अंहं, तुला वाटलं असेल, की मी आता सांगीन की असं असूनही मी कुणाची पर्स खेचली नाही. मी तसं मुळीच म्हणणार नव्हते. मीसुद्धा करू नयेत अशा काही गोष्टी केल्या आहेत. मी लहानपणी काय काय केलं ते तुला सांगणार नाही. तुलाच काय, पण देवालाही सांगणार नाही, त्याला जर माहीत नसेल तर. प्रत्येकाच्या हातून आयुष्यात कधी ना कधी काही चुका घडलेल्या असतात. मी तुझ्या जेवणाचा बंदोबस्त करीपर्यंत त्या खुर्चीवर बसून राहा थोडा वेळ. तो पलीकडचा कंगवा घेऊन केसांवर ओढ, म्हणजे चेहेरा जरा पाहण्याजोगा होईल तुझा.''

त्याच्याकडे पाठ करून मिसेस जॉन्सननं आतल्या खाण्याच्या वस्तू गरम करण्यासाठी रेफ्रिजरेटर उघडला. क्लिफ्टनकडे तिची पाठ होती व तिची पर्स ती बसली होती त्या खुर्चीवर पडली होती. तो त्या पर्सपासून काही अंतरावर असलेल्या एका खुर्चीवर जाऊन बसला. त्याला तिचा अविश्वास पदरी पाडून घ्यायचा नव्हता.

''कोपऱ्यावरल्या ग्रोसरी स्टोअरमधून तुम्हाला काही हवं आहे का?'' त्यानं विचारलं.

"मला काही नको आहे. तुला जर चॉकलेट मिल्क आवडत असेल तर घेऊन ये."

"मला नको चॉकलेट मिल्क."

तिनं आधीच तयार केलेलं रेफ्रिजरेटरमधलं जेवण गरम केलं. तो राहतो कुठे, त्याचे आईवडील काय करतात इत्यादी प्रश्न तिनं क्लिफ्टनला विचारले नाहीत. तिची खात्री होती, की त्या प्रश्नांची उत्तरं देताना तो शरमेनं अर्धमेला झाला असता.

तिनं जेवत असताना आपण सोशल वर्कर असल्याची माहिती क्लिफ्टनला पुरवली. आपल्या नोकरीत आपला अनाथ, उपेक्षित मुलांशी व त्यांच्या आईवडिलांशी येणारा संबंध याबद्दल त्याला तिनं अनेक गोष्टी सांगितल्या. जेवण झाल्यावर केकच्या तुकड्याची बशी तिनं त्याच्यापुढे ठेवली.

"पोटभर जेवून घे, बेटा," ती म्हणाली.

जेवण उरकल्यावर त्यानं डायनिंग टेबल साफ केलं, तिला भांडी घासायला व पुसायला मदत केली. तिनं सर्व कामं आटोपल्यावर आपल्या पर्समधून तीस डॉलर काढले व ते त्याच्या हाती ठेवत त्याला म्हणाली, "या पैशांत तुझा टी-शर्ट यायला हरकत नाही. कमी पडल्यास आणखी देईन. माझा पत्ता ठाऊक आहे तुला. यापुढे कुणाचीही पर्स ओढण्याच्या भानगडीत पडू नकोस. दुसऱ्याला दुखावून चोरीच्या पैशानं घेतलेल्या शर्टानं शरीर भाजेल तुझं. मी थकले आहे आता व माझी झोपण्याची वेळही टळून गेली आहे. तुला सकाळी शाळेत जायचं आहे. यापुढे चांगला वाग एवढंच माझं सांगणं आहे तुला."

मिसेस् जॉन्सननं त्याला पॅसेजमधून बाहेरच्या दरवाज्याजवळ नेलं व दार उघडत ती म्हणाली, "गुड नाईट. यापुढे नीट वाग." तो पायऱ्या उतरत असताना ती त्याच्याकडे टक लावून पाहत राहिली.

क्लिफ्टनला तिला केवळ 'थँक्यू'पेक्षा जास्त काही सांगायची इच्छा होती. त्याचे ओठ हलले, तरी त्याच्या तोंडातून शब्द उमटू शकले नाहीत. परंतु त्याला जे बोलायचं होतं, सांगायचं होतं ते तिला कळवायचं काम त्याच्या गालावरून झिरपणाऱ्या आसवांनी केलं. मागे फिरून, धाडधाड जिना चढून तो पुन्हा वर गेला व आपले हात तिच्याभोवती लपेटून काहीतरी पुटपुटला. घराचं दार बंद करणाऱ्या सौ. जॉन्सनच्या चेहऱ्यावर हलकं स्मित उमटलं.

◆◆◆



**लता देशपांडे**

जन्म, बालपण व पहिल्या एम.ए.पर्यंत शिक्षण मुंबईत.

शिक्षण

१९५८ बी.ए. व १९६० एम.ए. विषय - मराठी, फिलॉसॉफी व संस्कृत मुंबई विद्यापीठ

१९६३ एम.ए. (एम.आर.सी.) Rehabilitation Counseling

१९६३ एम.ए. Psychology, University of Florida, U.S.A.

१९७४ एम.एस. Special education of mentally challenged & emotionally disturbed children. Syracuse University, U.S.A.

१९८७ सी.ए.एस.ई. (Certificate of Advanced studies in education) Administration of special schools and school law Johns Hopkins University, U.S.A.

- प्रा. अनंत काणेकर ॲवॉर्ड, १९५८-मुंबई.
- इंटरनॅशनल पीस स्कॉलरशीप.
- रोटरी इंटरनॅशनल ॲवॉर्ड फॉर कम्युनिटी सर्व्हिसेस, १९७३-नवी दिल्ली.

व्यवसाय - दिल्ली व बाल्टिमोर येथील अपंग व गुन्हेगार मुलांसाठी शिक्षणसंस्थांत प्रथम शिक्षिका व नंतर प्रिन्सिपल व नंतर केंद्र शिक्षणसंचालक

रंगभूमी, संगीत, क्रीडाविषय व प्रवास यांची अतिशय आवड. प्राथमिक शाळेपासून वाचनाचं व्यसन– वाण्याच्या दुकानातून अथवा इतर कुठूनही आलेल्या पुड्याच्या वर्तमानपत्राचा कागदाचा तुकडादेखील मन लावून वाचण्याइतपत.

१९९६ साली सेवानिवृत्ती घेतल्यावर लिखाणाला थोडी सुरुवात. आजवर मुंबई येथील 'चैत्राली', 'मीरा-मधुरा' व 'रुची' या दिवाळी अंकांत काही लिखाण प्रसिद्ध. 'मिळून साऱ्याजणी' व 'बृहन्महाराष्ट्रवृत्त' यांतून अधुनमधून लिखाणाला प्रसिद्धी. 'एकता' त्रैमासिकामध्ये जवळजवळ नियमितपणे लेखन प्रसिद्ध.

मुले का बिघडतात? व्यसनासक्त का होतात? आणि गुन्हे करण्यास प्रवृत्त तरी का होतात? लेखिकेने मुलांसमवेत अगदी 'झोपड'वस्तीत राहूनदेखील घेतलेला शोध. ती लिहिते- "ह्या सबंध काळात मन साशंक होऊन स्वत:ला प्रश्न विचारावा लागे – ह्या कामासाठी लागणारं मनोधर्य, मनोबळ, संवेदनशीलता, संयम, शहाणपणा व धीर आपल्याकडे आहे का?"

प्रत्येक कथेमागे एक व्यथा असते; किंबहुना व्यथेच्या आकलनामधून कथा जन्माला येते! तथाकथित गुन्हेगार, व्यसनाधीन मुले ह्यांच्या निकटच्या सहवासात जो अनुभव मिळाला, जो बोध होत गेला त्याच्या ह्या कथा-गोंधळून टाकणाऱ्या, विचारात पाडणाऱ्या आणि म्हणून मानवी जीवनाची जाण सखोल करणाऱ्या.

ग्रंथाली